17-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
MSS/ ST/ 11:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**<u>पाकिस्तानातील पेशावरमधील लष्करी शाळेमध्ये दहशतवाद्यांनी</u>**

**<u>केलेल्या हल्ल्यात बळी पडलेल्या निष्पाप बालकांना श्रद्धांजली</u>**

**सभापती** : आज सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, धनंजय मुंडे आणि संजय दत्त यांनी काल पाकिस्तानात घडलेल्या क्रूर हल्ल्याच्या संदर्भत औचित्याची आणि नियम 93ची सूचना दिली होती. सभागृहाच्या या बाबतीतील भावना मी ठरावाच्या रुपाने या ठिकाणी मांडतो.

पाकिस्तानातील पेशावर मधील एका लष्करी शाळेमध्ये दिनांक 16 डिसेंबर 2014 रोजी दहशतवाद्यांनी हल्ला करुन 124 निष्पाप बालकांसह 160 जणांची निर्घृण हत्या करणे, मानवी जातीला काळीमा फासणारी हे अत्यंत निंदनीय कृत्य असून दहशतवाद समूळ नष्ट होण्यासाठी जगातील सर्वच राष्ट्रांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता, मानवी इतिहासातील अत्यंत निर्घृण व लांच्छनास्पद अशी ही घटना असून या दुर्देवी हल्ल्यात बळी पडलेल्या कोवळया जीवांना श्रद्धांजली वाहण्यासाठी या सभागृहासमोर मी प्रस्ताव ठेवीत आहे.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे.

सभागृहाची बैठक मी 5 मिनिटे तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.03 ते 11.08 पर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

**(स्थगितीनंतर)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सभापती** : आता दिनांक 10.12.2014 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.676 घेण्यात येईल.

**मुंबई अंधेरी पश्चिम येथील पोलिसांच्या वसाहतीसाठी राखून ठेवलेला भूखंड आकृति बिल्डर्सनी हडप केल्याबाबत**

**(५) * ६७६ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसुल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई अंधेरी पश्चिम येथील पोलिसांच्या वसाहतीसाठी राखून ठेवलेला सुमारे सव्वा एकरचा भूखंड आकृति बिल्डर्सनी हडप केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत च□कशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर शासकीय भूखंड परत ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, स्वस्त घराचे अमिष दाखवून ८२० जणांची फसवणूक केल्याप्रकरणी कल्याण येथील महात्मा फुले पोलीस ठाण्यात आकृती बिल्डर च्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सुमारे २५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणा-या बिल्डरवर कोणत्या गुन्हान्वये कारवाई करण्यात आली आहे,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(७) त्यानुसार फसवणूक झालेल्या नागरिकांना त्यांचे पैसे परत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री देवेंद्र फडणवीस** : (1), (2) व (3) हे खरे नाही.

अंधेरी (पश्चिम), अंबविली येथील सर्व्हे क्र. 141(अ) येथील मुद्रण कामगार नगर व चुनाभट्टी येथील भूखंड क्र. 627 येथील इमारतीचा खाजगीकरणाच्या माध्यमातून एकत्रितपणे विकास करण्याच्या प्रस्तावास मंत्री मंडळाच्या पायाभूत सोयी सुविधा समितीने दि. 18/08/2009 रोजी मान्यता दिलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि. 28/08/2009 च्या ज्ञापनानुसार सदर विकासाचे काम मे. आकृती सिटी लि., मुंबई या विकासकास कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, मुंबई यांच्या दिनांक 31.8.2009च्या पत्रान्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार विकासकार्य काम सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राखून ठेवलेला ता.प्र.क्र. 676..

(4) व (5) मुंबई यसेथील आकृती बिल्डर्स यांचेशी नामसाधर्म्य असलेल्या कल्याण येथील आकृती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स आणि अन्य एका बांधकाम कंपनीने सुमारे 940 जणांची सुमारे 15.78 कोटी रुपयाची फसवणूक केल्याबाबत महात्मा फुले पोलीस ठाणे येथे गु.र.नं.778/14 भा.दं.वि.सं. कलम 420, 406, 447, 465, 467, 468, 471, 34 अन्वये 15 जणांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(6) उक्त प्रश्न भाग 4 व 5 मध्ये नमूद गुन्ह्यांच्या तपासामध्ये सदरची जमीन संरक्षण मंत्रालय, भारत सरकारच्या मालकीची असल्याचे निष्पन्न झाले आहे.
(7) सदर गुन्ह्याचे तपासकामी आकृती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांची दोन कार्यालये पंचनामा करुन सिल करण्यात आलेली आहेत. तसेच गुन्ह्याचे अनुषंगाने उपयुक्त कागदपत्रे देखील जप्त करण्यात आलेली आहेत. तसेच आरोपीतांचे नावे असलेले बँक खाते फौजदारी प्रक्रिया संहिता कायदा कलम 102 प्रमाणे गोठविण्यात आले असून एक आरोपीला अटक करण्यात आली आहे.
(8) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. किरण पावसकर : हा अंधेरीमधील गृहनिर्माणासाठी राखून ठेवलेला 19200 चौ.मीटरचा भूखंड आहे. 1962मध्ये हा भूखंड मुद्रण कामगार नगर वसाहतीसाठी उपलब्ध करुन दिला होता. माझा प्रश्न असा आहे की, 19200 चौ.मी.चा भूखंड आपण आकृती बिल्डरला दिलेला आहे. हा भूखंड 14270 चौ.मी.चा आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.676.... श्री.किरण पावसकर.....

उर्वरित भूखंडाबाबत महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्री.अरुप पटनाईक यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामुळे शिक्कामोर्तब झाले आहे. कंपनीने 14270 चौ.मी.जागेभोवती कुंपण न घालता 19200 चौ.मी.जागेभोवती कुंपण घातले हे खरे आहे काय? असल्यास, त्यावर आकृती बिल्डर्सने हायकोर्टात प्रतिज्ञापत्र दिले आहे त्यामध्ये काय नमूद केले आहे?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या संदर्भात जी पायाभूत समिती होती त्या समितीने आकृती बिल्डर्सला तो भूखंड दिला. त्या भूखंडाच्या संदर्भात उच्च न्यायालयामध्ये जी याचिका सुरु आहे ती याकरिता सुरु आहे की, उपरोक्त भूखंड ज्यावेळी वरळीच्या पोलीस गृहनिर्माण मंडळाकडून काढून घेऊन आमदारांच्या आणि इतरांच्या सोसायटीला दिले त्या बदल्यात दुसरा भूखंड द्यावा अशा प्रकारची मागणी पोलीस गृहनिर्माण मंडळाच्या माध्यमातून करण्यात आली. त्यावेळी भूखंड पोलीस गृहनिर्माण मंडळासाठी डेसिग्नेट केल्यानंतर शासनाने स्वत: त्याचा निर्णय करुन हा जो भूखंड डेसिग्नेट केला तो भूखंड पायाभूत समितीने दिनांक 18.09.2009 रोजी आकृती बिल्डर्सला डेव्हलप करण्याकरिता जेवढा दिला तेवढा त्यांच्या पझेशनमध्ये आहे. तरी माननीय सदस्यांनी जी शंका उपस्थित केली आहे ती ग्राह्य धरुन त्यापेक्षा एक इंचही अधिक जागा आकृती बिल्डर्स यांच्या पझेशनमध्ये असेल तर ती काढून घेण्यात येईल आणि ती पोलीस गृहनिर्माण मंडळाकरिता डेसिग्नेट करण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आकृती बिल्डर्सचे हे प्रकरण 19 हजार चौ.मी.जागेवर कुंपण घातले त्याबद्दलचे आहे. वास्तविक त्यांना 14,270 चौ.मी.जागा द्यावयास हवी होती. त्यांनी अधिक जागा घेतली आहे. आकृती बिल्डर्सने बीकेसीमध्ये सुध्दा श्री.संदीप पाटील यांना दिलेल्या प्लॉटवर अशाच पध्दतीने कुंपण घालून ठेवले आहे. त्या संदर्भात वारंवार प्रश्न उपस्थित करुनही काही कारवाई झालेली नाही. या सोसायटीच्या बाजूला राखीव भूखंड आहे, कोकीळाबेन अंबानी रुग्णालय आहे, सनदी अधिकाऱ्यांची पाटलीपुत्र सोसायटी आहे. त्या बाजूला मनोरंजनासाठी एक मैदान आहे. ठराविक सर्व्हे क्रमांक घेतले जातात आणि कुंपण घालताना सर्व सर्व्हे क्रमांक एकत्रित केले जातात. आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या सोसायटीला कोर्टात जावे लागत असेल तर त्या ठिकाणी शासनाने तातडीने आपली भूमिका

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.676.... श्री.किरण पावसकर.....

मांडण्याची गरज आहे. बीकेसी मधील भूखंड आणि हा विषय मी क्लब करु इच्छित नाही. यामधून बिल्डर्सची जी मनोवृत्ती दिसून येते ती मी निदर्शनास आणली आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय योग्य बाब सांगितली आहे. ज्यावेळी वरळी येथील प्लॉट पोलीस गृहनिर्माण मंडळाला देण्यात आले होते ते पेड अप कॅपिटलचा भाग म्हणून देण्यात आले होते. कंपनी कायद्यानुसार शासनाला ते दुसऱ्याला वर्ग करण्याचा अधिकार नाही. त्याकरिता स्पेशल रिझॉल्यूशनची आवश्यकता आहे. तशी कोणतीही प्रक्रिया पार पाडण्यात आली नाही. हा स्वतंत्र विषय आहे. यापूर्वी शासनाने उच्च न्यायालयामध्ये श्री.अरुप पटनाईक यांच्या याचिकेच्या संदर्भात भूमिका मांडली आहे. शासनाचे मत आहे की, तेथे सुधारित भूमिका मांडण्याची आवश्यकता आहे. पोलिसांना दिलेले भूखंड प्रोटेक्ट झाले पाहिजेत. 2009 साली पूर्वीच्या सरकारने हा निर्णय घेतला. त्यावर बांधकाम सुरु झाले, ते परत घेता येत नाही. जी भावना आपण मांडली त्याच्याशी सरकार पूर्णपणे सहमत आहे. अशाप्रकारे जागा घेऊ देणार नाही. एक इंचही जागा अधिकची घेतली असेल तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, पोलीस गृहनिर्माण मंडळाचे वरळी येथे प्लॉट होते त्या बदल्यात अंधेरी येथे त्यांना प्लॉट देण्यात आला. मागील शासनाने चुकीच्या निकषावर प्लॉट दिला असेल तर शासन फेरचौकशी करुन तो प्लॉट परत घेणार आहे काय? शक्य नसेल तर पोलीस गृहनिर्माण मंडळाला दुसरा प्लॉट देण्याची तजवीज केली जाईल काय?

श्री.देवेंद्र फडणवीस : माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यामध्ये दोन वेगवेगळ्या कारवाया आहेत. त्या भागामध्ये जो प्लॉट आहे त्या प्लॉटवर आकृती बिल्डर्सचे काम चाललेले आहे. त्यांना प्लॉट देऊ म्हणून शासनाने सांगितले होते, परंतु तो दिला नाही. पायाभूत समितीने तो प्लॉट आकृती बिल्डर्सला दिला. ती केस वेगळी आहे, त्याच्या मेरिटशी या विषयाचा संबंध नाही. मुख्यत: सुखदा आणि शुभदा सोसायट्याना भूखंड दिल्यामुळे पेड अप कॅपिटल कमी झाले आहे. कंपनी कायद्याप्रमाणे प्रक्रिया केली नाही. ती प्रक्रिया कंपनी करुन घेईल.

ॲड.अनिल परब : मुद्रण कामगारांना बाहेर काढून तो प्लॉट देण्यात आला आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.676......

श्री.देवेंद्र फडणवीस : होय. मात्र पोलीस गृहनिर्माण मंडळाच्या संदर्भात राज्य सरकार गंभीर असल्यामुळे आज ज्या ज्या शिफारशी पोलीस गृहनिर्माण मंडळाच्या महासंचालकांनी केल्या आहेत त्यानुसार राज्य शासन जवळजवळ सर्व निर्णय घेत आहे. अधिक एफएसआय द्यायचा असेल त्याचा निर्णय घेतला आहे. पोलीस गृहनिर्माण मंडळासाठी राखीव ठेवलेले प्लॉट कोणालाही देण्यात येणार नाही हा धोरणात्मक निर्णय राज्य शासन घेत आहे.

----------

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आता दिनांक 15 डिसेंबर, 2014 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.2305 घेण्यात येईल.

**नागपूर येथील पिवळी नदी परिसरातील औद्योगिक वसाहतीला सुविधा पुरविण्याबाबत**

**(२) * २३०५ श्री.अनिल भोसले, श्री.नागो पुंडलिक गाणार :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील पिवळी नदी परिसरातील औद्योगिक वसाहत १९८२ मध्ये स्थापित केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापरिसरातून करोडो रूपये शासनाला विविध टॅक्सच्या माध्यमातून मिळतात, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिसरात १५० कारखाने असूनही त्याठिकाणी रस्ते, गटरलाईन, पाण्याची व्यवस्था नसून याकडे संबंधित विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : 1) होय.

2) होय. राज्य शासनास विक्रीकर व अबकारी कर यापासून उत्पन्न मिळते. तसेच नागपूर महानगरपालिकेस या औद्योगिक वसाहत परिसरातून मालमत्ता कराच्या माध्यमातून उत्पन्न प्राप्त होते.

(3), (4) व (5) या प्रकरणी निश्चित वस्तुस्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीने याबाबत तपासणी करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग या त्रयस्थ यंत्रणेस सूचित करण्यात आले आहे.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, शासनाने दिलेल्या सुधारित उत्तरामुळे माझे समाधान झालेले असल्याने मी उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्य शासनाला विक्री कर आणि अबकारी करापासून उत्पन्न मिळते हे कबूल केले आहे. हा भूखंड एमआयडीसीच्या माध्यमातून विकसित होऊन नागपूर महापालिकेला हस्तांतरित झाला असून 150 कारखाने तेथे अस्तित्वात आहेत. त्या भागामध्ये गटारे, रस्ते, पाण्याची व्यवस्था करणे ही कामे विभागीय आयुक्तांकडे सोवून अहवाल मागविण्यापेक्षा नागपूर महापालिकेला ही कामे हाती घेण्याबाबत सूचित करण्यात येईल काय?

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2305.....

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, ज्यावेळी हे काम करण्यात आले त्यावेळी बेडगे समिती स्थापन करण्यात आली होती. हा संपूर्ण भाग नागपूर सुधार प्रन्यासच्या हद्दीमध्ये आहे. तेथील इन्फ्रास्ट्रक्चर योग्य प्रमाणात झाले की नाही हे तपासून ते योग्य प्रमाणात झाले असेल तर महापालिकेकडे हस्तांतर करायचे. जर योग्य प्रमाणात काम झाले नसेल तर नागपूर सुधार प्रन्यासने ती कामे पूर्ण करुन द्यायची अशाप्रकारे बेडगे समितीचा निर्णय झाला होता. बेडगे समितीने हस्तांतर दाखविले, परंतु तेथील कामे मात्र पूर्ण करण्यात आलेली नाहीत. म्हणून नागपूर सुधार प्रन्यासचे बिल्डिंग कंट्रोल आहे. जी सूचना आपण मांडली आहे त्या अनुषंगाने निश्चितपणे नागपूर सुधार प्रन्यासला सांगण्यात येईल आणि तेथील रस्ते, गटारे इत्यादी इन्फ्रास्ट्रक्चरची डेफिशियन्सी त्यांच्याकडून पूर्ण करण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, नागपूरच्या पिवळी नदी परिसरातील ही खूप जूनी इंडस्ट्रियल इस्टेट आहे. तेथे 185 कारखाने आहेत. पायाभूत सुविधा नसल्यामुळे त्या ठिकाणी नवीन उद्योग यायला तयार नाहीत. तेथील उद्योगांचा योग्य प्रकारे विकास होत नसल्यामुळे योग्य क्षमतेने रोजगार निर्मिती होऊ शकत नाही. या परिसरातील औद्योगिक वसाहतीला सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा पुरवून अधिकाधिक उद्योग तेथे कसे आकृष्ट होतील याकरिता विशेष प्रयत्न केले जातील काय?

नंतर सी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2305 ........

श्री. देवेंद्र फडणवीस : सन्माननीय सदस्यांनी इन्फ्रास्ट्रक्चर डेफिशिएन्सीबाबत जो मुद्दा उपस्थित केला त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, खूप कालावधी लोटलेला असल्याने याचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे व त्यासाठी 5 कोटी खर्चाचा आराखडा तयार करुन तो मान्यही करण्यात आला. त्यातून ही डेफिशिएन्सी पूर्ण करता येईल व ते काम करण्यासाठी आणि हा आराखडा राबविण्यासाठी एनआयटीला निर्देश देण्यात आले आहेत व एनआयटी ते काम पूर्ण करेल.

श्री. प्रकाश गजभिये : महोदय, पिवळी नदीचा परिसर हा उत्तर नागपूरचा परिसर असून या भागाचा विकास झालेला नाही तसेच नागपूर महापालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास या दोन्ही संस्थांकडून हा भाग दुर्लक्षित राहिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी आताच सांगितल्यानुसार ही जबाबदारी नागपूर महानगर पालिकेकडे देऊन त्यांच्याकडून विकास करुन घेण्याचे काम शासन करील काय, तसेच या ठिकाणी विकासाचे काम पूर्ण न झाल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यासकडून हस्तांतर करुन घेण्यास नागपूर महापालिका तयार नाही, ही वस्तुस्थिती आहे. नागपूर उत्तर हा भाग अनुसूचित जातीबहुल भाग असून हा मतदारसंघ सुध्दा अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवण्यात आलेला आहे. माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, या दोन्ही संस्था शासनाच्या अखत्यारित असल्याने शासन नागपूर महापालिकेकडे हे काम सोपविणार आहे काय? तसेच या सभागृहात नागपूर महानगरपालिकेचे दोन माजी महापौर आणि मी स्वत: माजी विरोधी पक्षनेता आम्ही सर्व एकाच सभागृहात त्या काळात होतो त्यामुळे आमचे माजी महापौर व आताचे माननीय मुख्यमंत्री या कामासाठी लागणारा निधी देण्यास नकार देणार नाही अशी माझी खात्री आहे. तसेच हे काम केवळ 5 कोटीत होणारे नसून त्यासाठी 10 कोटी इतका निधी देण्यात येणार काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. अनिल सोले ज्यांनी हा मूळ प्रश्न विचारलेला आहे ते नागपूर महापालिकेचे माजी महापौर आणि सध्या जो प्रश्न विचारलेला आहे ते सन्माननीय सदस्य त्याच सभागृहाचे माजी विरोधी पक्षनेते होते त्यांनी या प्रश्नाला समर्थन दिले आहे. त्यामुळे नागपूर महानगर पालिकेत काम करताना आम्ही सोबत घेऊनच काम करीत होतो

........ 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ........

हे यावरुन लक्षात येते. माझी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये यांना विनंती आहे की, आपण याबाबत जास्त काळजी करु नये आणि हे काम 5 कोटीतच होणारे असून सर्व विचार करुन आणि इंटिग्रेड करुनच हा प्रस्ताव तयार झालेला आहे आणि त्यानुसार हा निधी उपलब्ध करुन देऊन नागपूर सुधार प्रन्यासकडूनच हे काम करुन घेण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : महोदय, पिवळी नदीचा हा परिसर औद्योगिक परिसर असून येथील वस्तुस्थितीदर्शक अहवाल आपण जरुर मागविणार याची मला खात्री आहे. माझा प्रश्न असा आहे की, नागरी वस्तीत मध्यभागी जेव्हा असे कारखाने असतात त्यामुळे प्रदूषणाचे प्रश्न भविष्यात निर्माण होण्याची शक्यता असते. त्याचा विचार करुन पुढील औद्योगिक विकास करताना प्रदूषण नियंत्रण मंडळासारख्या यंत्रणेला बरोबर घेऊन महत्वाचे निकष येथे लावणार काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या प्रश्नाच्या गाभ्याबाहेरचा असला तरी ते ज्येष्ठ सदस्य असल्याने मी सांगू इच्छितो की, या कारखान्यातून कोणत्याही प्रकारचे हेझार्डस मटेरियल डिस्चार्ज होत नाही अथवा तयार होत नाही. तरी देखील आपली सूचना विचारात घेऊन पुन्हा याबाबतची तपासणी करुन उचित कार्यवाही करण्यात येईल.

--------

........ 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुण्यातील चऱ्होली येथील श्री. बालाजी देवथान ट्रस्टच्या मंदिरात झालेली चोरी**

**(१) * ९८ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील चऱ्होली येथील श्री. बालाजी देवस्थान ट्रस्टच्या मंदिरात दरोडेखोरांनी सुरक्षा रक्षकाला मारहाण करुन ५ लाख रुपयांचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेल्याची घटना माहे सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात घडली, हे खरे आहे काय,
(२) तसेच दरोडेखोरांनी केलेल्या मारहाणीत सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर दरोडेखोरांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) , (२), (३) व (४) होय. हे खरे आहे. दिनांक २४.०९.२०१४ रोजी बालाजी मंदीराच्या लगतच्या बंगल्यामधून एकूण ४,५५,२५०/- चा माल चोरट्यांनी जबरदस्तीने चोरून नेला. तसेच एका वॉचमनला लाकडी दांडक्याने मारहाण करून त्याचा खून केला.

सदर घटनेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथे ४ ते ५ अज्ञात इसमांचेविरूध्द गु.र.नं. ३०९/२०१४, भादंवि कलम ३९६,३९७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

श्री. सुनील तटकरे : महोदय, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येचे मारेकरी अद्याप सापडले नसताना पुन्हा दि. 24.9.2014 रोजी म्हणजेच जवळपास 3 महिन्यांपूर्वी पुण्यातील चऱ्होली येथील श्री. बालाजी देवस्थान ट्रस्टच्या मंदिरात दरोडेखोरांनी सुरक्षारक्षकाचा खून करुन 4.45 लाखाचा माल लंपास केला, याबद्दलचा गुन्हा अज्ञात इसमाविरुद नोंदविण्यात आला असून गुन्ह्याचा तपास कोणत्या स्तरावर पोहचला व गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : महोदय, हा गुन्हा घडल्यानंतर श्वान पथकाच्या मदतीने काही लिड मिळते काय हे पाहण्याचा प्रयत्न झाला. तसेच त्यानंतर फिंगर प्रिंट्स सुध्दा घेतल्या पण ही सार्वजनिक जागा असल्याने मिक्स स्वरुपाच्या फिंगर प्रिंटस प्राप्त झाल्या. त्यानंतर जवळपास 38 साक्षीदारांची चौकशी करण्यात आली आणि 22 संशयित गुन्हेगारांच्या घराची झडती घेण्यात आली व त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचेही प्रयत्न झाले. त्याचबरोबर वेगवेगळ्या गुन्हेगारांचे फोटो सुध्दा साक्षीदारांना दाखवून झाले पण अद्याप या गुन्ह्याचा तपास लागलेला नाही. पण हा तपास अधिक तीव्रतेने करण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले : महोदय, पुणे शहराच्या परिसरात असे प्रकार वारंवार घडत आहेत पण अद्यापही आरोपी सापडले नसून तपास सुरु असल्याचे येथे सांगण्यात आले. भविश्यात या देवस्थानची आर्थिक परिस्थिती नसेल तर त्यासाठी आमदार निधी अथवा महानगर पालिकेच्या निधीतून या ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्याबाबत शासन विचार करणार काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना ही केवळ त्या देवस्थानापुरतीच मर्यादित नसून आमदार निधीचा वापर कोठे कोठे करावयाचा असा मुद्दा त्यातून निर्माण होईल. तसेच भविश्यात अनेक प्रश्न यातून उभे राहण्याची शक्यता आहे, त्यामुळे हा एक धोरणात्मक स्वरुपाचा निर्णय असल्याने इतक्या तडकाफडकी हा निर्णय घोषित करता येणार नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांशी चर्चा करुन त्यांची भूमिका समजून घेऊन त्यानंतरच हा निर्णय घेण्यात येईल.

........ 5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 98........

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, पुण्यातील असे अनेक गुन्हे आहेत की, ज्यांचा अद्यापही तपास लागलेला नाही याची माननीय गृहमंत्री व माननीय मुख्यमंत्र्यांनाही कल्पना आहे. मी यापूर्वी देखील पुण्यातील टोळी युध्दाच्या बाबतीत सभागृहात निदर्शनास आणून दिले होते. तसेच पुण्यातील आरुलकर ब्रदर्स आणि डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येचाही तपास लागला नाही. या निमित्ताने माझी अशी विनंती आहे खास करुन अनडिटेक्टेड गुन्ह्यांच्या बाबतीत पुण्यातील सर्व विधानसभा आणि विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्याबरोबर एक बैठक घेऊन पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात चर्चा करावी.

श्री. देवेंद्र फडणवीस : महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सूचना केल्याप्रमाणे जरुर पुण्यातील सन्माननीय सदस्यांबरोबर बैठक घेण्यात येईल.

----------

........ 6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**एमएमआरडीएने तयार केलेल्या नविन नियमावलीस मान्यता देण्याबाबत**

**(२)** * **१३२५** ॲड.अनिल परब : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्वाचा भाग बनलेल्या मेट्रो आणि मोनो सेवेसाठी एमएमआरडीएला लागणाऱ्या परवानग्या आणि न्यायिक प्राधिकरणाच्या कक्षांबाबत स्पष्ट निर्देश असावेत यासाठी एमएमआरडीएने शासनाकडे नवी नियमावली तयार करण्यासंदर्भात पत्रव्यवहार केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सार्वजनिक रस्त्यावरील मेट्रो / मोनो प्रकल्पाच्या स्थानके, डेपो तसेच मेट्रो / मोनो मार्गिकेच्या अनुषंगिक बांधकामांना परवानगी देण्याबाबत स्पष्ट तरतूद नसल्याने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये याबाबत योग्य ते बदल करावेत आणि अशा परवानग्या देण्यासाठी संबंधित प्रकल्प प्राधिकरणास "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नेमण्यात यावे अशी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक १९/११/२०१४ च्या पत्रान्वये शासनास विनंती केली आहे. सदर विनंती शासन स्तरावर तपासण्यात येत आहे.

ॲड. अनिल परब : महोदय, मुंबई शहराच्या विकासाच्या महत्वाच्या टप्प्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था म्हणजे मेट्रो आणि मोनो या दोन महत्वाच्या बाबी असून त्यांचा पुढील विस्तार अथवा परवानग्यांच्या बाबतीत किंवा एखादी माहिती संबंधित ऑथॉरिटी एमएमआरडीए कडे मागितली किंवा एखाद्या नियमांचे व्हायोलेशन झाले असेल, आराखडयापेक्षा जास्त बांधकाम किंवा त्या भागातील लोकांच्या त्रासाच्या संदर्भात माहिती विचारली तर त्याची उत्तरे मिळत नाहीत. याचा अर्थ हे काम कोणत्या ऑथॉरिटीकडे आहे हेच समजत नाही. तसेच कोणत्या ऑथॉरिटीकडून अशा परवानग्या घेण्यात आल्या हेही माहीत नाही अथवा काही डिसप्युट वगैरे झाले किंवा सार्वजनिक बांधकाम अथवा एमआरटीपी कायद्याच्या अंतर्गत काही न्यायिक बाबींवर विवाद निर्माण झाला असल्यास कोणत्या ऑथॉरिटीशी पत्रव्यवहार करावयाचा आणि कोणाकडे परवानगी मागावयाची, याचे पालकत्व कोणाकडे आहे याचा काहीच बोध होत नाही.......

........ नंतर श्री. भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1325....

ॲड.अनिल परब...

त्याचे पालकत्व घेण्यासंबंधीचे निश्चित असे धोरण नाही. यामध्ये न्यायिक बाबी आहेत. तेव्हा याचे पालकत्त्व नेमके कोणाकडे आहे याचे मार्गदर्शन व्हावे अशी आमची मागणी आहे. यासंबंधी शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. यातील पॅरंट ऑथॉरिटी कोण आहे हे शासन आम्हाला किती दिवसात सांगणार आहे ? आम्हाला जर तक्रारी करावयाच्या असतील तर त्या कोणाकडे करायच्या यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा करावा.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, हा मुद्दा उपस्थित होण्याचे कारण म्हणजे ते क्षेत्र मुंबई महानगरपालिकेचे असून तेथे मेट्रोचे काम एमएमआरडीए करीत आहे. येथे मुंबई महागनरपालिकेचीच विकास नियंत्रण नियमावली लागू आहे. अशा प्रकारच्या बांधकामांकरिता एमएमआरडीएने मुंबई महानगरपालिकेकडूनच परवानगी घेतली आहे. एमआरटीपी ॲक्टमध्ये कलम 17(1) आहे. त्यात अधिकार देण्याचे अधिग्रहीत करण्यात आले आहे. त्याचा उपयोग करून एमएमआरडीएला अधिकार देण्यात आला होता. एमएमआरडीएला विशेष नियोजन प्राधिकरण घोषित करायचे किंवा त्यांना वारंवार मुंबईकडे परवानगी घेण्यासाठी पाठवायचे काय असा प्रश्न उपस्थित झाला आहे. आता आपण एलीव्हेटर मेट्रो कॉरिडॉर सुरू केला असून रस्त्याच्या मध्येभागी स्टेशन्स आहेत. या संदर्भात विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तरतूदच नाही. त्यामुळे कलम 17(1) चा अवलंब करून त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. आता आपण अंडर ग्राऊंड आणि ओव्हर हेड मेट्रो मोठ्या प्रमाणावर करीत आहोत. त्यामुळे यात एक्स्प्रेस प्रोव्हीजन्स असल्या पाहिजेत या दृष्टीने एमएमआरडीएने प्रस्ताव दिलेला आहे, तो तपासण्यात येत आहे. आमचे असे मत आहे की, एमएमआरडीएला विशेष नियोजन प्राधिकरण करण्याची आवश्यकता नाही. याचे कारण एमएमआरडीए हे काम स्वत: करीत नाही. त्यांनी एस.पी.व्ही केली आहे. विशेष नियोजन प्राधिकरणाचे अधिकार एस.पी.व्ही.ला देता येतील काय अशाप्रकारचा एक कायदेशीर मुद्दा उपस्थित होणार आहे. आपल्याला कल्पना असेल की, नुकताच हा प्रस्ताव राज्य शासनाकडे आलेला आहे. यासंबंधी कायदेशीर सल्ला पूर्णपणाने आल्यानंतर त्यावर निर्णय घेण्यात येईल. यासंबंधी प्राथमिक दृष्ट्या शासनाचे असे मत की, एमएमआरडीएला विशेष प्राधिकरण घोषित न करता देखील काम करता येईल.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1325....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, अलीकडच्या काळात मुंबई महानगर क्षेत्रात एमएमआरडीने पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. रायगड जिल्ह्याचा रिजनल प्लॅन अस्तित्त्वात असताना सुद्धा सिडकोला शहराचे नियोजन करण्याचे अधिकार शासनाने यापूर्वी दिलेले आहेत. मुंबईत पायाभूत सुविधा एमएमआरडीए मार्फत करण्याचे सूतोवाच माननीय मुख्यमंत्र्यांनी नुकतचे केले आहे. एमएमआरडीएने शासनाला विनंती केली आहे त्या अनुसार शासन निर्णय घेणार आहे काय ? तसेच, पुणे-पिंपरी येथे याच धर्तीवर पीएमआरडीए स्थापन करण्यासाठी शासन निश्चित कालावधीमध्ये निर्णय घेणार आहे काय ? नुकतेच माननीय मुख्यमंत्र्यांनी दिल्ली येथे माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची घोषणा केली आहे. मुंबईचा विकास करण्यासाठी एमआरटीपी ॲक्ट नुसार नेमके अधिकार कोणाकडे रहात आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, याची मेरिटप्रमाणे तपासणी सुरू आहे. विशेष नियोजन प्राधिकरण घोषित केल्यानंतर देखील एस.पी.व्ही.ला ते अधिकार देता येतील काय याचा विचार करण्यात येत आहे. कारण तेथे एस.पी.व्ही.ने काम केले आहे. ते काम एमएमआरडीएने केले नसून एमएमआरडीए त्याचा पार्ट आहे. त्यामुळे एमएमआरडीएला अधिग्रहीत करून मार्ग सुटत नाही. त्यामुळे यासंबंधी कायदेशीर सल्ला मागविण्यात आला आहे. त्यानुसार कारवाई केली जाईल. येथे पुण्यासंबंधातील मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. त्यासंबंधी घोषणा करण्यात आली आहे की, आम्ही तातडीने पीएमआरडीएची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधीचा निश्चित असा निर्णय घेणार आहोत. मुंबईसंबंधी मी माननीय पंतप्रधानांना विनंती केली आहे. मी जे खालच्या सभागृहात सांगितले ते मी येथे देखील सांगतो की, कोणाच्या अधिकारावर आमचा अधीक्षेप करण्याची इच्छा नाही. आज मुंबईचे सर्व पायभूत प्रकल्प केंद्रीय कायद्यामुळे बाधित झालेले आहेत. ट्रान्स हार्बर लिंक आपण 30 वर्षापूर्वी करण्याचा निर्णय घेतला. आजही त्याला सीआरझेड, इको सेन्सेटीव्ह, आणि पर्यावरणाचा कायदा लागू आहे. या तिन्ही कायद्यांची आपल्याला अद्यापि मान्यता मिळालेली नाही. मुंबईतील मेट्रो प्रकल्प, कोस्टल झोन प्रकल्प, एसआरए प्रकल्प आहे त्यासंबंधी आपल्याला दिल्लीला जावे लागते. हे प्रकल्प तेथे

...3

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1325....

श्री.देवेंद्र फडणवीस....

वर्षानुवर्षे पडलेले असतात. त्यामुळे मी माननीय पंतप्रधानांना एवढीच विनंती केली की, आपल्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून केंद्र शासनाकडे मुंबईच्या प्रकल्पांसंबंधातील मान्यतेचे प्रस्ताव पडून आहेत त्यासंबंधी आढावा घ्यावा. आपण माननीय मुख्यमंत्र्यांना नेहमी आढावा घ्यायला का सांगतो ? कारण त्यावेळी सगळी वेगवेगळी खाती एकत्रित आलेली असतात. त्यामुळे मुख्यमंत्री त्यावर निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे तेवढ्या पुरतेच हे मर्यादित आहे. त्याचे स्वागतच झाले पाहिजे. आपले प्रकल्प फास्ट ट्रॅक करण्याचा प्रयत्न आहे. एमआरटीपी ॲक्ट, एमएमआरडीए ॲक्ट, मुंबई महानगरपालिकेचा ॲक्ट यांचा कोणाशीही संबंध नाही, कोणाचाही अधिक्षेप नाही. उलट, त्यांनी पाठविलेले प्रस्ताव लवकर मंजूर करण्यासाठी ही समिती तयार करण्यात आली आहे. माझी विनंती आहे की, याचे आपण स्वागत केले पाहिजे. यावर राजकारण करण्याचे कारण नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे स्पष्टता केली ते बरे झाले. राज्यातील प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित आहेत. त्यासंबंधी माननीय पंतप्रधानांनी आढावा घेऊन निश्चित कालावधीमध्ये माननीय पंतप्रधान परवानगी देणार आहेत हे जे माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचित केले आहे ते राज्याच्या, मुंबईच्या हिताच्या दृष्टीने योग्य आहे. पण त्यादिवशी माननीय मुख्यमंत्र्यांनी जे निवेदन प्रसृत केले त्याचा असा अर्थ ध्वनित होत होता की, या साऱ्या गोष्टींचे नियंत्रण त्या समितीकडे जाणार आहे. आता आपण मुंबई ही महाराष्ट्रातच राहणार आहे याची स्पष्टता दिली असल्यामुळे आम्ही त्याचे मनापासून स्वागत करतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मेट्रो रेल्वे, मोनो रेल्वे ही मुंबईतच नव्हे तर नागपूर आणि पुण्यात देखील व्हावयास पाहिजे. तशा प्रकारची मागणी वजा प्रतिक्रिया माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे दिलेली आहे. एमएमआरडीएने एक प्राधिकरण स्थापन करण्याचे सूचित केले आहे. त्यात त्यांनी काही बदल सुचविलेले आहेत. अशा प्रकारचे प्राधिकरण असले पाहिजे असे त्यांनी सुचविले आहे. कोणतीही अडचण न येता वेगाने काम व्हावे, अशा प्रकारचे प्राधिकरण

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D 4

BGO/ ST/ PFK 11:30

ता.प्र.क्र.1325....

श्री.माणिकराव ठाकरे....

असावे असे त्यांनी सुचविले आहे. तथापि, अशा प्राधिकरणाची गरज पडणार नाही असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. जे विद्यमान नियम आहेत ते पुरेसे आहेत असे देखील त्यांचे म्हणणे आहे. केंद्र शासनाच्या स्तरावर अशा प्रकारच्या प्रकल्पासंबंधी समन्वय असावा म्हणून माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे, अशी देखील माहिती माननीय मुख्यमंत्र्यांनी दिली. माननीय पंतप्रधान आणि माननीय मुख्यमंत्री हे एकाच पक्षाचे आहेत. अशा प्रकारच्या बैठका माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी हे तात्काळ बोलावतात. ज्यावेळी अशा प्रकारची समिती स्थापन करण्याची गरज महाराष्ट्राला पडते त्यावेळी असा अर्थ होतो की, माननीय पंतप्रधान, माननीय मुख्यमंत्र्यांचे ऐकतात की नाही ? शेवटी समन्वय हा असलाच पाहिजे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :1325......

श्री. माणिकराव ठाकरे .....

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना मला विचारावयाचे आहे की, नॅशनल लेव्हलला किंवा माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील समिती न करता दर महिन्याला केंद्रीयस्तरावर बैठक बोलावून आम्हाला सर्व परवानग्या मिळाल्या पाहिजेत अशा प्रकारचा प्रयत्न माननीय मुख्यमंत्री महोदय करणार आहेत काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, यासंदर्भातील संकल्पना का आली त्याची मी थोडक्यात माहिती देतो. सन 2010 साली ज्यावेळेस माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री झाले त्यावेळी त्यांनी कोस्टल रोडची घोषणा त्यांनी केली होती. घोषणा केल्यानंतर त्यांनी प्रस्ताव पाठविला होता. सदर प्रस्ताव पाठविल्यानंतर सन 2011 साली केंद्रसरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने एक नोटीफिकेशन काढून कोस्टल रोडचा त्यामध्ये समावेश केला नाही. कोस्टल रोड करता येणार नाही अशा प्रकारची तरतूद नोटीफिकेशनमध्ये केली. त्यावेळी येथेही काँग्रेसचे मुख्यमंत्री होते व तेथेही काँग्रेसचे पंतप्रधान होते. परंतु तरी देखील सन 2011 ते 2014 सालापर्यंत माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेब कोस्टल रोडसाठी सातत्याने पाठपुरावा करीत होते परंतु तरीही कोस्टलरोडच्या नोटीफिकेशनमध्ये बदल झाला नाही. अशीच परिस्थिती मुंबईतील वेगवेगळया प्रकल्पांच्या संदर्भात झाली होती. या ठिकाणी मी स्पष्टपणे सांगितले आहे की, मुंबईची आणि इतर राज्यांची परिस्थिती वेगळी आहे. मुंबई ही कोस्टल सिटी असल्यामुळे मुंबईच्या सर्व प्रकल्पाच्या बाबतीतील फाईल्स केंद्राकडेच जात असतात. केंद्रीय कायद्याच्या माध्यमातून तातडीने परवानग्या मिळाल्या पाहिजेत याकरिता आम्ही जर माननीय पंतप्रधांच्या अध्यक्षतेखालील समितीची मागणी केली तर त्यात आमचे काय चुकले ? पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली समिती मागितली असता सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे महणत आहेत की, दर महिन्याला बैठक घ्या. आपण अकारण राजकारण कशा करिता करीत आहात. यापूर्वीचा अनुभव काय आहे त्यातून आपण काही शिकले पाहिजे. यापूर्वीचे सर्व प्रकल्प दिल्लीमध्ये अडलेले आहेत अशी परिस्थिती आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी किती तरी वेळा दिल्लीमध्ये पाठपुरावा केला होता परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला आपल्याला परवानगी मिळू शकली नाही. परंतु

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :1325......

श्री. देवेंद्र फडणवीस.......
आमचे सरकार आल्याबरोबर आमच्या सरकारच्या पर्यावरण विभागाने लागलीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला मान्यता दिली आहे. आपण जर राजकीय दृष्टीकोन ठेवून प्रश्न विचारीत असाल तर त्याला आमच्याकडून राजकीयच उत्तर मिळेल. आपण सर्वजण राज्याच्या विकासासाठी काम करीत आहोत. माननीय पंतप्रधानांनी सांगितले आहे की, मुंबई महाराष्ट्रापासून कोणीही वेगळी करु शकत नाही. मुंबई कालही महाराष्ट्राची होती, आजही आहे आणि उद्याही महाराष्ट्राचीच राहणार आहे. त्यामुळे आपण अकारण राजकारण करु नका. मुंबईच्या विकासासाठी आपण सर्वांनी एकत्रित येऊन काम करण्याची आवश्यकता आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकणी मागच्या काळात कोस्टलरोडला पर्यावरण विभागाने परवानगी दिली नाही असा उल्लेख केला आहे. परंतु यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, त्यावेळी पर्यावरण खात्याच्या प्रमुखांना तात्काळ बाजूला जावे लागले होते त्यामुळे.. ..

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, ते बाजूला जाऊनही कोस्टल रोडला परवानगी मिळाली नाही.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, परवानग्यांची कामे एखाद्या मंत्र्यांकडून थांबत नाहीत. एखादा निर्णय चुकीचा होऊ शकतो परंतु त्याचा आधार घेऊन जर अशा प्रकारे प्राधिकरण स्थापण्याचा प्रयत्न केला तर तो मुंबईला तोडण्याचा प्रयत्न होईल. मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे ते पहिले पाऊल ठरेल. त्यामुळे अशा प्रकारचा कोणताही निर्णय होता कामा नये.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी उभे राहतात.)

**सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. आता मी पुढील प्रश्न पुकारीत आहे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांच्या प्रश्नाला मला जेवढा न्याय देणे शक्य होते तेवढा न्याय देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. प्रत्येक प्रश्नाला आपल्याला ठरावीक वेळ देता येतो. आपल्याला जर हाच प्रश्न सन्माननीय मुख्यमंत्र्यांना विचारावयाचा असेल तर तो प्रश्न आपण माननीय मुख्यमंत्र्यांकडे जरूर मांडावा. सन्माननीय मुख्यमंत्री आपल्या बरोबर याबाबतीत एखादी बैठकही घेतील. आता मी पुढील प्रश्न पुकारीत आहे.

--

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे येथील धर्मादाय आयुक्तालयात हजारो दावे वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याबाबत**

**(३) * ९५९ श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील धर्मादाय आयुक्तालयात अनेक खटले बऱ्याच वर्षापासून निर्णयाच्या अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदरील खटले जलदगतीने निकालात काढण्यासाठी संस्थेच्या पदाधिका-यांना अनेकदा ये जा करावी लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत न्यायीक स्वरुपाचे कामकाज चालते. न्यायीक कामकाज करताना आवश्यक ती कागदपत्रे घेवून निर्णय घेणे अपेक्षित असते. धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांनी जून २०१४ ते नोव्हेंबर २०१४ पर्यंत १९० प्रकरणे निकाली काढलेली आहेत. तसेच धर्मादाय सह आयुक्तांचे केवळ प्रशासकीय नियंत्रण शासनाकडे असून न्यायिक कामकाजावरील देखरेख मा.उच्च न्यायालयामार्फत केली जाते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. अनंत गाडगीळ : सभापती महोदय, उत्तरात म्हटल्याप्रमाणे पुण्याच्या धर्मादाय आयुक्तालयामध्ये गेल्या सहा महिन्यात फक्त 190 प्रकरणे निकाली निघाली आहेत. याचा अर्थ दिवसाला फक्त एक प्रकरण एक निकाली निघाले होते. यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, पुण्याच्या धर्मादाय आयक्तालयात किती संस्थांची नोंद झालेली आहे, या ठिकाणी आयुक्त, उपायुक्त, कर्मचारी इत्यादींची किती संख्या आहे, आज प्रत्यक्षात किती पदे रिक्त आहेत, चेंज रिपोर्टच्या बाबतीत अधिकारी लवकर निर्णय देत नसल्यामुळे प्रलंबित प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे असा खोडसाळपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत सरकार कोणता निर्णय घेणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, पुणे येथील धर्मादाय आयुक्त कार्यालयामध्ये आयुक्तांचे मंजूर पद 1 असून भरलेले पद 1 आहे. सह आयुक्तांची मंजूर पदे 10 असून त्यापैकी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :959

8 पदे भरलेली आहेत. उपायुक्तांची मंजूर पदे 17 असून भरलेली पदे 12 आहेत. सहाय्यक धर्मादाय आयक्तांची मंजूर पदे 82 असून भरलेली पदे 25 आहेत. पुणे येथील धर्मादाय आयुक्तालयामध्ये सहाय्यक धर्मादाय आयुक्तांची पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत ही वस्तुस्थिती आहे. प्रलंबित बाबीमध्ये 623 प्रकरणे सुनावणीकरिता प्रलंबित आहेत. केवळ पुणे येथील धर्मादाय आयुक्तालयातच नाही तर संपूर्ण राज्यातील धर्मादाय आयुक्तालयात प्रलंबित प्रकरणांची संख्या सातत्याने वाढ होत आहे. साधा चेंज रिपोर्ट सादर करावयाचा म्हटला तर असा चेंज रिपोर्ट मंजूर होण्याकरिता फार वेळ लागत असतो. त्यामुळे यासंदर्भात आम्ही माननीय उच्च न्यायालयाला विनंती करणार आहोत. यावर आपल्याला न्यायीक अधिकार नसून अर्धन्यायीक प्रकरणे या ठिकाणी चालत असते. आपण फक्त प्रशासकीय मान्यता देण्याचे काम करीत असतो. त्यामुळे यासंदर्भात आम्ही माननीय उच्च न्यायालयाला विनंती करु की, हे एक्सपीडाईट करण्याच्या संदर्भात त्यांना सांगू त्याच बरोबर त्यांनाही अशीही विनंती करु की, एका निश्चित कालावधीमध्ये प्रकरणांचा निपटारा होण्याचे टार्गेट उच्च न्यायालयाने दिले पाहिजेत. मुंबई पब्लीक ट्रस्ट ॲक्ट आहे त्यामध्ये काही आवश्क ते बदल करण्याची आवश्यकता आहे. ट्रस्टचे जे काही विषय असतात त्यांचा वर्षानुवर्षे निर्णय होत नाही. यामध्ये एखादा चुकीचा चेंज रिपोर्ट ॲक्सेप्ट झाला तर केस डिसाईड होईपर्यंत त्या संपत्तीची विल्हेवाट लागलेली असते. त्यामुळे अशा प्रकारच्या बऱ्याच डेफिशिअन्सी त्यामध्ये असल्यामुळे शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे. या कायद्यामध्ये वेगाने निर्णय मिळाला पाहिजे यादृष्टीने जे जे बदल करणे आवश्यक आहे ते ते बदल करण्यासाठी समितीची स्थापना करेल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या कायद्यामध्ये सुधारणांची गरज असल्याची माहिती दिलेली असून ही स्वागतार्ह बाब आहे. या विभागावर शासनाचे प्रशासकीय नियंत्रण असते. त्यामुळे या कार्यालयांना आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधाची माहिती आता देण्यात आली आहे. परंतु वेगवगळया जिल्हयामध्ये धर्मादाय आयुक्तांची जी कार्यालये आहेत त्या ठिकाणी बसण्यासाठी धड खूर्च्या देखील नसतात. धर्मादाय आयुक्तालयामध्ये स्टेशनरी नसल्यामुळे बऱ्याच वेळा संस्थांनाच स्टेशनरी द्यावी लागते अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री. अजित........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 959...

श्री.हेमंत टकले....

धर्मदाय आयुक्तांकडे तांडे नोंद होणारे जे क्लासिफीकेशन्स आहेत, त्यामध्ये फार वेगवेगळे प्रकार आहेत. त्यामध्ये ज्यामध्ये जमिनींची किंवा देवस्थानच्या जमिनींची प्रकरणे असतील त्यासाठी वेगळा भाग आहे. काही त्यामध्ये फॅमिली होल्ड ट्रस्टसाठी आहेत त्याचा भाग वेगळा भाग आहे. धर्मदाय आयुक्तांकडे अपंगांच्या कल्याणासाठी धर्मदाय आयुक्तांकडे ज्या संस्था रजिस्टर्ड झालेल्या आहेत. ज्या संस्था पण अशा संस्थांकडून बाकीच्याकडून काही होत असेल ते होण्याची शक्यता नसते. चांगल्या सामाजिक कामासाठी ज्या संस्था रजिस्टर्ड झालेल्या आहेत त्यांची वेगळी वर्गवारी करुन आपल्या प्रशासकीय नियंत्रणामार्फत या कामकाज पद्धतीमध्ये काही बदल सुचविणार आहात काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, –सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेली सूचना स्वागतार्ह आहे. –या संदर्भात राज्य शासनाला जे काही करता येणे शक्य आहे ते निश्चितपणे करण्यात येईल. जर –काही कार्यालयामध्ये काही कमतरता असेल तर त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने सूचना देण्यात येतील. जर निधीची कमतरता असेल तर तो देखील उपलब्ध करुन देण्यात येईल. आमच्या माननीय उच्च न्यायालयाबरोबर सातत्याने बैठका होत असतात. या बैठकीतून कुठे कोणत्या प्रकारच्या चे –इन्स्फ्रास्ट्रक्चरची आवश्यकता आहे हे समजतेत्यांच्यामार्फत सांगितले जाते –आणि आपण ते इन्स्फ्रास्ट्रक्चर– उपलब्ध देखील करुन देतो. –आपण नुकताच न्यायालयातील 20 टक्के पदे वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे आणि जवळपास 700 न्यायाधीशांच्या नियुक्तीस मागील आठवड्यात मान्यता देखीलखील दिलेली आहे. जोपर्यंत न्यायदानाचे काम वेगाने होतणार नाही तोपर्यंत आपण कायदा आणि सुव्यस्था प्रस्थापित करु शकत नाही. त्यादृष्टीने आपण कार्यवाही करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, यामध्ये वेगवेगळी वर्गवारी करता येईल काय असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. आहे. ती बाब तपासून पाहण्यात येईल. जर ती बाब करता येणे शक्य असेल तर ती जरूर करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,– राज्यामध्ये धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे ज्या संस्थांची नोंदणी होते– त्यामध्ये 73 टक्के संस्था या शैक्षणिक संस्था आहेत. शैक्षणिक संस्थांचे चेंज रिपोर्ट आणि त्या संदर्भात असलेल्या वादाच्या बाबतीत –संदर्भात लवकर निर्णय होत नसल्यामुळे न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

~~झाल्यामुळे~~ अनेक अडचणी निर्माण होतात. तेव्हा शैक्षणिक संस्थांचे नियंत्रण करण्यासाठी शासन वेगळे धर्मदाय आयुक्त स्थापन करणार आहे~~त~~ का ?

..2..



ता.प्र.क्र. 959...

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, शासनाचा सध्या तरी असा कोणाताही विचार नाही. ~~परंतु~~ सन्माननीय सदस्यांनी ~~या ठिकाणी ज~~शैक्षणिक संस्थांचे वाद मिटविण्यासाठी वेळ लागतो अशी ~~ही~~ भूमिका मांडलेली आहे. ~~क~~त्याबाबत सांगू इच्छितो की, ~~ी शैक्षणिक संस्थांचे वाद मिटविण्यासाठी वेळ लागतो.~~ धर्मदाय आयुक्त कार्यालयामध्ये दोन प्रकारचे वाद जास्त प्रमाणावर आहेत. पहिला प्रकार म्हणजे प्रायव्हेट ट्रस्टच्या संदर्भातील वाद आणि दुसरा प्रकार हा शैक्षणिक संस्थांच्या संदर्भातील वाद. धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे शैक्षणिक संस्थाचे मोठ्या प्रमाणावर वाद आहेत. हे वाद एक्स्पीडाईट करण्याच्या संदर्भातील व्यवस्था निश्चितपणे तपासण्यात येऊन त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Formatted: Left

**नाशिकमध्ये मेट्रो रेल्वे किंवा रॅपीड रेल सुरु करणेबाबत**

**(४) * ७७५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ४९४७० ला दिनांक ११ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगराचा वाढता विस्तार पाहता नाशिकमध्ये मेट्रो रेल्वे किंवा रॅपीड रेल सुरु करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या समन्वयाने कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक शहर वाहतुक सेवेच्या मर्यादा, वाहनांची वाढलेली संख्या त्यामुळे वारंवार होणारी वाहतुकीची कोंडी, वेळ, आर्थिक आणि इंधनाची होणारी हानी या पार्श्वभूमीवर नाशिक मेट्रो रेल्वे संदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, उक्त कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नाशिक शहरातील नागरी वाहतुकी विषयक सर्वकष अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेस सुचित करण्यात आले आहे. सदर सर्वकष वाहतुक अभ्यास अहवाल तयार झाल्यावर त्यातील शिफारशीनुसार नाशिक शहरासाठी मेट्रो रेल्वेची आवश्यकता निश्चित करणे शक्य होईल.

Formatted: No widow/orphan control, Don't adjust space between Latin and Asian text, Don't adjust space between Asian text and numbers

---------------

Formatted: No widow/orphan control, Don't adjust space between Latin and Asian text, Don't adjust space between Asian text and numbers
Formatted: Line spacing: 1.5 lines

डॉ.अपुर्व हिरे : सभापती महोदय, नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये मेट्रो रेल किंवा रॅपीड रेल सुरु करण्यासंदर्भातील प्रश्न मी विचारलेला आहे. नाशिक शहरातील वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत असल्यामुळे रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होत आहे. नाशिक महानगरपालिका क्षेत्रात बस सेवा पुरेशा प्रमाणात नाही. तेव्हा भविष्याचा विचार करुन नाशिक महानगरपालिका क्षेत्रात मेट्रो रेल किंवा रॅपीड रेल सुरु करण्याचा शासनाचा विचार आहे काय आणि त्याबाबत शासन लवकरात लवकर निर्णय घेईल काय ? –

Formatted: Font: 16 pt, Complex Script Font: 16 pt, (Complex) Hebrew

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, नाशिक शहरातील वाहतुकीचा सर्वंकष अहवाल तयार करण्याच्या सूचना नाशिक महानगरपालिकेला देण्यात आलेल्या आहेत. आपण ट्रॅफिकची मुव्हमेंट सीमलेस करण्याच्या दृष्टीकोनातून इंटीग्रेशन करीत नाही तोपर्यत आपण ट्रॅफिकचा कोणता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोड घेतला पाहिजे याचा निर्णय घेऊ शकत नाही. आपण ज्यावेळी एखाद्या शहराचे प्लानिंग करतो त्यामध्ये वेगवेगळ्या ट्रॅान्सपोर्ट मोडचे इंटिग्रेशन करावे लागते. त्या ठिकाणी बस सेवा उपलब्ध असेल तर त्याच्याशी मेट्रो इंटिग्रेट करावी लागते. कोणत्या ठिकाणी बस फिडर





ता.प्र.क्र.775....

डॉ.अपूर्व हिरे...

म्हणून काम करेल आणि कोणत्या ठिकाणी बस इव्हॅल्युकेटर म्हणून काम करेल याबाबत निर्णय घ्यावा लागतो. तेव्हा सर्वप्रथम ट्रॅफिक प्लान तयार करावा लागतो. असा प्लान तयार झाल्यानंतर नाशिक शहरामध्ये मेट्रो रेलची आवश्यकता असेल आणि त्याची फिजिबीलिटी होत असेल तर त्याबाबत सरकार सकारात्मक आहे आणि तसा निर्णय घेण्यात येईल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, नाशिक महानगरपालिकेला आपल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही बदल करावे लागतील. मुंबई महानगरपालिकेचा ॲक्ट वेगळा आहे. उर्वरित महानगरपालिकांचा ॲक्ट वेगळा आहे. आपण विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करुन मोनो आणि मेट्रो रेलच्या संदर्भात काही निर्णय घेतले तर ते फक्त एका विशिष्ट महानगरपालिकेपुरता होतील. नागपूरमध्ये इम्प्रुमेंन्ट ट्रस्टमुळे देखील विकास कामाला अडचणी निर्माण होतात. कोणत्याही संस्थेची स्वायत्ता न जाता मोनो आणि मेट्रो करिता या दोन्ही ॲक्टमध्ये बदल केला तर राज्यासाठी ते सुसंगत धोरण ठरेल. तेव्हा या संदर्भात राज्य शासन निर्णय घेईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या दोन ॲक्टमध्ये वाहतुकी संदर्भात वेगवेगळ्या तरतुदी आहेत. मुंबईमध्ये कायदा करुन ट्रामची व्यवस्था करण्यात आली होती. जर कायद्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता असेल तर तो केला जाईल, परंतु आता तशी आवश्यकता वाटत नाही. कारण आताच्या ॲक्टमध्ये तशा तरतुदी आहेत. त्या तरतुदी लागू करायच्या असतील तर त्याकरिता नियम असले पाहिजेत. ते नियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये घ्यावे लागतात. रस्त्याच्या मध्यभागी बांधकाम करायचे असेल तर रस्त्याच्या दोन्ही बाजूला किती जागा सोडावी लागेल, त्या ठिकाणी जागेचा कमर्शिअल वापर करण्यास परवानगी द्यायची किंवा कशी हा देखील प्रश्न आहे, जर परवानगी द्यायची असेल तर ती किती टक्क्यापर्यंत द्यायची असे सर्व निर्णय एकत्रितपणे घ्यावे लागतात आणि ते शहर स्पेसिफीक निर्णय आहेत. समजा मुंबई शहरामध्ये 36 मीटरचे रस्ते

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असतील आणि नाशिक शहरामध्ये 18 मीटरचे रस्ते असतील तर 18 मीटरच्या रस्त्याच्या अनुषंगाने आपल्याला विचार करावा लागेल. आपण कायद्यानंतर विकास नियंत्रण

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.775....

श्री.देवेंद्र फडणवीस....

नियमावली तयार करतो त्यामध्ये मूळ तत्व एक असते. पण त्यातील प्रोव्हीजन्स शहर स्पेसिफीक असतात. महानगरपालिकांना आवश्यकता असेल तर तशाप्रकारचा know-how शासन उपलब्ध करुन देईल. या संदर्भात काही गाईड लाईन्स तयार करुन ज्या महानगरपालिका क्षेत्रात मेट्रो रेलची कामे होत आहेत त्या ठिकाणी त्यांनी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल केले पाहिजेत या संदर्भात गाईडन्स आणि सूचना राज्य सरकार निश्चितपणे देईल.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, नाशिक शहराचे तत्कालीन खासदार श्री.समीर भुजबळ यांनी तत्कालीन केंद्रीय मंत्री महोदयांना नाशिक शहरात मेट्रो रेल सुरु करण्यासाठी सर्वेक्षण करण्याबाबत विनंती केली होती आणि त्यास त्यांनी तत्वत: मान्यता दिली होती याची शासनास काही माहिती आहे काय ? या सर्वेक्षणाबद्दल शासनाने काही पावले उचलली आहेत काय ? नाशिक शहरामध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार असल्यामुळे आपण नाशिक महानगरपालिकेला वाहतुकीच्या संदर्भात एक आराखडा तयार करण्यास सांगितलेले आहे. त्या वाहतूक आराखड्याची कुंभमेळा सुरु होण्यापूर्वी अंमलबजावणी होणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, महानगरपालिकेने प्रकल्प अहवाल तयार करायचा असल्यामुळे महानगरपालिकेने सर्वेक्षण करायचे आहे. आम्ही महानगरपालिकेला वाहतूक आराखडा तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. कुंभमेळ्याच्या वेळी वाहतूक सीमलेस होण्यासाठी पोलीस विभाग आणि वेगवेगळ्या ऑथॉरिटीज प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी बैठका होत आहेत, आपण देखील बैठकीला हजर होता. मागील वेळी कोठे व कशा घटना घडल्या होत्या या सर्व बाबींचा विचार केलेला आहे. तेथील परमनन्ट ट्रॅफिक प्लान महानगरपालिका तयार करणार आहे. नाशिक येथे कुंभमेळ्याच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर भाविक येतील हे विचारात घेऊन स्वतंत्र ट्रॅफिक प्लान तयार होत आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Formatted

**सभापती** : आता दुपारचे 12.00 वाजलेले आहेत. नियोजित वेळेनुसार प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. परंतु सुरुवातीला अन्य एका कामामुळे 9 मिनिटे वाया गेल्यामुळे मी प्रश्नोत्तराचा तास 9 मिनिटांनी वाढवित आहे.

**ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील जावसई गावांत १० वर्षाच्या मुलीला विवस्त्र करुन मारहाण केल्याबाबत**

**(५) * २१२** ॲड.**जयदेव गायकवाड, श्री.सुनील तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील जावसई गावांत १० वर्षाच्या मुलीला विवस्त्र करुन मारहाण केल्याची घटना दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास घडली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मुलीला मारहाण करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर घटना दिनांक २८.०७.२०१४
(२) होय.
(३) सदर प्रकरणी फिर्यादीवरून अंबरनाथ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२००/२०१४, भा.दं.वि.कलम ४५२,३६३,३५४,३९४,३०७,३२४,४२७,३४ सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा - २०१२ चे कलम ४ व ८ अन्वये दिनांक २८.०७.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये तीन आरोपी निष्पण्ण झाले असून, त्यापैकी एका आरोपीस दिनांक ०२.०९.२०१४ रोजी अटक आहे. उर्वरित दोन आरोपींना मा.न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, दुर्दैवाने आपल्या राज्यात आणि देशात अशा प्रकारच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडल्याचे चित्र बघायला मिळते. दिनांक 28 जुलै, 2014 रोजी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.212....

श्री.सुनील तटकरे...

या प्रकरणी गुन्हा दाखल झाला. या गुन्ह्याच्या तपासामध्ये तीन आरोपी निष्पन्न झाले. या प्रकरणात पोलीस दलाचे अपयश आहे काय हे मला माहीत नाही. परंतु या गुन्ह्यातील तीन आरोपींपैकी एका आरोपीला दिनांक 2 सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली आणि उरलेल्या दोन आरोपींना न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला. ही बाब अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणी माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालणे आवश्यक आहे. 10 वर्षाच्या लहान मुलीवर अन्याय झाल्यानंतर या गुन्ह्यामध्ये तीन आरोपी निष्पन्न होतात. परंतु त्यातील दोन आरोपींना अटकपूर्व जामीन मिळतो ही बाब या राज्य सरकारला भूषणावह नाही. या निमित्ताने मी विचारतो की, या आरोपींना मिळालेला अटकपूर्व जामीन रद्द करण्याबाबत शासनाकडून सत्वर कार्यवाही करण्यात येईल काय आणि हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून या संदर्भातील कारवाई मर्यादित कालावधीत करण्यात येईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : महोदय, ज्या महिलेने तक्रार केली आहे तिच्याकडे एका स्कीममधील खोली होती. अगोदर त्या महिलेच्या पतीकडे तेथील चौकीदाराचे काम होते. ती खोली खाली करण्यासाठी आरोपींनी तीन-चार माणसे त्या खोलीमध्ये घुसविली आणि त्यात ही घटना घडली. त्यानंतर त्या महिलेने फिर्याद दाखल केली की, खोली खाली करण्यासाठी आलेल्या लोकांनी मुलीला विवस्त्र करुन तिला तेथे फिरविले. फिर्याद दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल केला. या प्रकरणी जी कलमे लावणे अपेक्षित होते ती सर्व लावली आणि तातडीने एका गुन्हेगाराला अटक केली. इतर दोन गुन्हेगार त्यावेळी निष्पन्न होऊ शकले नाही आणि त्यामुळे त्यांनी तातडीने अटकपूर्व जामीन मिळविला. पोलीस विभागाने तातडीने हा जामीन रद्द करण्यासाठी न्यायालयात अपील दाखल केले. या प्रकरणी अटकपूर्व जामीन रद्द करण्यासाठी जी कार्यवाही करणे गरजेचे आहे ती सर्व करण्यात येईल. सध्या हे प्रकरण चार्जशीटच्या स्टेजला येत आहे. अशी प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्यासाठी सरकारने विशेष न्यायालयांची स्थापना केलेली आहे. त्यामुळे हा खटला विशेष न्यायालयाकडे वर्ग करण्याची विनंती उच्च न्यायालयाला करण्यात येईल.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, बाल संरक्षण अधिनियम जोपर्यंत नव्हता तोपर्यंत हा प्रश्न सातत्याने येत होता की, आरोपी जामिनावर सुटतील काय, त्यांना अटकपूर्व जामीन मिळेल काय. परंतु पॉस्को कायदा केल्यानंतर अशा प्रकरणांतील आरोपींना जामीन आणि अटकपूर्वक जामीन मिळत नाही. त्यामुळे या संदर्भात आपण न्यायालयाला प्रश्न विचारु शकत नाही. पॉस्को कायद्यांतर्गत आरोपींना जामीन मिळत नाही ही बाब शासनाच्या वकिलांनी न्यायालयात व्यवस्थित मांडली नसावी असे मला वाटते. बाल संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल केल्यानंतर आरोपींना जामीन मिळत नाही किंवा अटकपूर्व जामिनाला विरोध करता येतो या बाबतची माहिती सरकारी वकिलांना देण्यासाठी शासन कार्यक्रम घेईल काय ? उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 6 डिसेंबर पासून कोणताही गुन्हा घडला की, फिर्यादी आणि विशेषत: पीडित महिला, बालिका यांची नावे जाहीर करता येत नाहीत आणि ही बाब योग्य आहे. या बरोबरच आरोपींची नावे जाहीर केली जाणार नाहीत असे उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. परंतु या बाबत पोलिसांच्या प्रसिध्दी पत्रकात उल्लेख नसतो. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात गुन्हा नंबर नमूद केलेला आहे. पोलिसांच्या प्रसिध्दी पत्रकात आरोपींची नावे जाहीर केली जाणार नसल्यामुळे त्या प्रसिध्दी पत्रकात गुन्ह्याच्या नंबरचा अंतर्भाव करणार काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत तशा प्रकारचा आदेश देण्यात येईल. पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, शासनाच्या वकिलांना पॉस्को कायदा माहीत नाही अशी शक्यता नाही. जर त्यांना हा कायदा माहीत नसेल तर ते वकील त्या ठिकाणी नेमण्याच्या लायकीचे नाहीत. या प्रकरणात वकिलांनी सरकारची बाजू नीटपणे मांडली की नाही हे तपासून बघितले जाईल. अलीकडे उच्च न्यायालय अशा प्रकरणांच्या बाबतीत खूप सेन्सेटीव्ह आहे. ज्या गुन्ह्यांच्या बाबतीत आरोपींना जामीन देता येत नाही त्या गुन्ह्यांमध्ये आरोपींना जामीन देण्यात आला असेल तर ती बाब उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यास उच्च न्यायालय संबंधित न्यायाधीशांवर कारवाई करते. सरकार या प्रकरणी उच्च न्यायालयात गेले आहे. या प्रकरणातील आरोपींना दिलेला जामीन तरतुदीनुसार नसेल तर उच्च न्यायालय त्या संदर्भात आदेश देऊन अटकपूर्व जामीन रद्द करेल.

---------



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील साकीनाका येथील चांदिवलीतील क्लिक निक्सन**
**या स्टुडिओला लागलेल्या आगीबाबत**

**(६) * ९ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील साकीनाका येथील चांदिवलीतील क्लिक निक्सन या स्टुडिओला दिनांक २४ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास भीषण आग लागल्याने मोठया प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर घटनेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) होय. सदर आगीच्या चौकशी दरम्यान आग "सदोष विद्युत प्रणाली" मुळे लागली असल्याचे आढळले. सदर स्टुडिओकडे अग्निशमन दलाचे अग्नि प्रतिबंधक सुरक्षा उपाययोजनेसंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र नसल्याचे आढळून आले व कोणतीही कायमस्वरुपी अग्निशमन उपाययोजना आढळली नाही. सदर इमारतीस महाराष्ट्र राज्य अग्नि प्रतिबंधक व जीव सरंक्षक उपाययोजना २००६ अन्वये दिनांक ०२.१२.२०१४ रोजी नोटीस बजाविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सरकारने पाठविलेल्या नोटीसच्या अनुषंगाने संबंधित स्टुडिओने खुलासा केला आहे काय, नसल्यास, त्यांनी किती दिवसांत खुलासा सादर करणे अपेक्षित होते ? तसेच या प्रकरणी जो आर्थिक व्यवहार झाला आहे तो संशयास्पद आहे. बाहेर अशी चर्चा आहे की, या स्टुडिओला आग लागली नाही तर लावण्यात आलेली आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, या संपूर्ण पार्श्वभूमीवर शासनाकडून या प्रकरणाची सी.आय.डी.चौकशी करण्यात येईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9....

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, उपलब्ध माहितीनुसार ही आॅग शॉर्टसर्कीटमुळे लागल्याचे निष्पन्न झाले आहे. ही इमारत खूप जुनी आहे. त्यामुळे या इमारतीला फायर सेफ्टीचा नवीन कायदा लागू नव्हता. ही इमारत एक अधिक एक अशी दुमजली आहे. जुन्या फायर सेफ्टीच्या नॉर्म्सनुसार त्यांना परवानगी दिली होती. अलीकडच्या कालखंडात आपण या बाबतीत नियम बदलले आहेत. त्या इमारतीमध्ये शॉर्टसर्कीटमुळे आग लागल्याचे निष्पन्न झाले आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांच्याकडे या संदर्भातील विशिष्ट माहिती असेल तर ती माहिती प्राप्त करुन घेऊ आणि त्या माहितीच्या आधारे आवश्यकता असेल तर हे प्रकरण चौकशीसाठी सी.आय.डी. कडे देण्यास शासन मागेपुढे पाहणार नाही. संबंधित स्टुडिओला खुलासा सादर करण्यासाठी नोटीस दिलेली आहे. अजूनपर्यंत त्यांच्याकडून खुलासा आलेला नाही. त्यांनी विहित मुदतीत खुलासा केला की नाही हे मी तपासून बघेन. विहित मुदतीत खुलासा केला नसेल त्यांच्यावर पुढील कारवाई तातडीने करण्यात येईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील धुपप्रतिबंधक बंधारे व जेट्टीची कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(७) * ६३८ श्री.जयंत पाटील** :सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग विधानसभा मतदार संघातील मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील राजपूरी येथील प्रवाशी जेट्टी व काशिद येथील धुपप्रतिबंधक बंधारे इत्यादी कामांची ठेकेदारी निश्चित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे पूर्ण करण्यासाठी निविदा शर्तीनुसार ठेकेदारांना किती कालावधी देण्यात आला आहे,
(३) कालावधीत काम पूर्ण न केल्याने निविदा शर्तीनुसार संबंधीत ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राजपुरी येथे प्रवासी जेटी बांधणे या कामासाठी ठेकेदार निश्चित करण्यात आला आहे.

काशिद येथे धुप प्रतिबंधक बंधारा बांधण्याचे काम १३ व्या वित्त आयोगांतर्गत करावयाच्या कामांमध्ये समाविष्ट केले आहे. सदरहू कामाचा पर्यावरण आघात अभ्यास (Environment Impact Assessment) करून अभ्यास अहवाल महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथरीटी (MCZMA) यांचेकडे सादर केला आहे. M.C.Z.M.A. यांचेकडून या कामास परवानगी (clearance) मिळाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्यात येणार असल्याने या कामासाठी ठेकेदार निश्चित करण्यात आलेला नाही.
(२) निविदा शर्तीनुसार राजपुरी येथे प्रवासी जेटी बांधण्याचे काम पूर्ण करण्याचा कालावधी १५ महिने (जून, २०१५ पर्यंत) आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राजपुरी जेट्टी अंतर्गत मुरुड तालुक्यातील राजपुरी गाव ते किल्ला या दरम्यान प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर होते. परंतु या भागात धूपप्रतिबंधक बंधारे आणि जेट्टीची कामे अपूर्ण असल्यामुळे आजपर्यंत 45 लोक मृत्युमुखी पडले आहेत. या जेट्टीच्या कामांबाबत तीन वेळा निविदा काढण्यात आल्या. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की,



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.638....

श्री.जयंत प्र.पाटील....

सध्या जी निविदा काढलेली आहे ती किती रकमेची आहे, काम पूर्ण करण्याचा कालावधी किती आहे, तसेच हे काम किती दिवसात पूर्ण होईल ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या अंतर्गत दोन प्रकारची कामे असतात. ऑन शोअर काम एकूण 8 कोटी 97 लाख रुपयांचे आहे. या कामांवर 2 कोटी 61 लाख रुपये खर्च केले आहेत. तसेच ऑफ शोअरचे काम 7 कोटी 90 लाख रुपयांचे आहे. हे सुध्दा काम देण्यात आलेले आहे. आतापर्यंत ऑफ शोअरच्या कामांवर 77 लाख रुपये खर्च झाले आहेत. कार्यादेश देऊन जे काम सुरु आहे ते काम पूर्ण करण्याचा कालावधी कार्यादेश निर्गमित झाल्यापासून 15 महिन्यांचा होता. सदरहू काम त्यांना मे-2015 पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. सरकारने जी माहिती घेतली आहे त्यानुसार साधारणतः विहित मुदतीत ते काम पूर्ण करण्यात येईल असे त्यांनी आश्वासित केले आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.638....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सदर प्रश्नामध्येच काशिद येथे धुप प्रतिबंधक बंधारा बांधण्याच्या बाबतीत प्रश्न विचारला आहे. काशिदला दरवर्षी मोठ्या प्रमाणात अपघात होतात. तेथे पर्यटकही मोठ्या प्रमाणात येतात. तेथील अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्या व्यक्तींची संख्या खूप वाढत आहे त्यामुळे पर्यावरण विभागाकडे, एमसीझेडएमएकडे क्लिअरन्ससाठी प्रस्ताव गेला आहे. तो प्रस्ताव केव्हा गेला, पुढील मर्यादित कालावधीमध्ये अशा कामांना मान्यता देण्याच्या दृष्टीकोनातून पर्यावरण विभागाला सूचना देण्यात येतील का आणि हे काम किती रकमेचे आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वाची बाब मांडली आहे. काशिद येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात, म्हणून या संदर्भातील काम तातडीने होणे आवश्यक आहे. मी या संदर्भातील आढावा घेतल्यानंतर रॅपिड एन्व्हॉयरमेंटल इम्पॅक्ट ॲनॅलिसिस एमसीझेडएमएकडे सादर करण्यास सांगितले आहे. आम्ही ते सादर करीत आहोत. छापील उत्तरात सांगितले आहे की, 13 व्या वित्त आयोगातून ते करीत आहोत, ते प्रस्तावित आहे. मी सांगू इच्छितो की, आपण या संदर्भात दिनांक 30 जुलै, 2014 ला एमसीझेडएमएकडे पाठविले आहे, तातडीने त्यांच्याकडून मान्यता घेण्यात येईल. 13 व्या वित्त आयोगाचे पैशासंदर्भात मी स्वत: त्यांच्याशी बोलणी केली आहे. त्यामुळे ते आपल्याला प्राप्त होणार आहेत. सदर कामाकरिता प्राधान्याने यावर्षी मंजुरी प्राप्त करून घेऊन निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. काही कारणाने 13 व्या वित्त आयोगाचा पैसा येण्यास उशीर झाला तर पर्यटन किंवा अन्य कोणत्या तरी बाबीतून याकरिता तूर्तास निधी उपलब्ध करून देण्यात येईल. काम तातडीने सुरू झाले पाहिजे, याकरिता राज्य सरकार दखल घेईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विरोधी पक्षनेते पद रिक्त असल्याबाबतचा पॉईंट ऑफ प्रोसिजर**

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. सभागृहाचे नेते, उपनेते हेही सभागृहात उपस्थित आहेत. अधिवेशन 8 तारखेला सुरुझाले आहे. सभागृहाच्या नेत्यांची घोषणाही गोंधळामध्ये केली गेली. माननीय मंत्र्यांची संसदीय कारकीर्द मोठी आहे. विरोधी पक्षनेते पद गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त आहे. आम्ही या संदर्भात माननीय सभापतींकडे मागणी केली आहे. इतरही सहकारी मित्रांनी या संदर्भात मागणी केली आहे. शासनाच्या वतीने सुध्दा पत्र देण्यात आल्याचे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी सांगितले आहे. आपण मर्यादित कालावधीत लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल असे प्रश्न उपस्थित केला त्यावेळी वारंवार सांगितले आहे. सभापती पद हे आसन उच्च आहे, त्याबद्दल आदर आमच्या सर्वांच्या मनात आहे. विरोधी पक्षनेते पदाबाबतील निर्णय आज होणे अत्यंत आवश्यक आहे. महत्त्वाचा मुद्दा काय होतो, हे काल आपण पाहिले आहे. माझी पॉईंट ऑफ प्रोसिजर उपस्थित करण्याची भावना हीच होती. सभागृहाचे कामकाज प्रथा, नियमाप्रमाणे झाले पाहिजे. काल सभागृहाचा वेळ वाढविण्याचा प्रश्न आला. मला समजू शकते की, सत्तारूढ पक्षाकडून कामकाज झ ााले पाहिजे. कार्यक्रमपत्रिकेवर दिवभरासाठी दाखविलेले कामकाज विशिष्ट कालावधीत संपले पाहिजे आणि त्यासाठी दोन्ही बाजूंचे सहकार्य अपेक्षित आहे. कामकज रेटून नेणे हा याचा अर्थ नाही. माझी आपल्याला व मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे. विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद असेल किंवा विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते पद असेल या संदर्भात निर्णय होणे गरजेचे आहे. आम्हाला ही अडचण या सभागृहात फार मोठ्या प्रमाणात भासत आहे. त्यामुळे या संदर्भातील निर्णय आजच जाहीर व्हावा. माननीय मुख्यमंत्र्यांनीही या संदर्भातील निर्णय मुख्यमंत्री या नात्याने करावा, हाच माझा पॉईंट ऑफ प्रोसिजरचा मुद्दा आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी विरोधी पक्षनेते पदाचा प्रश्न उपस्थित केला आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे त्यांच्यापुढे हा प्रश्न उपस्थित करावा म्हणून सन्माननीय सदस्यांनी मुद्दामहून हा प्रश्न उपस्थित केला आहे. कामकाज चालविण्याची जबाबदारी प्रामुख्याने सत्तारूढ पक्षावर अधिक आहे,

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

असे माझे मत आहे. दोन्ही सदनाचे कामकाज आणखी चांगल्याप्रकारे चालावे, ही जबाबदारी सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांवर आणि सत्तारूढ पक्षावर आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मला माननीय मुख्यमंत्र्यांना सांगायचे आहे की, ही जबाबदारी आपल्याकडे सुध्दा येते. आपण या दृष्टीने विधानसभा व विधानपरिषद सदनाची बैठक बोलाविली आणि त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला तर बरे होईल.

(गोंधळ)

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी काय बोलायचे ते मी कसे सांगणार. आपण भाष्य केले त्यावर ते बोलत आहेत.

श्री. सुनील तटकर : सभापती महोदय, माझा यासंबंधी पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. विधानसभा व विधानपरिषद यांचा संबंध काय येतो ?

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत म्हणून मी बोललो.

(गोंधळ)

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य वारंवार भाष्य करीत आहेत. सन्माननीय सदस्य माननीय मुख्यमंत्र्यांना सांगत आहेत.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, विधानसभा व विधानपरिषद यांचे काम स्वतंत्र आहे. त्यामुळे विधानपरिषदेच्या संदर्भात बैठक बोलवावी लागेल. मी मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, आजच या संदर्भातील भाष्य आम्हाला अभिप्रेत आहे. विधानसभेच्या बाबतीत काय करावे की करूनये किंवा बैठक घेणे हा विषय या सभागृहात चर्चा करण्याचा नाही. आपला विषय विधानपरिषदेच्या संदर्भातील आहे. सभापती महोदय, आम्हाला आपल्याकडून न्याय मिळणे अभिप्रेत आहे. आपल्याकडून तो मिळेल यासंबंधी मनामध्ये तीळमात्र शंका नाही. सभागृहात माननीय मुख्यमंत्री आहेत. सभागृहाचे नेते, उपनेते उपस्थित आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनीही या संदर्भातील शासनाची

..4


MSK/ KTG/ पूर्वी श्री. बोर्डे 12:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

भूमिका स्पष्ट करावी, अशी माझी त्यांना विनंती आहे. येथै विधानपरिषद सभागृहाच्या कामकाजाची चर्चा व्हावी, विधानसभा सभागृहाच्या कामकाजाची नाही, हा माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण त्यावर निर्णय घ्यावा.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या समोर हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. आपल्याला उद्देशून केला असता तर ठीक आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी यामध्ये हस्तक्षेप करावा, निवेदन करावे, असे म्हटले गेले. दोन्ही सभागृहांचे कामकाज चालविण्याची जबाबदारी माननीय मुख्यमंत्र्यांची अधिक आहे आणि त्या दृष्टीने त्यांनी या संदर्भात पुढाकार घ्यावा असे म्हणण्यात गैर काय आहे ? माननीय मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेऊन या संदर्भातील निर्णय घ्यावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, इतर पक्षाचे सन्माननीय नेते बोलत असताना आम्ही सन्मान ठेवतो. आमचे नेते उभे राहून बोलत असताना मेहेरबानी करून अडथळा निर्माण करू नये.

(गोधळ)

**सभापती** : मी निर्णय देतो. सन्माननीय सदस्य प्रा. जनार्दन चांदूरकर यांनी बोलावे.

प्रा. जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : मी तुमच्या हरकतीला उत्तर देतो. आपण सर्वांनी खाली बसावे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण मला बोलण्यास परवानगी दिली. मात्र सन्माननीय सदस्य श्री. माणिकरावजी ठाकरे बोलले. आपण अजून सन्माननीय सदस्यांना परवानगी द्याल तर डिबेट होईल. आपल्याला विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांचे या संदर्भातील भाष्य सभागृहाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपण माननीय मुख्यमंत्र्याना निवेदन करण्यास परवानगी द्यावी. इतर सन्माननीय सदस्यांना परवानगी देणार असाल तर हरकत नाही. मात्र आपल्याला सर्व सन्माननीय सदस्यांना परवानगी द्यावी लागेल.

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सभागृहाचे कामकाज चालविण्याच्या दृष्टीने निदेश देत आहेत. इतर सन्माननीय सदस्यांनी निदेश देण्याची गरज नाही. आपण सन्माननीय सदस्य प्रा. जनार्दन चांदूरकर यांना बोलण्यास सांगितले आहे, त्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मला बोलण्याची संधी द्यावी.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, या निर्णयाप्रत येण्याकरिता मी कोणाचाही सल्ला घेऊ शकतो आणि त्यामध्ये संसदीय कार्य मंत्री सुध्दा मला एखादी गोष्ट अनौपचारिकरित्या सांगू शकतात.

माझी आपणा सर्वांना विनंती आहे की, विधानसभेच्या विरोधी पक्ष नेत्याबाबत आपण येथे चर्चा करणे अनुचित आहे, ते योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी एक मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : मी आता कोणालाही पॉईंट ऑफ ऑर्डर उपस्थित करण्यास परवानगी देणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी या ठिकाणी जे विचार मांडले आहेत, त्यानुसार त्यांनी अशी विनंती केलेली आहे की, मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. या सदनाच्या विरोधी पक्ष नेत्याच्या अनुषंगाने त्यांना आपले विचार मांडावयाचे असतील तर ते त्यांनी मांडावेत. मी मुख्यमंत्री महोदयांना असे सांगेन की, त्यांचा याबाबतीतील एखादा काही विचार असेल तर ते तो मला माझ्या दालनातही समजावून सांगतील किंवा येथे सांगावयाचा असेल तर तसेही करु शकतील.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते पद हे अत्यंत महत्त्वाचे पद आहे. आपल्या या सर्व व्यवस्थेमध्ये सत्तारुढ पक्ष आणि विरोधी पक्ष अशी व्यवस्था आहे. त्यामध्ये विरोधी पक्ष नेत्याला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. अनेक महत्त्वाचे निर्णय घेत असताना विरोधी पक्ष नेत्याची आवश्यकता असते. मात्र, विरोधी पक्ष नेत्याच्या नेमणुकीसंदर्भातील विषय सर्वस्वी आपला आहे. सभापती महोदयांना ते सर्व अधिकार आहेत आणि त्यावर कोणीही अधिक्षेप करु शकत नाही. सरकार म्हणून मला एवढेच वाटते की, या संदर्भातील निर्णय लवकरात लवकर व्हावा. कारण, रोज या संदर्भातील प्रश्न सभागृहात उपस्थित करण्यात येत आहेत व त्यामुळे सभागृहाचे कामकाज बाधित होत आहे. सरकार म्हणून माझी एवढीच विनंती आहे की, निर्णय घेण्याचे सर्व

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.........

अधिकार आपल्यालाच आहेत. आपण लवकरात लवकर हा प्रश्न निकाली काढू शकला तर सभागृहाचे कामकाज नियमाने आणि विनाअडथळा चालेल. बाकी सरकार म्हणून मी यामध्ये कोणतीही भूमिका करणार नाही.

**सभापती** : या ठिकाणी विरोधी पक्ष नेत्याच्या नेमणुकी बाबत चर्चा झाली. सुदैवाने मुख्यमंत्री महोदय आणि अन्य सर्व नेते सभागृहात उपस्थित आहेत. तातडीने हा निर्णय कसा होईल, या दृष्टीने मी जरूर प्रयत्न करीन. (अडथळा) जोपर्यंत तो निर्णय होत नाही, तो पर्यंत मी तातडीने निर्णय घेण्याच्या दृष्टीनेच प्रयत्न करणार आहे, यामध्ये हसण्यासारखे काय आहे ?

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. आपल्या सभागृहाचे विरोधी पक्ष नेते अद्याप ठरलेले नाहीत. ते ठरले नाहीत म्हणून आमच्या काही मित्रांनी...

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आमच्या मित्रांनी अविश्वास प्रस्ताव परत घेतला आहे का ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

----------------

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.रामदास कदम (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यभरातील साडेआठशे बांधकाम प्रकल्प पर्यावरण विषयक परवानग्यांच्या विलंबामुळे प्रलंबित राहिल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री.जयवंतराव जाधव, अनिल भोसले, अब्दुल्लाखान दुर्राणी यांच्या दिनांक 2 जून, 2014 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 49496 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : अधिक माहिती छापावी.)

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

---------------

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.एकनाथराव खडसे (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2010-2011 चा बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.विजय देशमुख (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा चाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : चाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित यांचा सन 2013-2014 या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके सभागृहासमोर ठेवण्यात आली आहेत.

------------

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन 2013-2014 या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------------

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

...5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे

श्री.गिरीष बापट (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन 2014 च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक 2 जून, 2014 ते 14 जून, 2014 तसेच सन 2014 च्या चौथ्या (विशेष) अधिवेशनात दिनांक 10 नोव्हेंबर, 2014 ते 12 नोव्हेंबर, 2014 या कालावधीत दिलेल्या अनुक्रमे एकूण 329 आणि 5 आश्वासनांची यादी तसेच सन 2014 चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण 363 आश्वासनांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी.)

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

**पृ.शी.**: बिलाखेड, ता.चाळीसगाव येथुनच शेळीगट खरेदीची अट रद्द करणे
**मु.शी.**: बिलाखेड, ता.चाळीसगाव येथुनच शेळीगट खरेदीची अट रद्द करणे बाबत
श्री.जयवंतराव जाधव यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.एकनाथराव खडसे (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, श्री.जयवंतराव जाधव यांनी "बिलाखेड, ता.चाळीसगाव येथुनच शेळीगट खरेदीची अट रद्द करणे", या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

**सभापती** : सभागृहाचे कामकाज मी 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.28 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

-------------

यानंतर श्री.मा.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ पूर्वी श्री. रोझेकर 12:45

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**सभागृहापुढील कामकाजाच्या संदर्भात**

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस माननीय मंत्री महोदय उत्तर देतील. परंतु आधीचे नियम 93 अन्वये सूचनांचे कामकाज झालेले आहे काय ? माझ्या माहिती नुसार हे कामकाज झालेले नाही. ते माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरानंतर घ्यावे.

**उप सभापती** : ते कामकाज गोंधळामध्ये झालेले आहे.

श्री. एकनाथराव खडसे : माझ्याकडे जे 93चे निवेदन होते ते मी वाचले. परंतु त्यासंदर्भात पुन्हा चर्चा करावयाची असेल तर त्याला माझी हरकत नाही.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभरप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, राज्यामध्ये सत्तापरिवर्तन झाले. त्यानंतर पाहिल्यांदा या ठिकाणी शिवसेना-भारतीय जनता पार्टीच्या महायुतीचे सरकार आले.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मला वारंवार माननीय मंत्री महोदय श्री. एकनाथराव खडसे साहेबांना त्रास देणे आवडत नाही. ते आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देत आहेत. अशा वेळी शिवसेना पक्षाचा एकही सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित नाही. त्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणावर बहिष्कार टाकलेला आहे.

**उप सभापती** : राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देण्यास सुरुवात केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात कृपा करुन व्यत्यय आणू नये.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मला एकच गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे ती म्हणजे जेव्हा माननीय राज्यपाल अभिभाषण करण्यासाठी विधान भवनामध्ये येत होते त्यावेळी शिवसेनेच्या सन्माननीय सदस्यांनी त्यांना पायऱ्यावर अडवले होते. तेच सदस्य अभिभाषणाबद्दल माननीय राज्यपालांचे अभिनंदन करीत होते. भविष्यामध्ये हे सरकार कोणते उद्दिष्ट गाठणार आहे यासंबंधीचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असतो. लोकांनी रांगा लावून मतदान केले. भारतीय जनता पार्टीला बहुमत मिळाले म्हणून आपण आता सत्तेत आहात. मी माझ्या पक्षाच्या नेत्याचे श्री. अजितदादा पवार यांचे अभिनपंदन करतो. कारण त्यांनी स्पष्ट शब्दामध्ये असे म्हटलेले होते की, जनतेचा कौल आम्हाला मिळालेला आहे आणि तो आम्हाला मान्य आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

पण या ठिकाणी परिस्थिती अशी निर्माण झाली की, मुंबईच्या एका मतदारसंघामध्ये जनतेचा कौल तुम्हाला मिळाल्यानंतर त्या ठिकाणाहून जे उमेदवार जिंकून आले त्यांना मंत्रीमंडळामध्ये राज्यमंत्री केले. त्या निवडणुकीमध्ये ज्यांचा पराभव झाला, ज्यांना जनतेने नाकारले त्यांना आपण कॅबिनेट मंत्री पद दिले. ज्या लोकांनी रांगा लावून मतदान केले त्यांचा हा अवमान आहे, लोकशाहीचा अवमान आहे. म्हणून मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. माननीय सदस्यांनी असे वक्तव्य केले की, माननीय राज्यपाल विधानभवनामध्ये येत असताना प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांवर बसून ज्यांनी विरोध केला त्यांनीच माननीय राज्यपालांचे अभिभाषणाबद्दल अभिनंदन केले. आम्ही माननीय राज्यपालांचे त्यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल अभिनंदन केलेले नाही. आम्ही अभिभाषणाला विरोध केला आहे.

श्री.किरण पावसकर : मी शिवसेना पक्षाच्या संदर्भात उल्लेख केला आहे.

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्यात सत्ता परिवर्तन झाल्यानंतर माननीय राज्यपालांनी विधानभवनामध्ये येऊन सरकारचे धोरण, दिशा आणि पुढील काळात या राज्यामध्ये करावयाच्या कामांच्या संदर्भात आपले अभिभाषण केले. म्हणून प्रथम मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो. या राज्याला 21 व्या शतकात वाटचाल करीत असताना मार्गदर्शनपर भाषण करुन नवी दिशा दिली. यापूर्वी माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी असे म्हटले की, तुम्हाला बहुमत दिले. हा लोकशाही प्रक्रियेतील एक भाग आहे. आज आम्ही सत्तेवर आहोत. काल तुम्ही सत्ताधारी बाजूला होते. उद्याचे आज सांगता येत नाही. पुढील 10-15 वर्षे आम्हीच सत्तेवर राहू. तुमच्या दोघांची वागणूक पाहून आज तरी तसे दिसते.

सभापती महोदय, राज्याची वाटचाल सुरु असताना हे राज्य अडचणीत असताना, आमच्या हाती सत्तेची सूत्रे आली आहेत. मागील 15 वर्षाच्या काळात अनेक विषय असे झाले की, त्या विषयांची पूर्तता करता आली नाही. तुमची इच्छा असेल परंतु तुम्हाला त्या दिशेने वाटचाल करीत असताना अंतिम ध्येयापर्यंत जाता आले नाही. ज्या दिवशी राज्याची सूत्रे आम्ही हाती घेतली त्यावेळी असे लक्षात आले की, राज्याची आर्थिक स्थिती म्हणावी तशी चांगली नाही. आजही

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...

राज्याच्या अर्थव्यवस्थेवर ताण आहे. अशा स्थितीत अनेक नवीन योजना आखलेल्या आहेत. आम्हाला सातत्याने विरोधकांकडून विचारले जाते की, तुम्ही या योजना कशा पूर्ण करणार आहात? मुंबईची मेट्रो रेल्वे असेल, नागपूरच्या मेट्रो रेल्वेचा विषय असेल, पुण्याच्या मेट्रो रेल्वेचा विषय असेल, या विषयाची मांडणी करताना आपल्या मनामध्ये शंका होती. आर्थिक ताण आहे आणि पुणे-नागपूरमध्ये मेट्रो रेल्वे प्रकल्प सुरु करावयाचे आहेत. हे प्रकल्प कसे पूर्ण होणार? एका बाजूला आर्थिक ताण आहे असे सांगत असताना शेतकऱ्यांच्या पॅकेजसाठी पैसे कुठून आणणार? हे प्रश्न जसे तुमच्या मनात आहेत तसे माझ्याही मनात आहेत.

सभापती महोदय, राज्य सरकारने अभिभाषणामध्ये माननीय राज्यपालांची भूमिका मांडत असताना जनतेच्या आशाआकांक्षा पूर्ण करण्यासाठी धीराने व धैर्याने सामोरे जाणार आहोत. कितीही अडचणी आल्या तरी त्या दूर करुन राज्यातील जनतेचा विश्वास संपादन करुन दमदार पावले उचलू आणि प्रगतीच्या दृष्टीने वाटचाल करीत असताना हे राज्य प्रथम क्रमांकाचे राज्य असल्याचा जो महिमा होता, गेल्या 15-20 वर्षापूर्वी राज्याचे जे चित्र होते ते नाकारुन चालणार नाही. एकेकाळी मी राज्याचे अभिनंदन केले आहे. 25 वर्षापूर्वी ज्यावेळी आम्ही विरोधी पक्षात होतो त्यावेळी राज्य सरकारला गुंतवणुकीच्या संदर्भात आणि औद्योगिक प्रगतीच्या संदर्भात गौरविण्यात आले त्यावेळी मी भाषण केले होते. चांगले होते त्याला चांगले म्हटले आहे.

सभापती महोदय, मधल्या कालखंडात धोरण चुकले, त्यामुळे राज्याची परिस्थिती बिघडत चालली. उद्योग आणि अन्य साऱ्या क्षेत्रात राज्य आठव्या क्रमांकावर येऊन पोहोचले आहे. आता आमच्यावर पहिली जबाबदारी आहे ती म्हणजे सर्व क्षेत्रात राज्याला पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी तशी वाटचाल करावी लागणार आहे. आजूबाजूच्या गुजरात, छत्तीसगढ व मध्यप्रदेश या राज्यांचा अभ्यास केला तर 12 वर्षापूर्वी गुजरातमध्ये नवे सरकार सत्तेवर आले. छत्तीसगढ आणि मध्यप्रदेशमध्ये मागील 15 वर्षाच्या काळात तीन सरकारच्या काळातील जीडीपीचा अभ्यास केला तर कृषी क्षेत्राचे उत्पन्न मोठया प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. आज महाराष्ट्र राज्याची जी स्थिती आहे ती 12 वर्षापूर्वी या राज्यांची होती. हळूहळू त्या राज्यांच्या स्थितीमध्ये बदल झाला. त्या माध्यमातून मध्यप्रदेश राज्यामध्ये कृषी उत्पन्न वाढले. मी या राज्याच्या अर्थमंत्री पदाची दोन-तीन वर्षे सूत्रे सांभाळली होती. माजी अर्थमंत्री म्हणून माझ्या असे लक्षात आले की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) K.3

SGB/ KTG/ 12:40

श्री.एकनाथराव खडसे...

कल्पनेच्या पलीकडे त्या राज्यांचा विकास झाला. त्या राज्याच्या कृषी विकासामध्ये 24 टक्के वाढ झाली. मागील वर्षी महाराष्ट्राचा कृषी विकास दर उणे 4 टक्के होता. दुष्काळ आला, अतिवृष्टी झाली हे मी समजू शकतो. परंतु दुष्काळ आणि अतिवृष्टी फक्त महाराष्ट्रात झाली का? अन्य राज्यांना सुध्दा अतिवृष्टी आणि दुष्काळाची झळ बसली आहे. परंतु त्या राज्याकडे राजकीय इच्छाशक्ती आणि आत्मविश्वास होता. त्यामध्ये आम्ही कमी पडलो. सिंचनाच्या क्षेत्रात मध्यप्रदेश आणि गुजरात राज्याने जी प्रगती केली तेवढी प्रगती आम्ही करु शकलो नाही.

सभापती महोदय, कृष्णा खोरेच्या संदर्भात जो निर्णय झाला त्या निर्णयाची अंमलबजावणी मुदतीच्या आत आम्ही करु शकलो नाही, हे सत्य आहे. हे तुम्हाला मान्य करावे लागेल. सिंचनाच्या क्षेत्रात आम्ही प्रगती केली असती, पुढे गेलो असतो तर कदाचित चित्र बदलले असते. आपल्या आजूबाजूच्या राज्यापेक्षाही पुढे जाऊन पहिल्या क्रमांकाचे राज्य बनविण्याचे आवाहन महाराष्ट्र सरकारवर आहे आणि ते आम्ही नक्की पार पाडू असा जनतेला मी विश्वास देतो. किमान शासन आणि लोकाभिमुख प्रशासन असले पाहिजे. किमान शासन असले पाहिजे. राज्य शासनाचा प्रशासनामध्ये कमीत कमी हस्तक्षेप असला पाहिजे. त्यामुळे राज्य शासनाचे सर्व अधिकार मंत्र्यांकडे असत. मंत्रीमंडळाकडे अधिकार आल्यामुळे निर्णय प्रक्रियेला विलंब होतो. म्हणूनच राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्यांनी सुतोवाच केले आहे की, सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. अधिकारांचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. जे अधिकार मंत्र्यांना आहेत त्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी खालच्या सभागृहात घोषणा केली. या संदर्भात मंत्र्यांचे अधिकार मर्यादित ठेवून प्रशासनकडे अधिक अधिकार कसे जातील आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून खालच्या अधिकाऱ्यांपर्यंत ते अधिकार कसे पोहोचतील याची व्यवस्था टप्प्याटप्प्याने करण्याचा निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. त्यामध्ये असे आहे की, तलाठी असेल, तहसीलदार असेल त्यांना निर्णय सांगायचा असेल तर मंत्र्यांकडे यावे लागते. बदलीसाठी मंत्र्यांकडे यावे लागते. लहानसहान कामासाठी त्यांनी मंत्र्यांकडे येता कामा नये ही माननीय मुख्यमंत्र्यांची भूमिका आहे. शेवटी सरकार चालविताना लोकशाही पध्दतीमध्ये शासन म्हणून आम्ही काम करतो तसे प्रशासनाचेही काम चांगले झाले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एकनाथराव खडसे .......

प्रशासनाच्या माध्यमातून शासनाच्या योजना गोरगरिबांपर्यंत पोहचल्या पाहिजेत. त्यासाठी शासन आणि प्रशासनाने हातात हात घालून काम केले तरच राज्याच्या प्रगतीचा गाडा वेगाने पुढे सरकू शकेल. पण दुर्दैवाने मधल्या काळात प्रशासनावरील मांड कमी झाल्यामुळे प्रशासनात एक प्रकारची दिरंगाई, थंडपणा व हलगर्जीपणा जाणवायला लागला याचा अर्थ संपूर्ण प्रशासन अतिशय थंड होते असे नाही, काही चांगलेही होते म्हणूनच हे राज्य चालले होते. पण त्यातील दोष दूर करुन त्यांना वेग आणण्याचे पहिले काम या शासनाला करावे लागाणार आहे व तसा प्रयत्न माननीय मुख्यमंत्र्यांनी सुरु केला आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून कारभारामध्ये पारदर्शकता असली पाहिजे यासाठी देखील शासनाचा प्रत्न आहेच. मागील काळातील अनुभव लक्षात घेऊन त्यातील दोष दूर करण्यात येतील तसेच यापुढे संगणकाच्या माध्यमातून ई-पोर्टल, ई-लिलाव, ई-टेंडरिंग सारख्या प्रोसेस सुरु करुन सर्व कारभार ऑनलाईन पध्दतीने झाला पाहिजे यासाठीची व्यवस्थाही करण्यात येईल. बोलवा, बसवा आणि चर्चा करा हा प्रकार अता संपवून जे काही करावयाचे असेल, चर्चा करावयाची असेल, टेंडरिंग तसेच नोकर भरती सुध्दा ऑन लाईनच करण्यात येईल. अन्यथा बोलवा, मग तोंडी परीक्षा घ्या आणि मार्क्स वाढवून देतो असे प्रकार यापुढे होणार नाहीत तर संगणकाच्या माध्यमातूनच सर्व परीक्षा व इतर व्यवहार सुध्दा करण्यात येतील, जेणेकरुन वशिल्याला वाव राहणार नाही. अन्यथा मधल्या काळात वर्षानुवर्षे चालत आलेले एक लाख दे, 50 हजार दे, तुला नोकरी लावून देतो हे प्रकार आता बंद होण्यास नक्कीच मदत होईल. त्यातून मग कोणी गरीब असो अथवा श्रीमंत किंवा कोणत्याही प्रवर्गातील असो जो मेरिटमये असेल त्यालाच नोकरी लागली पाहिजे अशा प्रकारची व्यवस्था ई-पोर्टलच्या माध्यमून करण्याचा माननीय राज्यपालांनी मनोदय व्यक्त केला आणि त्याची पुर्तता हे शासन नक्कीच करणार आहे.

महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्यदिव्य स्मारक अरबी समुद्रात करावयाचे म्हणून मधला 15-20 वर्षाचा कळ लोटला. प्रत्येक निवडणुकीच्या जाहीरनाम्यात सांगितले जात होते की, जगात नसेल असे छान स्मारक उभारण्यात येईल असे ऐकून व छत्रपती शिवाजींबद्दलच्या मनातील आदरामुळे, रक्तारक्तात आणि नसानसात शिवप्रेम भिनलेले असल्यामुळे अंगावर शहारे उभे राहत होते म्हणून आम्ही देखील टाळ्या वाजवित होतो. दुर्दैवाने हे काम मागील काळात शासन करु शकले नाही. या शासनाला सत्तेवर येऊन फक्त 40 दिवस झालेले आहेत आणि केंद्रात सत्ता

..........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ..........

येऊन 6 महिने होऊन गेले पण मनातून मात्र छत्रपतींचे स्मारक उभे राहिले पाहिजे या भावनेतून केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून मिळणाऱ्या परवानग्या तसेच यातील असणाऱ्या त्रुटी दूर करुन हे स्मारक उभे करण्याचा प्रयत्न या शासनाने केला. खास करुन माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री. प्रकाशजी जावडेकर यांचे मी अभिनंदन करतो. त्यांनी या विषयाच्या संदर्भात दोन तीन बैठका घेतल्या असता मी देखील त्या बैठकांना उपस्थित होतो. त्यानी संबंधित विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांना बोलावून 15 दिवसात सर्वच परवानग्या मिळाल्या पाहिजेत अशा सूचना दिल्या. तसेच आणखी काही पाहिजे असल्यास राज्य शासनाकडून घ्यावे आणि त्रटी असतील तर त्याही तातडीने सांगाव्यात आणि त्या दूर करुन घ्याव्यात, तसेच ज्या परवानग्या दिल्या जातील त्या सदोष असता कामा नये अशा प्रकारच्याही सूचना त्यांनी दिल्या. एक आनंदाची बाब म्हणजे यासंबंधीच्या सर्वच एनओसीज आपल्याला मिळाल्या व त्यानतर माननीय मुख्यमंत्र्यांनी खालच्या सभागृहात येत्या फेब्रूवारी महिन्याच्या 19 तारखेला छत्रपतींच्या स्मारकाचा भूमी पूजन समारंभ पार पाडला जाईल असे जाहीर केले. एवढे मोठे काम, जे गेल्या अनेक वर्षापासून प्रयत्न केला जात आहे त्या कामाला आता 19 फेब्रूवारीला सुरुवात होईल........

श्री. भाई जगताप : महोदय, माननीय मंत्री महोदयांना दोन्ही सभागृहांचा प्रदीर्घ असा अनुभव आहे व त्याबाबतीत आम्ही नेहमीच त्यांना सलाम करतो. पण मला या निमित्ताने ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणावयाची आहे की, कोणतेही सरकार ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया असते. मग त्यात मागील सरकार आणि हे सरकार अशा ज्या गोष्टी आहेत त्यांचा अशा प्रकारे उल्लेख करणे उचित नाही. या कामासाठी जवळपास 34 परवानग्या घ्याव्या लागणार होत्या. त्या पूर्ण झाल्यानंतरच ते काम करता येण्यासारखे होते. आता या सरकारने येत्या 19 तारखेचा छत्रपती शिवरायांच्या स्मारकाचा मुहूर्त आणि त्यानंतरच्या 14 एप्रिलचा बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या भूमीपूजनाचा मुहुर्त ठरविला आहे. आपल्या सरकारने त्यावर नक्कीच कळस चढविला पण यापूर्वीच्या सरकारने जी कामे केली त्यांचा अशा प्रकारे उल्लेख न करता आदराने उल्लेख झाला पाहिजे एवढीच आमची माफक अपेक्षा आहे. तसेच यापूर्वी ज्या ज्या कामांचा पाया आणि बांधणी केली ज्यांची उद्घाटने आपण करीत आहात पण आपण म्हणता त्याप्रमाणे केवळ तीन महिन्यात हे काम झाले असे म्हणण्याचे कोणी धाडस करीत असेल तर ते

..........3



PFK/ KTG/ पूर्वी श्री. भोगले....... 13:00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ..........

तितकेसे योग्य होणार नाही. तरी सुध्दा एक गोष्ट मान्य करावी लागेल की तांत्रिकदृष्ट्या अडलेले पर्यावरणाचे रेंगाळलेले प्रश्न आपल्याच राज्याचे माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री. प्रकाशजी जावडेकर आल्यानंतर मार्गी लावले त्याचे आम्हीही स्वागत केलेच आहे.

श्री. एकनाथराव खडसे : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे अत्यंत अभ्यासू असून ते सातत्याने माहिती घेत राहतात. मी त्यांच्या माहितीसाठी आणखी सांगू इच्छितो की, खरोखरच 14 वर्षांचा काळ जो या कामासाठी लोटला तो जास्तच आहे असे आम्हाला वाटत होते. तसेच केंद्रात आपलेच सरकार सत्तेवर असतानाही एवढा कालावधी लागला हे विशेष. आमचे हे पहिलेच वर्ष असून मी आपल्याला या विषयाबाबतची फाईल वाचण्यास देऊ शकतो व त्यातून आपल्या लक्षात येईल की सहा महिन्यात केंद्राकडून किती प्रकारच्या परवानग्या आम्ही मागितल्या आहेत आणि आपल्या काळात अशा परवानग्यांपैकी काही परवानग्या जरी मिळाल्या असतील तरी मी याच सभागृहात आपले अभिनंदन करीन. वास्तविक छत्रपतींचे स्मारक अरबी समुद्रात व्हावे ही कल्पना आपल्याच सरकारची होती पण आम्ही ठरविले आणि आपलेच पर्यावरण मंत्री असल्याने मी आणि माननीय मुख्यमंत्री त्यांना भेटलो आणि विनंती केली. तसेच इंदू मिलच्या संदर्भात सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे दिली. पण त्यात केंद्रीय वस्त्रोद्योग विभागाचा वेगळा निर्णय, इंदू मिलच्या संदर्भातील जो पाथ-वे उभा आहे त्याला सीआरझेडची परवानगी देणे इ. बाबत चर्चा केली......

यानंतर श्री. भारवि ..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

इंदु मिलचा प्रश्न आता अंतिम टप्प्यामध्ये आलेला आहे. कोणताही निर्णय हा निर्धोक झाला पाहिजे असे मघाशी सांगितले आहे. न्यायालयात जाऊन स्टे आणला तर आपल्या सर्व मेहनतीवर पाणी फिरते. माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.प्रकाशजी जावडेकर हे दहा दिवसांसाठी परदेशी गेले होते. त्यांनी मला सांगितले की, लोकसभेचे आणि आपले विधान सभेचे अधिवेशन संपल्यानंतर दिल्लीला पुन्हा यावे व या विषयासंबंधी पुन्हा एकदा बैठक लावू या व येत्या दोन-तीन महिन्यांमध्ये इंदु मिलच्या संबंधी जेवढ्या म्हणून त्रुटी असतील त्या दूर करण्याचा आपण प्रयत्न करावा. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही नेत्यांसंबंधी कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी साऱ्या समाजाला मान्यता मिळवून दिलेली आहे. या दोन्ही नेत्यांनी समाजासाठी काम केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ऋण कोणताच समाज विसरू शकत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांसाठीच मर्यादित आहेत असे नाही. समाजाला समान न्यायाची आणि तत्त्वाची भूमिका देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांनीच ओबीसी, एस.टी.एन.टी.ची निर्मिती केली. त्यांनीच अनुसूचित जमातीला न्याय दिलेला आहे. त्यामुळे ते निव्वळ दलितांपुरतेच मर्यादित आहेत काय ? काही व्यक्ती ह्या सर्व समाजासाठी असतात. परंतु, आपणच संकुचित वृत्तीचे असतो आणि म्हणतो की, ते आमच्या गावी जन्माला आले, त्यामुळे ते आमचे झाले. अशा प्रकारे आपण मोठ्या व्यक्तींना कधी कधी लहान करण्याचा प्रयत्न करत असतो. अशा महान व्यक्तींचा आदर्श डोळ्या समोर सर्व समाजाने काम केले पाहिजे.

सभापती महोदय, केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांचे अभिनंदन मी या साठी केले की, त्यांनी काही महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावले. कोकणात वाळूचा आणि जांभा दगडाचा प्रश्न मोठा गंभीर झाला होता. सदर प्रश्न हा सन 2010 पासून प्रलंबित आहे. कोकणात गाडगीळ समिती आली होती, त्या समितीने जांभा दडगावर बंदी आणली होती. त्यानंतर कस्तुरीरंगन समितीने थोडा बॅन उठविला. सिंधुदुर्ग, रत्नागिरीसाठी पूर्णत: न्याय होऊ शकल नाही. आवाज नावाची एक संघटना न्यायालयात गेली आणि त्यांनी स्टे आणला. मागील 15-20 दिवसांपूर्वी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ PFK 13:10

श्री.एकनाथराव खडसे....

आमची दिल्ली येथे श्री.प्रकाश जावडेकर यांच्या समवेत बैठक झाली होती. वाळू व चिरे खाणी हा प्रश्न महसूल विभागाशी संबंधित असल्यामुळे त्या बैठकांना मी उपस्थित राहतो. हा प्रश्न त्यांनी दोन-तीन वेळा चर्चेला घेतला. आपण न्यायालयामध्ये आपली बाजू भक्कमपणे मांडत नाही असे माझ्या लक्षात आले होते. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, दिल्लीतील आपले वकील न्यायालयामध्ये भक्कमपणे बाजू मांडत नाहीत. तेव्हा त्यांनी वकिलांना बोलाविले. त्यांनी सांगितले की, आम्हाला पूर्ण माहिती मिळाल्याशिवाय ती आम्ही कोर्टापुढे सादर करू शकत नाही. आमचे अधिकारी रात्रंदिवस बसले आणि त्यांना हवी असलेली माहिती देण्यात आली. आपले उप सचिव श्री.गुट्टे यांनी स्वत:हून पुढाकार घेतला. त्या बैठकीला त्यांनी सर्व अधिकाऱ्यांना बोलाविले. त्या बैठकीला मी स्वत: उपस्थित होतो. त्या बैठकीत न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा निर्णय झाला. त्या आधारावर न्यायालयाने सांगितले की, शासनाने मार्गदर्शक तत्त्वे तयार करावित. त्यानुसार आपण हायकोर्टाकडे आपला प्रस्ताव सादर केला. वकिलांनी चांगली बाजू मांडल्यमुळेच चारच दिवसापूर्वी सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील 70 टक्के चिरे खाणीवरील बॅन उठविला. आपला आणखी देखील प्रयत्न सुरूआहे. पण इको सेन्सेटीव्ह झोन आहे त्याला मुक्त करण्यासाठी उच्च व सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. यासंबंधी तज्ज्ञांना, एन.जी.ओं.ना बोलावून अहवाल तयार करून काही मार्ग काढता येईल का हे देखील तपासून पाहतो आहोत. आज कोकणामध्ये सर्वात मोठा प्रश्न जांभा दगडाचा, वाळूचा होता. पण आता किमान 70 टक्के रिलीफ जनतेला मिळालेला आहे. यात श्री.प्रकाश जावडेकर यांचा मोठा हात आहे. आपण हे मागे केले असते तर त्याचे आम्ही स्वागतच केले असते.

सभापती महोदय, या शासनाचा माहिती तंत्रज्ञानावर जोर आहे. आय.टी.विभागाच्या माध्यमातून सर्व विभागांना ई-पोर्टल सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व खात्यांची माहिती सांगणे शक्य होणार नाही. पण एका ओळीमध्ये मी सगळी माहिती सांगू शकेन. आज नागरिकांना जमीन मोजणीमध्ये सर्वात जास्त त्रास होत आहे. ब्रिटीशांच्या कालखंडामध्ये म्हणजे 150 वर्षापूर्वी देशातील सर्व जमिनींची मोजणी झाली होती. काश्मीर, कन्याकुमारी, अफगाणिस्तान,

...3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

नेपाळ, ब्रह्मदेश, बांग्लादेश, पाकिस्तानसह संपूर्ण देशातील जमिनीची त्यांनी मोजणी केली होती. पण अद्याप पर्यंत आपण आपल्या येथील जमिनींची फेरमोजणी केलेली नाही. ज्याला आवश्यकता भासली त्याने मोजणीसाठी अर्ज केला व त्याच्या जमिनीचा तुकडा मोजण्यात आला. एखाद्या गावाने अर्ज केला की, शिवार मोजूर द्या तर ती करण्यात आली. सरसकट मोजणी करता येणे शक्य नव्हते. तेवढे मनुष्यबळ आणि पैसा आपल्याकडे उपलब्ध नव्हता. या पावणे दोन वर्षामध्ये कायद्यामध्ये, जमिनीच्या नोंदीमध्ये फेर बदल झाले. त्यामुळे आता आम्ही उपग्रहाद्वारे जमिनीची मोजणी करण्याचे ठरविले आहे. .04 इतकी ॲक्युरसी आणण्याचे काम आम्ही केलेला आहे. मी मघाशी सांगितले की, मधल्या कालखंडामध्ये कायदे बदलले. आता शेत जमीन कमी होत चालली आहे. पूर्वीच्या जमिनीमध्ये फेरफर होत चालले आहेत. काही जमीन उद्योगांसाठी गेली, तर काही जमिनींवर शहरीकरण झाले. काही जमिनींवर सिंचनाचे प्रकल्प उभे राहिले, थर्मल पॉवर प्रोजेक्ट उभे राहिलेत अशा विविध कारणांमुळे जमीन हळू हळू कमी होत चालली आहे. आज नागरी क्षेत्र देखील वाढत चालले आहे. पूर्वी असलेले वनी करणाचे क्षेत्र देखील आता कमी होत चालले आहे. वनी करणाची जमीन, उद्योगासाठी वापरलेली जमीन, भूसंपादित जमीन असेल या साऱ्या जमिनींची अद्ययावत नोंदणी करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच, शहरी व ग्रामीण भागातील मोजणी करणे देखील महत्त्वाचे आहे. त्यासाठी व्यापक कार्यक्रम हाती घेण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. या सर्व कार्यक्रमासाठी साडेचार हजार कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. या कार्यक्रमाला 3-4 वर्षांचा कालावधी लागणार आहे. या कामी केंद्र शासनाने देखील पुढाकार घेतलेलाच आहे. राज्य व केंद्र शासनाच्या हिश्श्यातून आपण हा कार्यक्रम पूर्ण करणार आहोत. असे कार्यक्रम हाती घेतल्यानंतर प्रत्येकाला उतारे घरपोच देण्याचा आमचा मानस आहे. मोजणी केल्यानंतर त्याच्या घराचा नकाशा, शेताचा नकाचा, जागेचा नकाशा हा त्याला एकदाच द्यायचा आहे. कारण वारस बदलेले असतात. पिढ्या बदलेल्या असतात. मध्ये गट स्कीम आली होती. तेव्हा त्यात बदल झाला. मध्यंतरी सिलिंग ॲक्ट आला होता. त्यामुळे बदल झाले होते. तेव्हा फेरबदलासहित अद्ययावत असे रेकॉर्ड त्यामध्ये समाविष्ट करून ऑन लाईन सात बारे उत्तारा देण्याचा आमचा मानस आहे. जगातील कोणत्याही

...4/-



BGO/ PFK 13:10

श्री.एकनाथराव खडसे....

कोपऱ्यामध्ये मनुष्य गेला तरी त्याला त्याच्या घराचा 7/12 चा उतारा ऑनलाईन मिळाला पाहिजे, अशा प्रकारची सुविधा आम्ही निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. जे दीडशे-दोन वर्षात झाले नव्हते ते आता आपण उपग्रहाद्वारे करणार आहोत. त्यामुळे यात आपण पुढाकार घेणार आहोत.

आपल्या राज्यासह अन्य 4-5 राज्यांनी हा कार्यक्रम स्वीकारला आहे. कारण त्यासाठी आपल्या राज्याचा देखील निधी लागणार आह. केंद्रीय दळवळण मंत्री श्री.नितीनजी गडकरी यांच्याकडे ग्रामविकास विभाग होता. त्यात महसूल विभागाचा काही भाग येतो. सुरूवातीला श्री.गोपीनाथ मंडे यांच्याशी मी चर्चा केली होती. हे खाते नंतर श्री.गडकरी साहेब यांच्याकडे आल्यानंतर त्यास तत्वतः मान्यता मिळाली. आता श्री.चौधरी नावाचे केंद्रीय ग्रामविकास मंत्री आहेत. त्यांच्याकडे आमचा पाठपुरावा सुरूआहे.

सभापती महोदय, सर्वच विभागांमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून कामकाजामध्ये अधिकाधिक वेग आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

यानंतन श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते )**

श्री. एकनाथराव खडसे ........

सभापती महोदय, ई निविदाच्या संदर्भात मी माहिती दिलेली आहे. आंतरराष्ट्रीय मानंकाशी सुसंगत नवीन सुरक्षा यंत्रणा आपल्याला उभी करावयाची आहे.

सभापती महोदय, हे काम काही एका वर्षात पूर्ण होणार नाही. 26/11 सारखी घटना अलिकडच्या काळात सुर्दैवाने घडली नाही. याचा अर्थ वाईट घटना घडणार नाहीत असे समजण्याचे कारण नाही. अतिरेक्यांनी काल पाकिस्तानामध्ये एका शाळेतील 133 निष्पाप मुलांची हत्या केली आहे. राक्षसाला लाजवतील असे काम त्यांनी केलेले आहे. या अतिरेक्यांनी अमानूष कृत्य केलेले आहे. जगभर पसरत असलेला दहशतवाद हा हिंदुस्तानातही येऊ शकतो. आपल्याकडेही पूर्वी अशा घटना घडलेल्या आहेत. अंतरराष्ट्रीय मानांकाशी सुसंगत अशी नवीन सुरक्षा यंत्रणा उभी करण्याचा या राज्यसरकारचा विचार आहे. हे काम एक दिवसात, एका वर्षात होण्यासाखे नाही. यासाठी अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, प्रशिक्षण, जागांची व्यवस्था यासाठी मोठया निधीची गरज लागणार आहे. आपण हे काम आज सुरु केले तर येत्या 5-10 वर्षात हे काम मजबूतीने ऊभे राहू शकेल आपल्याकडे 26/11 च्या घटनेला सहा वर्षाच्या वर कालावधी लोटला आहे. त्यावेळीं सीसीटीव्ही कॅमेरे बसवावयाचे होते परंतु ते अद्याप बसवले गेले नाहीत. निधीची कमतरता असल्यामुळे आपण जे ठरवतो ते आपण करु शकत नाही. आपल्याकडे कामे अनेक असतात आणि पैसा लिमिटेड असतो. अंतरराष्ट्रीय मानांकनाशी सुसंगत अशी सुरक्षा यंत्रणेच्या संदर्भात केंद्र सरकारची मदत घेऊन काम केले जाणार आहे. यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्र्यांशी माननीय मुख्यमंत्र्यांनी चर्चा केलेली आहे. यामध्ये आता केंद्र सरकारने पुढाकार घेतलेला आहे. केंद्रसरकारने संपूर्ण राज्यांना सूचना केल्या आहेत की, यासाठी लागणारा काही पैसा केंद्रसरकार देण्यास तयार आहे आणि हे करणे गरजेचे आहे. काल पाकिस्तानमधे अतिरेक्यांनी हल्ला केला, परवा ऑस्ट्रेलियामध्ये हल्ला केला होता त्यामुळे हे प्रस्थ रोखण्यासाठी आपल्याकडून प्राथमिक स्वरुपाच्या तरी व्यवस्था झाल्या पाहिजेत असा आमचा प्रयत्न राहणार आहे.

सभापती महोदय, पोलीस दलाचे आधुनिकीकरणासाठी शासन पाऊल उचलणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ........

महिलांच्या सुरक्षेसाठी महिलांचे विशेष पथक निर्माण केले जाणार आहे. या पूर्वीही महिलांच्या सुरक्षेसाठी पथक नेमण्याचे प्रयत्न झाले होते. आज महिलांच्या अत्याचाराच्या घटनामध्ये वाढ होत असल्यामुळे अत्याचाराच्या घटना कमी करण्यासाठी महिलांचे पथक स्थापण्याचा शासन विचार करीत आहे.

सभापती महोदय, पोलिसांना चांगल्या खाजगी विधी तज्ज्ञांची मदत दिली जाणार आहे. आपल्या बहुतांशी केसेस सरकार हारत असते. हा प्रकार तुमच्याही काळात होता तसा तो आमच्याही काळात आहे. आपल्या सर्वांचा अनुभव सारखा आहे. आपल्याकडे चांगले विधी तज्ज्ञ आहेत परंतु आपण त्यांना म्हणावे तसे मानधन देत नसल्यामुळे ते आपल्याकडे येत नाहीत. विधी तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, तुम्ही प्रत्येक केस मागे 500-1000 रुपये देत असाल आणि समोरचा वकील लाखभर तासाचा असेल तर आम्ही लढायचे कसे ? त्यामुळे यातील जे आर्थिक अंतर आहे ते कमी करण्याचा प्रयत्न असून यासाठी खाजगी विधी तज्ज्ञांची मदत घेऊन साक्षीदारांना संरक्षण देण्यात येणार आहे. घटना घडली की, साक्षीदार पुढे येतात परंतु नंतरच्य कालखंडात जसजसा विलंब लागतो तस तसा साक्षीदारांवर प्रभाव किंवा दबाव किंवा त्याला भिती दाखवण्याचे प्रकार वाढतात. त्यामुळे साक्षीदार अंतिम क्षणाला साक्ष देण्यास तयार होत नसल्यामुळे आपण केसेस हरतो. अशा वेळेस साक्षीदारांनाही संरक्षण देण्याची भूमिका घेतली जाणार आहे. आताही तशा प्रकारचे संरक्षण दिले जाते परंतु त्यांना तत्कालीन संरक्षण देत असतो. केस मिटेपर्यत साक्षीदाराला संरक्षण कसे देता येईल यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

सभापती महोदय, सिंचन,परिवहन इत्यादी पायाभूत सुविधांसाठी आपल्याला कालबध्द योजना आखायची आहे. सिंचनाच्या संदर्भात ज्या प्रकल्पांचे काम 60 किंवा 70 टक्क्याच्यावर पूर्ण झाले आहेत व अशा कामांना आता काही पैसा दिला तर त्या प्रकल्पांची कामे 2/3 वर्षात पूर्ण होऊ शकतील अशा प्रकल्पांची एक यादी तयार केली जाणार आहे. आपण सिंचनाचे खूप मोठमोठे प्रकल्प सुरु करुन ठेवले आहेत. आमच्याही आणि तुमच्याही कालखंडात अशी कामे सुरु करण्यात आलेली आहेत. शेवटी लोकप्रतिनिधीवर कामांचा दबाव असतो. आपल्याकडे 100 रुपये असतात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ........

परंतु प्रत्यक्षात आपण 500 रुपयांच्या कामांना मंजूरी देऊन टाकतो. त्यामुळे 75 टक्क्याच्यावर ज्या प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले आहेत अशा प्रकल्पांना 25 टक्के रक्कम दिली तर 2/3 वर्षात पाणी थांबू शकेल अशा प्रकल्पांचा प्राधान्यक्रम ठरवून ही कामे पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. ज्या प्रकल्पाला आताच मंजुरी दिली आहे, ज्या प्रकल्पाचे काम 10-20 टक्केच झालेले आहे अशा प्रकल्पांना काही काळ थांबविणे गरजेचे झाले आहे. कारण सर्व प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी आपल्याकडे जेवढा पैसा पाहिजे तेवढा पैसा आज आपल्याकडे नाही. न्यायालयीन लवादानुसार ज्या काही व्यवस्था आहेत त्यासंदर्भात आपले निर्णय झालेले आहेत अशांना सर्वोच्च प्राधान्य देऊन कृष्णा खोरेच्या संदर्भात लवादाचा जो निर्णय आहे त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार आहे.

सभापती महोदय, स्थानिक कराच्या संदर्भात या ठिकाणी सांगण्यात आले आहे. बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी "तुम्ही एलबीटी रद्द करणार, एलबीटी रद्द करणार असे सांगितले होते परंतु अद्याप पावेतो एलबीटी रद्द झालेला नाही. तुम्ही आणि आम्हीही घोषणा करीत असतो. आमच्याही जाहिरनाम्यात अनेक घोषणा आहेत. परंतु घोषणेचे निर्णय 15 दिवसात होतील, 30 दिवसात होतील अशी अपेक्षा करणे ही देखील चूक आहे. परंतु मी एलबीटीच्या संदर्भात आपल्याला सांगू इच्छितो की, कोणत्याही परिस्थितीत आम्ही एलबीटी रद्द करणार ही आमची जी घोषणा आहे त्याप्रमाणे आम्ही सन 2015 मध्ये एलबीटी रद्द करणार म्हणजे करणारच. आजही आपण एलबीटी रद्द करु शकतो. यासंदर्भात आमची भूमिका अशी आहे की, कोणताही कर लावायचा किंवा कमी करावयाचा असेल तर ती वित्तीय वर्षात करता येते. त्यामुळे 1 एप्रिल, 2015 च्या आधी आपला महाराष्ट्र एलबीटी मुक्त असणार आहे. जे तुम्हाला जमले नाही ते आम्ही करणारच आहोत. 1995 मध्ये शिवसेना-भारतीय जनता पक्षाचे सरकार होते त्यावेळेस मी अर्थ मंत्री होतो. याच सभागृहात मी घोषणा केली होती की, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जकात काढून टाकणारच अशी घोषणा केली होती त्यावेळी तुम्ही केलेली भाषणे एकदा आठवा. आम्ही "क" वर्ग महानगरपालिकेपर्यंत जकात कर रद्द केला होता तर एलबीटी क्या चिज है. या देशामध्ये वित्तीय वर्ष 1 एप्रिल,2015 ..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N-4

SGJ/ प्रथम श्री. भारवि...... 13:20

श्री. एकनाथराव खडसे ........

पासून सुरु होते असते त्यामुळे 1 एप्रिल, 2015 पासून या राज्यातील एलबीटी राहणार नाही. आम्ही कशाची वाट पाहतो त्यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, जीएसटी येणार आहे. जीएसटीमध्ये ऑक्ट्रॉयचा समावेश नसतो. राज्याच्या एकत्रित उत्पन्नाच्या हिश्श्यावर आपल्याला जीएसटीचा हिस्सा मिळणार आहे. संपूर्ण देशभरात लोकल ॲथोरिटीचे जे टॅक्सेस आहेत त्यांचा जीएसटीमध्ये समावेश केला जात नाही. राज्याचे एकत्रित उत्पन्न गृहीत धरत असतांना त्यामध्ये ऑक्ट्रॅयचा समावेश नसल्यामुळे ऑक्ट्रॉयचा पैसा आपल्याला केंद्राकडून मिळणार नाही. माननीय केंद्रीय मंत्री श्री. अरुण जेटली साहेबांशी माननीय मुख्यमंत्री 3 वेळा भेटले होते. मी सुध्दा माननीय जेटली साहेबांशी अनौपचारीक बोलत असतांना त्यांना मी हा विषय सांगितला होता त्यावेळी माझ्या बरोबर माननीय मंत्रीमहोदय श्री. चंद्रकात पाटील होते. त्यांनी आम्हाला सांगितले की, जरी नियम नसला तरी राज्यसरकारचा तुमचा मार्च पर्यंतचा असलेला ऑक्ट्रॉय आहे त्याचा एकत्रित उत्पन्नाचा आकडा काढून तो त्यामध्ये समाविष्ठ करा. तुमचा जो काही ऑक्ट्रॉय आहे त्याच्या सहित तुमचे एकत्रित उत्पन्न धरण्यात येईल व तो हिस्सा तुम्हाला यासाठी देण्यात येईल. त्यामुळे आपोआपच एलबीटी काढून टाकण्याची भूमिका केंद्र सरकारने स्वीकारली आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.एकनाथराव खडसे...

स्थानिक स्वराज्य संस्थांना एलबीटीच्या माध्यमातून 14 हजार कोटी रुपये मिळतात. राज्य शासनाला अतिरिक्त 14 हजार कोटी रुपये देण्याचे केंद्रीय वित्त मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. आम्ही फक्त मार्च महिना संपण्याची वाट पाहत आहोत कारण आम्हाला एकत्रित उत्पन्न द्यायचे आहे. कारण एकत्रित उत्पन्नाच्या आधारे केंद्र सरकार आम्हाला रक्कम देणार आहे.

सभापती महोदय, राज्याच्या आर्थिक परिस्थितीबाबत श्वेतपत्रिका काढण्याचे माननीय वित्त मंत्र्यांनी जाहीर केलेले आहे. त्यावर काही जण असे म्हणाले की, याची काय आवश्यकता आहे. हा तुमच्या आमच्या गरजेचा प्रश्न नाही की राजकीय गरजेचा प्रश्न नाही. परंतु राज्यातील जनतेला राज्याची आर्थिक स्थिती समजली पाहिजे. राज्यावर किती कर्जाचा बोजा आहे, त्यासाठी किती व्याज द्यावे लागते, किती पेन्शन द्यावे लागते, किती ग्रॅज्युएटी द्यावी लागते प्लान आणि नॉन प्लान एक्स्पेन्डीचर किती आहे याची माहिती जनतेला समजली पाहिजे.

सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात आपल्या सर्वांच्या भावना तीव्र आहेत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी आम्ही 10 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. समोरच्या बाकावरुन सांगण्यात आले की, ते कमी आहे. काल आम्ही गारपीटग्रस्त शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केले. आम्ही ते दुप्पट करुन दिले. तरी देखील आपण सांगितले की ही मदत अपुरी आहे. मी समोरच्या बाकावर असतो तर असेच म्हणालो असतो. दुष्काळग्रस्त, टंचाईग्रस्त आणि गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सर्व आमदारांचा आमदार निधी एक वर्षापुरता थांबविणार आहोत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत झाली पाहिजे अशा आपल्या सर्वांच्या प्रामाणिक भावना आहेत. आपण राज्यातील आमदारांना 700 कोटी रुपयें आमदार निधी देतो. या 700 कोटी रुपयांतून काही कामे उभी राहतील. शेतकऱ्यांच्या हाताला काही काम मिळेल. आपण आमदार निधीतून स्थानिक विकासाची कामे करतो. तेव्हा आमदारांची सहमती असेल तर हा आमदार निधी दुष्काळाच्या कामासाठी वापरण्याचा आमचा विचार आहे. मला विश्वास आहे की, आपण या चांगल्या कामासाठी नाही म्हणणार नाहीत. आमच्या वित्त मंत्री महोदयांनी श्वेतपत्रिका काढण्याचे जाहीर केलेले आहे. त्याची तयारी सुरु आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...

सभापती महोदय, राज्यामध्ये उद्योगांना सहाय्य करण्यासाठी "मैत्री गुंतवणूक कक्ष" उभा करण्याचे सरकारने ठरविले आहे. या राज्यात जे गुंतवणूकदार येतील त्यांना 22-24 किंवा काही वेळा 42 प्रकारच्या एनओसी घ्याव्या लागतात. त्यामध्ये त्यांचे कित्येक महिने खर्च होतात हा कालावधी कमी करण्याच्या दृष्टीने एक खिडकीद्वारे एनओसी देणे, त्यांना जमिनीची आवश्यकता असेल तर त्या संदर्भात त्यांच्याशी वाटाघाटी करुन शेतकऱ्यांना भूसंपादनाचे अधिकचे पैसे देण्यासाठी प्रयत्न करणे असा आमचा प्रयत्न आहे. राज्यातील गुंतवणूक वाढण्याच्या दृष्टीने मैत्री कक्ष सुरु करण्याचा सरकारचा निर्धार आहे आाणि आम्ही ते केलेले आहे.

सभापती महोदय, हे सरकार असंघटित कामगारांसाठी एक नवीन धोरण घेणार आहे. त्यामध्ये सर्व असंघटित कामगारांचा समावेश असेल. न्यायालयाच्या निर्णयानुसार व केंद्र सरकारने कायद्यामध्ये केलेल्या दुरुस्तीमुळे सीआरयआरचा निधी कामगारांच्या हितासाठी किंवा राज्याच्या हितासाठी वापरण्याची मुभा आपणास दिलेली आहे. असंघटित कामगारांना सुविधा देणे, त्यांना पगाराची खात्री देणे यासाठी नवीन स्वरुपाचे धोरण करणार आहोत. यामध्ये घरेलु कामगारांपासून शेतीमध्ये काम करणाऱ्या कामगारापर्यंत आणि शेतीमध्ये काम करणाऱ्या कामगारापासून ते टॅक्सी ड्रायव्हरचे काम करणाऱ्या कामगारपर्यंत सर्वांचा समावेश करुन त्यांच्या कल्याणासाठी जे काही करता येईल किंवा त्यांना आधार देऊन त्यांच्यात स्थिरता आणण्यासाठी, त्याला मजबुती देण्यासाठी एक धोरण आम्ही आणणार आहोत.

सभापती महोदय, आम्ही रोजगार कॉल सेंटर योजना राबविणार आहोत. आपणास माहीत आहे की, शेतीसाठी मजूर पाहिजे असतील तर ते एके ठिकाणी जमतात आणि ज्या शेतमालकाला पाच किंवा दहा शेतमजुराची आवश्यकता असेल त्याप्रमाणे तो त्यांना तेथून घेऊन जातो. त्यामुळे त्यांना रोजगारासाठी फिरावे लागत नाही. त्यांना एकाच ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. कुशल आणि अकुशल स्वरुपाचे जे तंत्रज्ञ असतील त्यांना एकत्र करुन त्यांना काम देण्याची ही योजना आहे. त्याला रोजगार कॉल सेंटर योजना म्हणता येईल. या कॉल सेंटरवरुन कुशल कामगार उपलब्ध होऊ शकेल. आपणास मोठा इंजिनिअर उपलब्ध होणार नाही. परंतु आयटीआय होल्डर, डिप्लोमा होल्डर आपणास तातडीने उपलब्ध होऊ शकेल. आपण बी.ई.झालेले,

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 13:30

श्री.एकनाथराव खडसे...

बी.ए.एम.ए. झालेले उमेदवार पाहिजे अशी जाहिरात दिली तर शेकड्याने अर्ज येतात. पण घरातील टी.व्ही.,फ्रीज नादुरूस्त झाला, नळ नादुरूस्त झाला तर आपणास चार-चार दिवस मॅकेनिक उपलब्ध होत नाही. मुंबईसारख्या ठिकाणी बऱ्याचदा असा अनुभव येतो की, टी.व्ही बिधडला असेल तर आपणास चार-चार दिवस टेक्निशिअन मिळत नाही. नळ कनेक्शन देणारा मिळत नाही म्हणून दोन-तीन दिवस पाणी येत नाही. तेव्हा जो कुशल कामगार आहे त्याला कामाची गरज असते पण त्याला मी कोणाकडे कामाला जाऊ याची माहिती नसते. तो कामासाठी फिरत असतो. ज्याचा टी.व्ही. बिघडला असेल त्याला टेक्निशिअनची गरज असते. पण तो कुठे उपलब्ध होईल हे याची त्याला माहिती नसते. अशावेळी हे कॉल सेंटर उपयुक्त ठरेल. आपण कॉल सेंटरवर फोन करुन आपली अडचण सांगायची, मग कॉल सेंटरकडे उपलब्ध असलेला माणूस आपल्याकडे दोन तासात, तीन तासात किंवा दिवसभरात उपलब्ध होईल. आपण फक्त त्याला त्याची मजुरी द्यायची आहे. यामध्ये वेळेची बचत होणार आहे. अशी ही छोटीसी कल्पना आहे परंतु ती लहान लहान कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देईल. मोठ्या शहरांमध्ये त्यास चांगला प्रतिसाद मिळेल अशी मला आशा आहे.

सभापती महोदय, आज विजेची किती टंचाई आहे हे आपणास माहीत आहे. या विजेच्या टंचाईवर मात करण्यासाठी आपणास विजेचे वेगवेगळे स्त्रोत वाढविण्याची गरज आहे. मग त्यामध्ये हायड्रो प्रोजेक्ट असेल, सौरऊर्जेचे क्षेत्र असेल, विन्ड एनर्जी असेल अशा प्रकल्पांवर आपणास अधिक जोर देण्याची आवश्यकता आहे. या अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताच्या माध्यमातून नवीन धोरण करण्याचा सरकारचा विचार आहे. जेणेकरुन काही प्रमाणात का होईना कसर भरता आली पाहिजे. सौरशक्तीवर चालणारे किंवा निर्मिती करणारे अनेक उपक्रम मागील कालखंडात धुळे आणि साक्री येथे उभे केले. कॅप्टीव्ह जनरेशन म्हणजे स्वत: स्वत:साठी वीज निर्माण करुन त्याचा वापर करणे. सौरशक्तीवर चालणाऱ्यां पंपाचा वापर करुन आपणास विजेची बचत करता येईल.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 13:40

श्री.एकनाथराव खडसे....

या दृष्टीने त्याला काही सबसिडी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. 5 हॉर्सपॉवर पर्यंतचे सौर पंप देण्याची घोषणा सरकारने अगोदरच केलेली आहे. त्याचा पहिला टप्पा जानेवारी महिन्यापासून सुरु करणार आहोत.

श्री.माणिकराव ठाकरे : महोदय, सौरशक्तीवर चालणाऱ्या पंपासाठी अनुदान देण्याची केंद्र सरकारची योजना आहे. यामध्ये राज्य सरकार अनुदान देणार आहे की, केंद्र सरकारच अनुदान देणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, सौरशक्ती पंप पुरविणाऱ्या पुरवठादारांची माननीय मुख्यमंत्र्यांनी परवा बैठक बोलाविली होती. त्यांनी सौरशक्ती पंपाची किंमत 4.5 लाख रुपये सांगितली आहे. जळगाव येथे सौरशक्तीवर चालविणारे पंप बनविणारी जैन इरीगेशन कंपनी आहे. सौरशक्ती पंपासाठी काही हिस्सा राज्य सरकार आणि काही हिस्सा केंद्र सरकार देणार आहे. परंतु अजून सौरशक्ती पंपाची किंमत ठरलेली नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : महोदय, वास्तविक पाहता सौरशक्तीच्या पंपापोटी राज्य सरकारला किती खर्च अपेक्षित आहे याची कल्पना माननीय मंत्र्यांना असावयास पाहिजे.

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, या संदर्भातील अंदाज आम्ही घेत आहोत. केंद्रीय मंत्री माननीय श्री.पीयुष गोयल यांनी राज्याला या बाबत सूचना केली आहे. ही केंद्र सरकारची योजना आहे. परंतु केंद्र सरकार सर्व राज्यांना इतक्या मोठ्या प्रमाणावर सौरशक्ती पंप देऊ शकणार नाही. कारण केंद्र सरकारला हे सौरशक्ती पंप देशभर पुरवयाचे आहेत. शिवाय केंद्र सरकारचे या बाबतीतील उद्दिष्ट मर्यादित स्वरुपाचे आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, या कामी राज्य सरकार काही हिस्सा देणार असेल तर महाराष्ट्राला जे सौरशक्ती पंप देण्यात येणार आहेत त्यामध्ये वाढ करता येईल. महोदय, या बाबत माननीय मंत्र्यांसोबत चर्चा सुरु आहे. या बाबतचा निर्णय अजूनपर्यंत झालेला नाही. वास्तविक पाहता माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे वर्षभरात सरकार काय करणार आहे, कोणत्या दिशेने जाणार आहे या संदर्भात असते. उद्याच काय होणार आहे या बाबतचे अभिभाषण नसते. त्यामुळे वर्षभरात सौरशक्ती पंपाच्या सबसिडीबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

**उप सभापती** : मी माननीय मंत्र्यांना विचारतो की, आपल्याला उत्तर संपविण्यासाठी अजून किती वेळ लागणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, मी माझे उत्तर 10 मिनिटात संपवितो. केवळ एकाएका वाक्यात मुद्दे मांडतो. महोदय, कोरडवाहू शेती अभियानाची सुरुवात करण्यासाठी, पडीत जमिनीचा विकास करण्यासाठी, कोरडवाहू जमिनीमध्ये ओलावा निर्माण करण्यासाठी मग त्यामध्ये शेततळी असतील, शेतचाऱ्या असतील, नाला बांधकाम असेल, नाला रुंदीकरण असेल, नालाबंडींग असेल, नाला सरळीकरण असेल, लघुसिंचन व्यवस्था असेल, सूक्ष्मसिंचन व्यवस्था असेल, तुषारची व्यवस्था असेल किंवा पाण्याचे अन्य स्त्रोत असतील. त्या अनुषंगाने सांगतो की, पाण्याचा थेंब अन थंब जमिनीत अडला पाहिजे, जिरला पाहिजे. यामुळे पाण्याची मोठी पातळी वाढेल असे नाही, पण जमिनीतील मातीमध्ये ओलावा निर्माण झाला पाहिजे, अशा प्रकारचे धोरण सरकारने घ्यायचे ठरविले आहे.

महोदय, फळ प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार हमी योजनेसारख्या अन्य योजना एकत्र करुन या संदर्भात 49:51 असे सूत्र राबविण्याचा विचार शासन करीत आहे. सध्या 60:40 चे सूत्र आपल्याकडे आहे. ते 49:51 नुसार राबविण्याचा विचार राज्य सरकारचा आहे. त्यासाठी काल सभागृहात सन्माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी सांगितले की, या संदर्भात केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला आहे. केंद्र सरकारच्या योजनांतून अधिकाधिक लाभ मिळाला पाहिजे यासाठी केंद्र सरकारचे सूत्र बदलले पाहिजे. या बाबत केंद्र सरकारने सूचना केली आहे की, 49:51 नव्हे तर ते सूत्र 50:50 असे करुन देण्यात येईल. हा बदल लवकर झाला तर त्या माध्यमातून इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण होऊ शकेल. हे दुष्काळी भागासाठी सूत्र आहे. अशा प्रकारे 50:50 सूत्र ठरविल्यास गटारांची कामे होतील,, ग्रामपंचायतची कामे होती, पाण्ंद रस्ते किंवा इतर विविध कामे मोठ्या प्रमाणावर होऊ शकतील.

महोदय, फळ प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. विदर्भात संत्रा पिकावर प्रक्रिया करणारे एक युनिट सुरु करण्यात आले होते. परंतु कालांतराने ते बंद पडले. या बाबत सन्माननीय विधानसभा सदस्य डॉ.आशिष देशमुख यांनी काल एक बैठक

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 13:40

श्री.एकनाथराव खडसे....

आयोजित केली होती. मी सुध्दा त्या बैठकीला उपस्थित होतो. विदर्भातील बंद पडलेल्या संत्रा प्रक्रिया युनिटचे नूतनीकरण करण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. विदर्भात संत्रा प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी अशा प्रकारचे प्रकल्प राज्यभरात सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

महोदय, कृषी विभागाच्या बाबतीत सांगतो की, माती परीक्षण कार्ड योजनेंतर्गत विशेषत: एक पीक विमा योजनेमध्ये 10, 20, 60 टक्के उंबरठा उत्पन्न ही बाब आपल्या लक्षात आली आहे. ही बाब बदलविण्यासाठी विमा कंपन्यांसोबत चर्चा सुरु आहे.

महोदय, कृषी उत्पन्न पणन समिती अधिनियमामध्ये बदल करावयाचा आहे. तसेच मनरेगाच्या सूत्राबाबत मी अगोदरच सांगितले आहे.

महोदय, मच्छीमारांच्या हितासाठी बंदरे व धक्के नव्याने बांधली पाहिजेत. आपल्याकडे जेट्टींची संख्या फार कमी आहे. त्यातल्या त्यात मासेमारीसाठी जेट्टी व बंदरे फारच कमी आहेत. मुंबईतील ससून डॉक सोडले तर मोठ्या प्रमाणावर मासे साठविण्याची आणि शीतकेंद्राची व्यवस्था दुसरीकडे नाही. समुद्र किनारपट्टीवरील जेट्टी वाढविणे आणि ज्या ठिकाणी परवानगी मिळेल त्या ठिकाणी शीतकेंद्रांची उभारणी करणे आणि माशांचा कच्चा माल बाजारपेठेपर्यंत पोहचविण्यासाठी उपययोजना करण्यासाठी तसेच बोटी बांधण्याकरिता अधिक निधी देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. आज सुध्दा बोटी बांधण्यासाठी 90 टक्के अनुदानावर निधी देत आहोत. त्यामध्ये वाढ करण्यात येईल. मासेमारी हा राज्यात मोठा व्यवसाय होऊ शकतो. शिवाय आपल्या राज्याला 720 कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. त्यामुळे मच्छीमारांच्या संदर्भात अधिकची व्यवस्था निर्माण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

महोदय, सहकारी संस्थांतील, पतसंस्थांतील ठेवीदारांना संरक्षण देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. वितरण व्यवस्थेंतर्गत साठवण क्षमतेत वाढ करणे अपेक्षित आहे. केंद्र सरकारने राज्याला सूचना केली आहे की, गोडाऊनचे बांधकाम मोठ्या प्रमाणावर झाले पाहिजे. तसेच ते गाव आणि तालुका पातळीपर्यंत केले पाहिजे. माननीय केंद्रीय राज्यमंत्री श्री.रावसाहेब दानवे-पाटील यांनी केंद्र सरकारची गोडाऊन योजना महाराष्ट्रासाठी लागू करण्याबाबत बैठक घेतली होती. केंद्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

सरकारची गोडाऊन योजना गुजरात सारख्या 12 राज्यांत लागू आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचा समावेश करुन, राज्यात मोठमोठी गोडाऊन्स उभे करणे अपेक्षित आहे. ती गोडाऊन्स वेअर हाऊसिंग कार्पोरेशनच्या माध्यमातून उभी करणे अभिप्रेत आहे. त्या गोडाऊनमध्ये शेतीमाल ठेवणे, तो माल सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे, गोडाऊनच्या पावतीच्या आधारे बँकांनी तात्पुरत्या स्वरुपात कर्ज उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने या बाबत राष्ट्रीयकृत बँकांना सूचना दिल्या आहेत की, शेतकऱ्यांनी गोडाऊनमध्ये ठेवलेल्या मालाच्या बाजारभाव किंमतीच्या 75 टक्के रक्कम त्या शेतकऱ्यांना कर्ज रुपाने दिली पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात कर्ज प्राप्त होईल. तसेच ज्यावेळी बाजारामध्ये शेती मालाला किमंत येईल त्यावेळी तो माल गोडाऊनमधून काढून तो बाजारात विकता येईल आणि ते पैसे बँकेच्या माध्यमातून परस्पर जमा होतील, अशा प्रकारची व्यवस्था वेअर हाऊसिंग कार्पोरेशनच्या माध्यमातून या राज्यामध्ये राबविण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. या बरोबरच खाजगी गोडाऊन्स बांधण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. सरकारी गोडाऊन तालुका पातळीवर किंवा सरकारी जागा उपलब्ध असेल त्या ठिकाणी होतील. गोडाऊनसाठी सरकार स्वत:हून जमीन संपादन करण्यास तयार नाही. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तालुक्याच्या ठिकाणी गोडाऊन नसतील आणि त्या ठिकाणी गोडाऊन उभारण्यासाठी सरकारी जागा उपलब्ध आहे या बाबत तहसीलदार किंवा जिल्हाधिकाऱ्यांचा दाखला असेल तर त्या ठिकाणी राज्य सरकार हजारो टन क्षमतेचे गोडाऊन मंजूर करेल. तसेच त्यासाठी लागणारा 100 टक्के पैसा वेअर हाऊस कार्पोरेशनच्या माध्यमातून देण्यात येईल.

महोदय, घरात जर स्वत:च्या वापरासाठी गोडाऊन बांधायचे असेल तर त्यासाठी स्वत:ची जागा, स्वत:च बांधकाम आणि स्वत:च खर्च करावा लागेल. त्यासाठी सरकारची 50 टक्के अनुदानाची योजना पूर्वीपासून आहे. त्या अनुदानामध्ये वाढ करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी मला सांगितले आहे. अशा प्रकारे गोडाऊन्स निर्माण करण्याबाबतचा विचार सरकारचा आहे.

..5..



श्री.एकनाथराव खडसे....

महोदय, माजी मालगुजारी तलाव आणि तळी ही साधारणतः जंगलात असतात. अशा तलावांतील आणि बाहेरच्या तलावातील गाळ काढण्यासाठी विशेष मोहीम राज्य सरकारकडून राबविण्याचा एक धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे. हे तलाव 350 वर्षांपूर्वीचे आहेत. परंतु या तलावांकडे दुर्लक्ष झाले आहे. आजही त्या तलावांमध्ये पाणी साठत आहे. 350 वर्षे उलटून सुध्दा एकही तलाव फुटलेला नाही. त्यामुळे या तलावांना पुनर्जिवीत करण्यासाठी विशेष कार्यक्रम हाती घेत आहोत.

महोदय, एकात्मिक पाणलोट क्षेत्र, विकास व्यवस्थापन कार्यक्रम, नदी गुणवत्ता अभियान कार्यक्रम तसेच ग्रामीण भागातील जनतेच्या राहणीमानात सुधारणा करण्यासाठी मनरेगा अंतर्गत इतर विभागाबरोबर एकत्रित योजना तयार करीत आहोत. मग त्यात फळबागा लावण्यासाठी मनरेगाचा वापर असेल. मी सरकारला मनरेगाबाबत एक सुचविले आहे. मनरेगा योजनेत सुधारणा करण्याबाबत सन्माननीय कै.गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत चर्चा झाली होती. त्यांनी यात सुधारणा करण्याचे मान्य केले होते. त्यांनी एका चांगल्या योजनेला थोड्या दिवसात चालना दिली होती. दुर्दैवाने कै.गोपीनाथजी मुंडे आज नाहीत. सन्माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांच्यासोबत सुध्दा चर्चा झाली आहे. ती योजना अशी होती की, शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये काम करणारा मजूर मनरेगा किंवा रोजगार हमी योजनेसाठी पात्र ठरला पाहिजे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

शेतकरी शेतामध्ये काम करीत आहे, म्हणजे मजुरीच करीत आहे. त्याला मनरेगाच्या माध्यमातून पगार दिला गेला पाहिजे, त्याचे जॉब कार्ड काढले पाहिजे, त्याची नोंदणी केली पाहिजे, आमच्या शेतात काम करण्यास पाठविले पाहिजे आणि त्याचे चेकिंग केले पाहिजे की, तो काम करतो की नाही. त्याचा पैसा बँकेच्या खात्यात जमा केला पाहिजे. आज शेतकऱ्यांना शेती परवडत नाही. त्यामुळे त्याची किमान मजुरी सरकारला यातून द्यावी लागणार आहे. मजूर काम तर करणार आहे. मजुराच्या हाताला काम द्यायचे आहे. मजुराला वर्षाकाठी 100 दिवस रोजगार मिळाला पाहिजे, अशी योजना आहे. सुगीच्या दिवसांमध्ये शेत मजुराला सरकारनेच मजुरीचा पैसा दिला तर शेतकऱ्याचा भार हलका होईल. ही योजना कै. गोपीनाथ मुंडे यांनी मान्य करून त्या दोन दिवसांच्या काळात बैठका घेऊन तयार केली होती. आदरणीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी साहेबांनी ती स्वीकारली होती. ते त्या संदर्भात पाठपुरावा करीत आहेत. परंतु, आता आदरणीय केंद्रीय मंत्र्यांकडे ते खाते राहिलेले नाही. ते खाते आदरणीय केंद्रीय मंत्री श्री. चौधरी साहेबांकडे आले आहे. आता आम्ही त्यांच्याकडे या संदर्भात पाठपुरावा करीत आहोत. शेतकऱ्यांना मदत करण्याचे हे प्राथमिक स्वरूपामध्ये सूत्र आहे, ते मान्य आहे. विभागाकडून त्याला विरोध होत आहे की, त्यांची स्थायी मालमत्ता उभी राहत नाही. पण त्यातील त्रुटी दूर करून हे केले पाहिजे, असा आमचा आग्रह आहे. राज्य सरकार केंद्र सरकारकडे या संदर्भात पाठपुरावा करणार आहे.

सभापती महोदय, आपले राज्य हगणदारी मुक्त झाले पाहिजे. संडास बांधण्यासाठी 15 हजार रूपयांपर्यंतचे अनुदान देण्याच्या संदर्भात राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. सामुहिक स्वच्छतागृहांच्या बांधकामासाठी किंवा खाजगी व्यक्तीला संडासचे, शौचालयाचे बांधकाम करायचे असेल तर त्यास लागणाऱ्या जमिनीसाठी महसूल विभागाची जमीन विनापैशाने, फुकट देण्यात येईल. फक्त त्याने तेथे शौचालयाचे बांधकाम करावे मग ते सार्वजनिक असेल किंवा स्वत:चे असेल.

सभापती महोदय, अनेक किनारपट्टींवरील तिवरांचे संरक्षण करण्यासाठीची मोहीम, व्याघ्र प्रकल्प, सर्व पर्यटनस्थळे एकत्रित आणणे, त्यांना जोडणे, रस्ते करणे, त्याचे मार्गदर्शनपर सूत्र

..2

श्री. एकनाथराव खडसे ....

ठरविणे, काही धरणे असतील तर त्यांची निवड करणे, वॉटरस्पोर्टची उभारणी करणे ही कामे शासन भविष्यात करणार आहे. पाण्याचे आकर्षण लहान मुलांना असते. वॉटरस्पोर्ट वगैरेंची उभारणी करणे हे देखील काम शासन करणार आहे. धरणाच्या क्षेत्रातील किंवा अन्य क्षेत्रातील जागा सरकारने संपादित केलेल्या आहेत. धरणाचे पाणी आहे म्हणून त्या ठिकाणी बीओटीवर अशा स्वरूपाच्या कामांना चालना देऊन, बांधा, वापरा व हस्तांतरित करा असे करणार आहोत किंवा हस्तांतरित करू नका, तुमच्याकडे ठेवा, पण लिजवर त्यांना त्या जमिनी देणे आणि पाणी वापराची हमी म्हणजे त्या धरणातून पाणी वॉटर स्पोर्टसाठी, वॉटरगेमसाठी देणे, अशी योजना तयार करून पर्यटनाला चालना देण्याचे काम शासन करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तारापोरवाला मत्स्यालयाचा विषय मांला होता. मी त्या संदर्भात सांगू इच्छितो की, मत्स्यालयाच्या नूतनीकरणाचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे. त्यामधील मासे किंवा तत्सम प्राणी आणण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. 26 जानेवारीच्या आसपास नूतनीकरण झालेल्या तारापोरवाला मत्सालयाचे उद्‌घाटन करून सर्व पर्यटकांसाठी त्यावेळी खुले केले जाईल.

सभापती महोदय, कुंभमेळा, अत्याधुनिक शहरांची निर्मिती, प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, सन 2022 पर्यंत सर्वांना घरे देणे, मुंबईसारखी मुंबईच्या बाहेर टाऊनशिप डेव्हलप करणे, ॲफॉर्डेबल हाऊसिंगच्या संदर्भात चालना देणे, मध्यमवर्गीयांसाठी अधिकाधिक स्वस्त किंमतीत घरे उपलब्ध करून देणे अशा महत्वाकांक्षी योजना आहेत. गिरणी कामगारांच्या घरांचाही विषय आहे. गिरणी कामगारांच्या घरासाठी वेगळे टिपण आहे. गिरणी कामगारांना घरे देण्याचा आम्ही नक्की प्रयत्न करू. माननीय मुख्यमंत्र्यांना त्या संदर्भात विचारले तर चांगले होईल. परवा त्यांनी जागेच्या संदर्भात, मोफत घरे देण्याच्या संदर्भात निर्णय घेतला. त्यामुळे ते माझ्यापेक्षा अधिक माहिती देतील.

सभापती महोदय, जलवाहतूक प्रकल्पांना चालना देणे, सर्व गावांना जोडणे जे शासनाने उद्दिष्ट आहे. मागच्या आठवड्यात माननीय ग्रामविकास मंत्री श्रीमती पंकजा मुंडे-पालवे यांनी

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

योजना जाहीर केली. पंतप्रधान सडक योजने सारखी एक योजना राज्यात करण्याचा त्यांचा संकल्प आहे. राज्य अधिस्वीकृती व मूल्यांकन परिषदेची स्थानना, ई-लर्निंगचा व्यापक प्रमाणावर वापर, राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियानाची अंमलबजावणी, कौशल्य विकास कार्यक्रमाचे बळकटीकरण, भारतीय माहिती तंत्रज्ञान, जीजाऊ वसतिगृह आधार केंद्र उभे करणे, महामार्गावरील अपघातांसाठी ट्रॉमा केअर सेंटरची उभारणी करणे, ग्रामीण भागात दवाखाने उभारण्यास चालना देणे, विशेष करून, रोगनिदान केंद्राची स्थापना करण, आरोग्य केद्रांचे नूतनीकरण, जे.जे. रूग्णालयाच्या परिसरात 1 हजार खाटांचे अतिविशेष उपचार केंद्र उभे करणे, कोल्हापूर चित्रनगरीचा पुनर्विकास करणे, क्रीडा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे, नवव्या इयत्तेतील प्रवेशापासून जात प्रमाणापत्राची प्रक्रिया सुलभ व पारदर्शी करणे, जिल्हा पातळीवर जात प्रमाणापत्र  मिळण्याच्या संदर्भात मागच्या निर्णयांची अंमलबजावणी करणे, ज्येष्ठ नागरिकांसाठी विद्यमान धोरणात बदल करणे, 2 वर्षांत सर्व कायद्यांचा आढावा घेऊन कालबाह्य कायद्यांमध्ये दुरूस्ती करणे करणे किंवा स्क्रॅप करणे असे अनेक विषय शासनासमोर आहेत. आपल्याकडे अजूनही मुंबई पोलीस अधिनियम, हैद्राबाद निजाम स्टेटचे कायदे जे संभाजीनगरसाठी आहेत, ते लागू आहेत.   आपल्याकडे विदर्भात अजूनही सीपी ॲण्ड बेरारचा नझूल ॲक्ट आहे. या व आपल्या ॲक्टचे एकत्रिकरण करणे आणि सध्याच्या कायद्याशी सुसंगत करून त्यामध्ये बदल करणे व जुने कायदे स्क्रॅप करणे याबाबत शासन कार्यवाही करणार आहे. न्यायालयामध्ये पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, वन हक्क कायद्यानुसार आदिवासींना संरक्षण, मागासवर्गीयांसाठीच्या योजनांसाठी  विशेष मोहीम आखणे या संदर्भात सुध्दा शासन कार्यवाही करणार आहे. मागासवर्गीयांसाठी अनेक योजना जाहीर केल्या, पण त्या ओव्हरलॅपिंग होत चालल्या आहेत. तरी या संदर्भात लक्ष देणे गरजेचे आहे. फायदा मात्र कोणत्याच योजनेतून त्यांना मिळत नाही. मागासवर्गीयांना एकाच ठिकाणाहून योजना राबविणे आणि त्यांच्यासाठी अधिक पैशाची तरतूद करणे गरजेचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मागासवर्गीयांच्या योजनांचे पिरिऑडिकल ऑडिट झाले तर त्या योजना किती प्रमाणात कार्यरत आहे, किती फायदा मिळत आहे, किती फायदा मिळत नाही, याची आपल्याला कल्पना येईल. मागासवर्गीय मग त्यामध्ये जाती, जमाती, ओबीसी असतील, अल्पसंख्याक, आदिवासी असतील सर्वांच्या कल्याणाच्या योजनांचे पिरिऑडिकल ऑडिट झाले तरच त्यांना न्याय मिळेल.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चांगली सूचना केली आहे. निश्चितच या माध्यमातून राज्य सरकारचाही पैसा वाचेल आणि बोगस लाभार्थी शोधता येतील. निश्चितपणे सरकार याचा विचार करेल. मागासवर्गीय म्हणजे निव्वळ एससी, ओबीसी, एनटी, व्हिजेएनटी, डीटीएनटी अशा सर्वांच्या शिष्यवृत्ती किंवा अन्य योजनांच्या संदर्भात आहे. अल्पसंख्याक म्हणजे ख्रिश्चन, मुस्लिम, जैन समाजाचे कल्याण करण्यासाठी योजनांचे बळकटीकरण करणे, मराठी भाषेचे संशोधन करणे गरजेचे आहे. कर्नाटक सीमेवरील मराठी जनतेची बाजू घेण्यास विधी न्यायालयाचे विशेष, सर्वोच्च न्यायालयाचे चांगले वकील किंवा 4-5 निवृत्त न्यायाधीशांचा सल्ला घेण्यापेक्षा त्यांची समिती नियुक्त करणे, त्यांना योग्य ते मानधन, पगार देणे, शासनाची भूमिका प्रभावीपणे केंद्र शासनाकडे आणि आता सुप्रीम कोर्टात केस सुरू आहे तेथे प्रभावीपणे मांडण्यासाठी व्यवस्था करणे व स्वच्छ व पारदर्शक कारभाराचे दिलेले वचन पूर्ण करणे या शासनापुढील बाबी आहेत.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या माध्यमातून एक नवीन योजना स्वस्त धान्य दुकानदारांसाठी येणार आहे. स्वस्त धान्य दुकानदारांकडे कार्ड घेऊन बायोमॅट्रिक पध्दतीने धान्य मिळेल. कार्डवर तुमचा फोटो असेल, अंगठ्याचा ठसा असेल. त्याच क्षणाला त्याची माहिती ऑनलाईन तहसील कचेरीत व जिल्हाधिकारी कार्यालयात डीएसओच्या कार्यालयात जाईल. रॉकेल, गॅस व इतर बाबतीत देखील बायोमॅट्रिक पध्दतीने व्यवस्था करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

सभापती महोदय, अनेक विषय आहेत. खूप वेळ झाला आहे. राज्य सरकार दिलेले शब्द शंभर टक्के पूर्ण करण्याचा प्रयत्न करील. कोणत्याही बाबीच्या मर्यादा असल्या तरी त्यावर मात करुन राज्यातील सर्वसामान्य, गोरगरीब माणसापासून सर्व क्षेत्रांतील लोकंना न्याय देण्याचे, त्यांना

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

आधार देण्याचे काम सरकार निश्चित करेल, एवढा मी आपल्याला विश्वास देतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**उप सभापती** : आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व रुग्णालयात कार्यान्वीत केलेल्या सौरऊर्जा प्रकल्पामध्ये केवळ दोन वर्षानंतरच कोट्यावधी रुपयांची सौरयंत्रणा, सौरपथदिप, सौरबंब गायब झाल्यामुळे त्याची उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथील वसतिगृहात अल्पवयीन मागासवर्गीय मुलीवर अत्याचार करुन ती गर्भवती राहिल्याची घटना, अशा प्रकारची घटना अनेक वसतिगृहात घडत असल्यामुळे राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, या प्रकरणी आरोपींवर करावयाच्या कारवाईबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय पाटील यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोचरेतील मिनी पर्ससीनधारकांच्या हद्दीत मालवणातील सुमारे 150 ते 200 नौकामधून मच्छिमारांनी शिरकाव करणे, पर्ससीन नेटधारक व पारंपारिक मच्छिमार यांच्यात भर समुद्रात वाद होणे, या प्रकरणी सागरी सुरक्षा दल, मत्स्यव्यवसाय व पोलीस प्रशासन हस्तक्षेप न करण्या संदर्भात" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी "राज्यातील सुशिक्षित बेरोजगाराच्या 8500 संस्थांना 16.50 टक्के कामे स्पर्धेशिवाय मिळण्याकरिता तसेच संस्थेस प्रतिवर्षी मिळणारे अनुदान सन 2007-2008 पासून बंद असणे, या मागण्यांचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, शासनाने याबाबत निवेदन करावे.

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती............**

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "मुंबई विमानतळाच्या आधुनिकीकरण आणि दुरुस्तीच्या कामात विलंब करणाऱ्या कंपनीच्या अध्यक्षांविरुध्द गुन्हा दाखल करण्यास पोलीस अधिकाऱ्यांनी टाळाटाळ केल्याने माननीय न्यायालयाने पोलीस आयुक्त, सह आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक यांच्यावर तक्रार नोंदवून घेण्यास टाळाटाळ केल्याचा ठपका ठेवल्याबाबत सदर पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा नोंदविण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, आनंद ठाकूर, राहुल नार्वेकर यांनी "कॅन्सरसारखा आजार कायमचा बरा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या स्टेम सेल या औषधाचा अन्य आजारावरील वापर करुन तसेच चढ्या भावाने स्टेम सेल विकून डॉक्टर्स लाखो रुपये कमावित असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील पळशी येथे जाफर शेख या शेतकऱ्याने दिनांक 15-12-2014 रोजी आत्महत्या केल्यामुळे दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी गेलेल्या पथकाने तेथे जाणे टाळणे, जास्त नुकसान झालेल्या भागात पथक न गेल्यामुळे येथील शेतकऱ्यांमध्ये पसरलेल्या असंतोषाबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी "भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यांतर्गत करडी येथील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी दिनांक 11 डिसेंबर, 2014 रोजी एलोरा पेपर मिल बघायला गेले असता येथील क्लोरीन वायु गळती होऊन नऊ विद्यार्थी बेशुध्द पडणे याबाबत औद्योगिक सुरक्षा अधिकारी आणि प्रदूषण नियंत्रण मंडळावर कारवाई करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, शासनाने याबाबत निवेदन करावे.

------------

...3....



SRR/ प्रथम श्री.मंगेश....... 14:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : तरुण मुलांना आंतकवादी बनविण्याची टोळी राज्यात सक्रीय असणे

**मु. शी.**: तरुण मुलांना आंतकवादी बनविण्याची टोळी राज्यात सक्रीय असणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"कल्याण येथील काही महिन्यांपूर्वी बेपत्ता झालेले चार तरुण आरिफ एजाज महम्मद ऊर्फ गुड्डू, अमन तांडेल, सलीम तानकी आणि फहद शेख हे थेट इस्लामिक स्टेट ऑफ इराक ॲण्ड सिरीया (आयएसआयएस) या दहशतवादी संघटनेत सामील होवून इराकमध्ये सुरू असलेल्या जिहादी युद्धात सक्रिय झाल्याचे उघडकीस येणे, कल्याणमध्ये जिहादी घडविण्याचे कट रचत असतांनाही राज्याची तपास यंत्रणा सुस्त असणे, सदर प्रकरणामुळे पोलिस यंत्रणेच्या कार्यशैलीबाबत निर्माण झालेली शंका, सदर घटनेमुळे परिसरातील नागरिक चिंताग्रस्त होणे, तरुण मुलांना आंतकवादी बनविण्याची टोळी राज्यात सक्रीय असणे, याकडे शासनाचे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून तातडीने कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." "

डॉ.रणजीत पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------------

...4.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, कल्याण येथील बेपत्ता झालेले चार तरुण इस्लामिक स्टेट ऑफ इराक ॲण्ड सिरिया, ईसीस या दहशतवादी संघटनेमध्ये सामील होऊन त्यामधील एक तरुण भारतात परत आला, या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे.

सभापती महोदय, कल्याण येथील चार तरुण दिनांक 25/05/2014 रोजी मुंबई येथून विमानाने बगदादला गेले होते. त्यांच्याबरोबर अन्य 250 लोकही गेले होते. त्यापैकी भारतात परत न आलेल्या 4 तरुणांबरोबरच न आलेल्यांमध्ये अन्य 18 लोकही होते. हे 18 लोक बगदाद येथे गेल्यानंतर परत भारतात आले नाहीत, या संदर्भात सरकारने कोणता पाठपुरावा केला आहे ?

सभापती महोदय, 26/11 च्या हल्ल्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणी वाढलेल्या अतिरेकी कारवायांबाबत राम प्रधान समितीने दिलेल्या अहवालानुसार मुंबई बरोबरच पुणे, नाशिक, कल्याण, ठाणे, नागपूर ही शहरे सुध्दा अतिरेक्यांची केंद्रे बनत जाणार आहेत, असे लक्षात आले आहे. या संदर्भात शासनाने कोणती पावले उचलली आहेत किंवा ईसीस संघटनांसारख्या अन्य संघटनांच्या कारवाया रोखण्यासाठी शासनाने कोणती पावले उचलली आहेत ?

सभापती महोदय, कल्याण येथुन बगदाद येथे गेलेले चारही तरुण उच्चशिक्षीत तरुण आहेत, इंजिनिअर आहेत, मध्यमवर्गातील आहेत. अशाच प्रकारच्या तरुणांना गळाला लावले जाते. ज्याप्रमाणे बंगलोर येथील मजदर बिस्वास या तरुणाला अटक करण्यात आली आहे. त्याप्रमाणेच कल्याण येथील चारही तरुण मेकॅनिकल इंजिनिअर आहेत आणि त्यामधील एक तरुण भारतात परत आला आहे. तो भारतात परत आल्यानंतर त्याच्याकडून काही धागेदोरे आपल्याला मिळाले असावेत. बंगलोर आणि कल्याणमध्ये ईसीसचे वाढते जाळे आहे. आपण पाहिले असेल की, सिडनीमधील एका कॅफेमध्ये लोकांना होस्टाईल करुन ठेवण्यात आले. कालच पाकिस्तानमध्ये एका वेगळ्या दहशतवादी संघटनेने अनेक छोट्या मुलांना मारुन टाकले. या अतिरेक्यांचे जाळे महाराष्ट्रापर्यंत पसरलेले असताना लेखी निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, या बाबतचा तपास एनआयए करीत आहे. एनआयए ही केंद्र शासनाची तपास यंत्रणा आहे. राज्याचे एटीएस काय करीत आहे ? एनआयए त्यांच्या स्तरावरुन तपास करणारच आहे. परंतु, आपल्या राज्यामध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि तपासाच्या दृष्टीने एटीएसने कोणती पावले उचलली आहेत ?

...5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजीत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने काही उप प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी शेवटचा प्रश्न असा विचारला की, बंगलोरमधील मजदर बिस्वास आणि कल्याणमधील तरुणांमध्ये काही लिंक आहे का ? बंगलोरमध्ये तशा प्रकारची लिंक आतापर्यंत तरी आढळून आलेली नाही. परंतु, हैद्राबाद येथील दोन लोकांना पकडले गेले आहे, ज्यांची लिंक उमरखेड आणि कळमनुरी मध्ये आहे. हा तपास झालेला आहे आणि त्यामध्ये अशी लिंक उघडकीस आलेली आहे. त्या दोघांनाही अटक करण्यात आली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी राज्यातील एटीएस काय करीत आहे, असाही प्रश्न उपस्थित केला आहे. ॲन्टी टेररिस्ट सेल आणि स्कॉड आपल्याकडे आहे. कुठे, कोणी इंडॉक्ट्रीनेट होऊन समाजात विष पेरत आहे का, याचा शोध घेण्यासाठी आपल्याकडे एक सेल कार्यरत आहे.

सभापती महोदय, कल्याणच्या चारही तरुणांची पार्श्वभूमी बघितली तर ते विद्यार्थी आहेत, 22 ते 25 वयोगटातील आहेत, मध्यमवर्गातील आहेत, एकाच महाविद्यालयात शिकत आहेत, एकाच परिसरात रहात आहेत. त्यामुळे अशा प्रकारे कोणी तरुणांना जाळ्यात ओढत आहे का, याबाबतीत शासन दक्ष असून त्याकडे लक्ष ठेऊन आहे. काही परिसरात 'होली इतिहाद' च्या नावाखाली धर्माधर्मामध्ये विष पेरण्याचे काम कोणी करीत आहे का, या विषयी सरकार एटीएसच्या माध्यमातून लक्ष ठेऊन आहे. त्यांनी काही एरिया देखील टार्गेट केले आहेत. त्याकडे सरकारचे पूर्ण लक्ष आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा असाही प्रश्न होता की, एटीएसचा स्कॉड कमी पडतो का ? परंतु, तशी परिस्थिती नाही. मुंबईमध्ये ज्या ठिकाणी नवीन लोक येतात, राहतात, त्यांना हुडकून काढण्याचे काम स्पेशल फोर्स करीत आहे. या व्यतिरिक्त आवश्यकता असेल तर एनआयए वर अवलंबून राहण्याचे काही कारण नाही. कारण ती ॲपेक्स संस्था असून आपली कोअर संस्था आहे. त्यामुळे त्यांना इन्फॉर्म करावे लागते. ते कलमे लावतात, तेच डिटेन करतात आणि पुढे इंटरॉगेट करतात. तथापि, सर्वस्वी त्यांच्यावर विसंबून न रहाता आपले काम आपण करतोच आहोत. पण त्यांची मदत आपल्याला वेळोवेळी घ्यावी लागते, हे देखील आपल्याला नाकारता येणार नाही.

...6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, एटीएस यंत्रणा सर्व गोष्टींवर बारकाईने लक्ष ठेऊन आहे. कोणी जातीय विष पेरण्याचे काम करीत आहे का, कोणी माथी भडकविण्याचे काम करीत आहे का, याकडे एटीएस लक्ष ठेऊन आहे. परंतु, एखाद्या वस्तीमध्ये ज्यावेळी नवीन लोक राहावयास येतात आणि अशा प्रकारची विघातक कृत्ये करीत असल्याबाबतचा संशय स्थानिक लोकांना येतो, त्यावेळी त्यांनी कोणाला जाऊन सांगायचे, हा एक प्रश्न आहे. ते ज्यावेळी स्थानिक पोलीस स्टेशनला जातात, त्यावेळी स्थानिक पोलीस स्टेशन हा विषय गांभीर्याने घेत नाही, अशा तक्रारींकडे दुर्लक्ष केले जाते किंवा संबंधितांना पोलीस स्टेशनला बोलावून थातुरमातुर चौकशी केली जाते आणि सोडून दिले जाते. त्यामुळे प्रत्येक पोलीस स्टेशनवाईज शक्य नसेल तर किमान प्रत्येक रिजनवाईज एटीएसचे स्वतंत्र दल कार्यरत करणार का, लोकांना याबाबतची माहिती कशी दिली जाणार आणि अशा प्रकारे कोणी अतिरेकी कारवायांमध्ये गुंतले असल्याचा संशय आला तर तक्रार करण्यासाठी रिजनवाईज विशेष व्यवसथा शासन करणार आहे का ?

यानंतर श्री.मा.शिगम........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित देशमुख : हे खरे आहे की, असा अनुभव आल्याचे काही लोकांनी मला विदीत केले आहे. पोलीस स्टेशनला अशा प्रकारच्या तक्रारी केल्यानंतर त्या तक्रारीला महत्व दिले जात नाही किंवा त्याची दखल घेतली जात नाही. सन्माननीय सदस्यांनी रिजनवाईज एटीएस स्क्वॉड निर्माण करण्याची मौलिक सूचना केली आहे. यासंदर्भात हेल्प लाईन नंबर देण्याचा शासनाचा मानस आहे.

श्री. भाई गिरकर : पोलीस स्टेशनने ठरविले तर अशा प्रकारचे अड्डे ताबडतोब उद्ध्वस्त होतील. कांदीवली, मालवणी आणि भाईंदर या परिसरामध्ये अतिरेक्यांचे अड्डे निर्माण झालेले आहेत. हे अड्डे पोलिसांनी वेळीच उद्ध्वस्त केले तर पुढचे प्रकार होणार नाहीत. जेथे जेथे अशा प्रकारचे अड्डे असतील ते उद्ध्वस्त करण्यासाठी त्या त्या पोलीस स्टेशनला सक्त ताकीद देण्यात येईल काय ?

डॉ. रणजित पाटील : Suggestion will be taken for action. तसे आदेश देण्यात येतील.

श्रीमती शोभा फडणवीस : एखादी भाडेकरु म्हणून राहाणारी व्यक्ती अतिरेकी म्हणून पकडली गेली तर घरमालकावर देखील चौकशी करुन कारवाई करण्यात येईल काय ?

डॉ. रणजित पाटील : Suggestion will be taken for action.

प्रा. जोगेंद्र कवाडे : अतिशय गंभीर आणि महत्वाच्या विषयावरील ही लक्षवेधी सूचना आहे. राज्यमंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कल्याण मधील जे 4 तरुण इसिसच्या माध्यमातून इराकला गेले ते उच्च शिक्षित आहेत. धार्मिक उन्मादाला बळी पडून अशा प्रकारचे आतंकवादी कार्य करण्यामध्ये तरुण सहभागी होतात. ही तरुण मंडळी आर्थिक प्रलोभनाला बळी पडून अशा प्रकारच्या अतिरेकी संघटनामध्ये सहभागी होत आहेत याकडे सरकारचे लक्ष आहे काय ?

डॉ. रणजित पाटील : या तरुणांना आर्थिक प्रलोभन दाखविण्यापेक्षा त्यांच्यामध्ये जाती-धर्माबद्दलची तेढ निर्माण केली जाते, त्यांच्या मनामध्ये विष पेरले जाते, त्यामुळे सुशिक्षित बेकार अशा संघटनांकडे आकर्षित होतात. या मुलांची 15 दिवसापासूनची वागणूक बदलेली होती. ते

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील...

घरामध्ये चिडचिड करीत होते. अतिरेकी संघटनेमध्ये सामील होण्याचे त्यांचे कारण आर्थिक नव्हते तर त्यांच्यामध्ये धार्मिक तेढ निर्माण केलेली होती.

श्री. ख्वाजा बेग : एखादी व्यक्ती पोलीस स्टेशनला तक्रार घेऊन गेली तर त्या तक्रारीची दखल घेतली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. या प्रश्नाच्या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांच्या हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, राज्यातील अनेक पोलीस स्टेशन्स ही जुन्या इमारतीमध्ये आहेत. तसेच त्या पोलीस स्टेशनमध्ये आवश्यक तेवढे मनुष्यबळ उपलब्ध नसते. परिणामी त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. तरी यासंदर्भात मंत्री महोदय कार्यवाही करतील काय ?

डॉ. रणजित पाटील : बरीच पोलीस स्टेशन्स जुनी झालेली आहेत हे अंशतः खरे आहे. कालच्या पुरवणी मागण्यामध्ये पोलिसांची पदे भरण्यासाठी तरतूद केलेली आहे. येत्या वर्षात पोलिसांची कुमक आपण वाढविणार आहोत.

डॉ. नीलम गो-हे : लक्षवेधी सूचनेवरील उप प्रश्नांना माननीय गृह राज्यमंत्री महोदयांनी समाधानकारक उत्तरे दिलेली आहेत. राम प्रधान समितीचा अहवाल येऊन ३ वर्षे झाली. त्या अहवालातील सूचंनाची काय अंमलबजावणी करण्यात आलेली आहे ? सरकारमध्ये परिवर्तन झालेले आहे. अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राम प्रधान समितीने अहवाल तयार केलेला आहे. अतिरेकी धोका वाढत आहे. म्हणून राम प्रधान समितीने अहवालामध्ये केलेल्या सूचनांची शासनाने काय अंमलबजावणी केली याची माहिती सदस्यांना अभ्यास करण्यासाठी देण्यात येईल काय ?

डॉ. रणजित देशमुख : राम प्रधान समितीच्या अहवालाच्या संदर्भात काय कारवाई झाली यासंबंधीची संपूर्ण माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक

L.A.BILL NO. XXXVI OF 2014

( A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2015.)

श्री. सुधीर मुनगंटीवार ( वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2014चे वि.स.वि.क्रमांक 36, दिनांक 31 मार्च 2015 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर जिल्ह्यातील कोंढाळी व कळमेश्वर येथील चाकडोह स्फोटके निर्मिती कारखान्याच्या विस्तारासाठी व्याघ्र प्रकल्पाची जमीन वळती करण्याची वन विभागाने केलेली शिफारस

**मु. शी.** : नागपूर जिल्ह्यातील कोंढाळी व कळमेश्वर येथील चाकडोह स्फोटके निर्मिती कारखान्याच्या विस्तारासाठी व्याघ्र प्रकल्पाची जमीन वळती करण्याची वन विभागाने केलेली शिफारस यासंबंधी श्री. संदीप बाजोरिया,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संदीप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर जिल्ह्यातील कोंढाळी व कळमेश्वर परिसरातील चकडोह स्फोटके निर्मिती कारखान्याच्या विस्तारासाठी व्याघ्र प्रकल्पाची सुमारे २२२ एकर जमीन वळती करण्याची शिफारस वन विभागाने शासनाकडे करण्याचा नुकताच घेतलेला धक्कादायक निर्णय, या परिसरात सध्या ५ वाघ अस्तित्वात असून हा परिसर १४० चौ.कि.मी. च्या बोर वाघ्र प्रकल्पास मिळणे, नागपूर येथे वन प्रादेशिक परिमंडळाने हा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यापूर्वी वन विभागाची परवानगी घेतलेली नसणे, नागपूर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सोलार इंडस्ट्रिज इंडिया लि. या कंपनीकडे संबंधित वन परिसराजवळ प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव सादर करणे, सन २०१० मध्ये नागपूरच्या वन संवर्धकांने हा प्रस्ताव नाकारल्यावर कंपनीने उपरोक्त जमिनीसाठी पर्यायी जमिनीची मागणी करणे, प्रस्तावित जमिनीकरिता कंपनी ७ कोटी रु. देण्यास तयार असणे, वन विभागाचे मानद व्यवस्था अधिकारी यांनी सदर व्याघ्र प्रकल्पाची जमीन संबंधित स्फोटके निर्मिती कारखान्याच्या विस्तारासाठी देण्यास ठाम विरोध दर्शविणे, तरीही ही जमीन चकडोह स्फोटके निर्मिती कारखान्यासाठी देण्याची शिफारस केल्यामुळे तेथील परिसरातील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

..5..



MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 14:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार (वने मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संदीप बाजोरिया : या लक्षवेधीला जे निवेदन वितरित केलेले आहे त्यामध्ये अधिकाऱ्यांनी दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या ठिकाणी कोणत्याही वाघाचे अस्तित्व नाही असे म्हटलेले आहे. त्या ठिकाणी 5 वाघांचे अस्तित्व आहे अशी माझी माहिती आहे. टाईम्स ऑफ इंडिया या दैनिकामध्ये वाघांच्या फोटोसहीत वृत छापून आलेले आहे. नागपूर जिल्ह्याच्या मानद वन्यजीव रक्षकांकडून या स्फोटके निर्मिती कारखान्याच्या विस्तारासाठी जमीन वळती करण्यास दर्शविलेल्या विरोधाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : अद्याप अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव शासनाकडे आलेला नाही. आपल्या देशामध्ये डिफेन्स प्रोटेक्शन संबंधी केन्द्र सरकारने 2011 आणि 2013मध्ये धोरण केलेले आहे. मे. सोलर इंडिस्ट्रिज इंडिया लिमिटेड, मौजा चाकडोह, ता. काटोल जि. नागपूर हा स्फोटके निर्मिती करणारा कारखाना सन 1995 पासून खाजगी जमिनीवर आहे. स्फोटके निर्माण करणारी ही खाजगी क्षेत्रातील कंपनी आहे. डिफेन्स प्रोटेक्शन पॉलिसी अंतर्गत प्रायव्हेट सेक्टरच्या माध्यमातून डिफेन्स इक्विपमेंट करण्याची मुभा या कंपनीला प्राप्त झालेली असून लायसन्सही प्राप्त झालेले आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4...... श्री.सुधीर मुनगंटीवार....

आरडीएक्स सारखे स्फोटक साहित्य या उद्योगामध्ये तयार होणार आहे. अगोदरच या विभागाने दिनांक 28.10.2009 रोजी वन विभागाची जमीन त्यांना हस्तांतरित करण्यात यावी असा प्रस्ताव दिला होता. कंपनीने काटोल तालुक्यातील राखीव वन क्षेत्र 31 मधील 58.86 हेक्टर जमीन सेफ्टी डिस्टन्स झोन म्हणजे प्रकल्प सुरक्षा कवच तयार करण्यासाठी उपयोग करण्याचे सांगितले होते. त्यांना सेफ्टी डिस्टन्स झोनसाठी जागा दिलेली नाही. 1980 च्या वन संवर्धन कायद्याच्या आधीन राहून त्यांनी अर्ज करावा. त्यांनी आता अर्ज केला आहे. बोर आणि पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये 15 व 36 कि.मी.चे अंतर आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी त्या भागामध्ये वाघाचे अस्तित्व असण्याची शंका उपस्थित केली आहे. या ठिकाणापासून 5 कि.मी.दूर वाघाचे अस्तित्व आहे. माननीय सदस्यांकडे याच ठिकाणी वाघाचे अस्तित्व असल्याबाबत पुरावे असतील तर ते त्यांनी द्यावेत. त्याबाबत चौकशी केली जाईल. जी माहिती आता उपलब्ध आहे त्यानुसार 87.97 हेक्टर क्षेत्र वन जमीन त्यांनी मागितली आहे. त्यातील कोणतीही झाडे कापली जाणार नाहीत. जंगल जसेच्या तसे सुरक्षा कवच म्हणून त्यांना हवे आहे. यापैकी 4.73 हेक्टर जमिनीवर स्फोटके ठेवण्यासाठी त्यांना गोदाम बांधावयाचे आहे. त्याकरिता त्यांनी परवानगी मागितली आहे. मागणी केलेल्या वन जमिनीबाबत नोडल अधिकाऱ्यांकडे तपासणी सुरु आहे. कोणताही प्रस्ताव देशाच्या संरक्षणाच्या हिताचा असेल तर निश्चितपणे शासनाला विचार करावा लागतो. देशाच्या सीमेवरील सुरक्षा महत्वाची आहे. मात्र कोणत्याही अधिकाऱ्याला नियमांचे उल्लंघन करुन वन जमीन त्यांना देता येणार नाही. माननीय सदस्यांकडे काही माहिती असेल तर ती तपासली जाईल आणि आवश्यकता असेल तर माननीय सदस्यांसमवेत विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली जाईल. परंतु नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता शासनाकडून घेतली जाईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी समाधानकारक उत्तर दिले आहे. देशाच्या संरक्षणाची बाब अत्यंत महत्वाची आहे. 222 एकर जमीन व्याघ्र प्रकल्पाची होती. ती या स्फोटके तयार करणाऱ्या कारखान्यासाठी वळती केली. हा कारखाना सरकारी आहे की खाजगी आहे? माननीय मुख्यमंत्र्यांनी नागपूर ही व्याघ्र नगरी घोषित केली आहे. चाकडोह, कोंढाळी,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4...... प्रा.जोगेंद्र कवाडे....

कळमेश्वर भागामध्ये वाघ आणि अन्य प्राण्यांचा अधिवास आहे. तेथे स्फोटके तयार करणाऱ्या खाजगी कारखान्याला परवानगी देताना देशाच्या संरक्षणाचा विचार करुन समन्वय साधला जाईल काय?

श्री.सुधीर मुनगंटीवार : या संदर्भात कोणतीही मान्यता दिलेली नाही. ही खाजगी कंपनी आहे. देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कंपनीला लायसन्स प्राप्त झाले आहे. संरक्षण विभागाला सामुग्री पुरवठा करण्याचे लायसन्स असेल आणि तेथून तयार होणारी सामुग्री रॉकेटमध्ये वापरली जाणार असेल, आरडीएक्सचा वापर बॉम्ब तयार करण्यासाठी केला जाणार असेल, देशाच्या सुरक्षेसाठी साहित्य सामुग्रीचा पुरवठा होणार असेल तरी सुध्दा कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन एक इंचही जमीन त्यांना दिली जाणार नाही. आज या क्षणाला व्याघ्र प्रकल्पापैकी जमीन मागितलेली नाही. व्याघ्र प्रकल्पाच्या जमिनीचा प्रश्न नसून त्यांनी जी जमीन मागितली आहे त्या ठिकाणी वाघिणीचा अधिवास आहे. नैसर्गिकरित्या कठडे नसलेल्या विहिरीमध्ये ती वाघिणी पडली, तिला विभागाने वन क्षेत्रात सोडून दिले. हा व्याघ्र प्रकल्पाचा भाग नाही. तेथे वाघिणी असावी असे सन्माननीय सदस्यांनी लक्षात आणून दिले तर त्याची तपासणी केली जाईल आणि सन्माननीय सदस्यांसमवेत बैठक घेतली जाईल. या ठिकाणाहून 5 कि.मी.वर वाघिणीचे अस्तित्व आहे असे विभागाकडून कळविण्यात आले आहे. वन संरक्षण कायद्याच्या चौकटीत राहून या संदर्भात शासन निर्णय घेईल. या क्षणाला कोणताही निर्णय घेतलेला नाही. नोडल अधिकारी या प्रस्तावाची छाननी करीत आहेत.

------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यासंबंधी</u>**

श्री.गिरीष बापट (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक 1 ही माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी उपस्थित केली आहे. या लक्षवेधी सूचनेवरील उपप्रश्नांना माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देण्याचे मान्य केले होते. कारण सूचनेतील विषय हा आंतरराष्ट्रीय विमानतळासंबंधीचा आहे. मात्र महाराष्ट्रातील दुष्काळी स्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय पथकासमवेत बैठक सुरु असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित राहू शकलेले नाहीत. म्हणून माझी विनंती आहे की, ही लक्षवेधी सूचना पुढील आठवड्यात कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात यावी. माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी याबाबत सहमती दर्शविली आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक 3 वरील लक्षवेधी सूचना अत्यंत महत्वाची आहे. चार कंपन्यांनी दुप्पट पैसे देण्याचे आमिष दाखवून हजारो ठेवीदारांची फसवणूक केली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन वितरीत केले आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, अनुक्रमांक-1 वरील लक्षवेधी सूचना ज्यावेळी चर्चेला घेण्यात येईल त्याचवेळी मी उपस्थित केलेली अनुक्रमांक 3 वरील लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात यावी.

**उप सभापती** : पीठासीन अधिकाऱ्यांची कारण नसताना कुचंबणा होते. एकाला न्याय द्यायचा आणि दुसऱ्याला न्याय द्यायचा नाही हे माझ्या दृष्टीने अडचणीचे आहे.

श्री.गिरीष बापट : माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचा आग्रह असेल तर या दोन्ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात याव्यात.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

**तालिका सभापती** : ठीक आहे. कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक 1 व 3 वरील लक्षवेधी सूचना विनंती केल्यानुसार पुढे ढकलण्यात येत आहेत.

-------

नंतर यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पालघर जिल्ह्यातील शेकडो स्थलांतरित आदिवासींची त्या त्या ग्रामपंचायतींमध्ये नोंद नसणे

**मु.शी.**: पालघर जिल्ह्यातील शेकडो स्थलांतरित आदिवासींची त्या त्या ग्रामपंचायतींमध्ये नोंद नसणे याबाबत श्री. आनंद ठाकूर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती (श्री रामनाथ मोते)** : माननीय सदस्य श्री. आनंद राडोड यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. आनंद ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी रोजगारासाठी वीटभट्टी, गवंडीकाम, घरगडी तसेच मोलकरीण आदि कामासाठी राज्यभर स्थलांतरित होत असून शासनाच्या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतील चुकीच्या मुल्यमापनामुळे त्यांना दिवसाची मजुरी 30 ते 38 रुपये एवढी पडत असणे, पोटाची खळगी भरण्यासाठी आणि मुलांचे संगोपन करण्यासाठी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी डहाणू, तलासरी आणि मोखाडा तालुक्यातील शेकडो व हजारो आदिवासी रोजगारासाठी वीट भट्ट्यांवर धाव घेतात. दिवाळी झाल्यानंतर हे स्थलांतरित झाले असल्यामुळे डहाणू व तलासरी तालुक्यातील शेकडो गावे ओस पडणे, एका तालुक्यातील 22 गांवे आणि दुसऱ्या तालुक्यात 85 ग्रामपंचायती असून जव्हार व मोखाडा तालुक्यातील लोक गुजरातमधील उमरगांव अशा भागात स्थलांरित झालेले आहेत. त्यांची नोंद त्या ग्रामपंचायतींकडे नसल्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबतीत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन या आदिवासींना दिलासा देण्याची गरज आहे.

------

..........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील उसर-खानाव येथील गेल व एचपी कंपनीद्वारे होत असलेल्या अवजड वाहनांच्या वाहतुकीबाबत

**मु.शी.**: अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील उसर-खानाव येथील गेल व एचपी कंपनीद्वारे होत असलेल्या अवजड वाहनांच्या वाहतुकीबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती (श्री रामनाथ मोते)** : माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील उसर-खानाव या ठिकाणी गेल्या अनेक वर्षांपास गेल व एचपी कंपनी प्रस्थापित असणे, या कंपनीतील मालाची वाहतूक करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अवजड वाहने असणे, अलिबागवरुन पेणकडे अवजड वाहनांची ये-जा सुरु असणे, अवजड वाहनांची क्षमता पेलण्याइतका रस्ता मजबूत नसतानाही कंपनी मनमानी कारभाराने या रस्त्यावरुन अवजड वाहनांमार्फत वाहतूक करीत असणे, विशेषत: दहा ते बारा चाकांच्या वाहनांमुळे प्रवासी हैराण होऊ लागले असून कार्लेखिंड येथे अवजड वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत असून अपघाताचाही प्रश्न निर्माण होणे, जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासन यांनी ताळमेळ घालून एचपी व गेल कंपनीच्या अवजड वाहनांची दिवसभर सुरु असणारी वाहतूक बंद करुन ती वाहतूक रात्रीच्या वेळी करावी, जेणेकरुन होणारे अपघात व वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होणार नाही. तसेच सदरचा रस्ता अवजड वाहनांच्या वाहतुकीच्या दृष्टीकोनातून मजबूत करण्याची आवश्यकता, सबब या गंभीर प्रकरणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

--------

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नागपूर शहरातील 427 झोपडीधारकांना मालकीचे जागेचे मालकी पट्टे मिळणे

**मु.शी.**: नागपूर शहरातील 427 झोपडीधारकांना मालकीचे जागेचे मालकी पट्टे मिळणे याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती (श्री रामनाथ मोते)** : माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

नागपूर या राज्याच्या उप राजधानीत जवळपास 427 झोपडपट्ट्या असून शहराच्या एकूण लोकसंख्येपैकी 9 लाख जनता म्हणजेच 45 टक्के जनता झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास आहे. नागपूरसह राज्यातील झोपडपट्टी रहिवाशांना संरक्षण मिळावे व त्यांच्या राहत्या झोपडीचे मालकी पट्टे (हक्क) त्यांना मिळावे यासाठी आमच्या पीपल्स रिपब्लीकन पक्षाने वेळोवेळी अनेक आंदोलने देखील केली. दिनांक 22 जुलै, 2014 च्या महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र. झोपुधो-1001/प्र.क्र.125/14/झोपुसु-1 नुसार महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारणा अधिनियम, 2014 च्या तरतुदीनुसार दिनांक 1.1.2000 या अर्हता दिनांक रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या शासकीय, निमशासकीय व खाजगी जमिनीवरील घोषित तसेच गणनाकृत झोपडीत सध्या प्रत्यक्ष राहत असलेल्या झोपडीवासीयांना निवारा संरक्षित करण्यात आला आहे. अशा व्यक्तिंच्या विशिष्ट कागदपत्रांची पडताळणी करुन ओळखपत्र (फोटोपास) देण्याचा निर्णय आहे. फोटोपास धारकांकडून एकात्मिक झोपडपट्टी विकास शुल्क नागपूर महानगर पालिकेकडून वसूल केले जाते परंतु झोपडपट्टीतील पात्र झोपडीधारकांना त्यांच्या जागेचे मालकी पट्टे अद्यापपर्यंत प्रदान करण्यात आलेले नाहीत. दक्षिण-पश्चिम नागपूर हा आमच्या माननीय मुख्यमंत्र्यांचा मतदार संघ असून या भागातील कामगार कॉलनी येथील झोपडीधारकांना लोकप्रतिनिधींच्या हस्ते माननीय जिल्हाधिकाऱ्यांच्या सहीने भाडेपट्टयाचा करारनामाद्वारे 30 वर्षाकरिता लीज प्रदान करण्यात आली. त्याबद्दलही झोपडीधारकांमध्ये उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहेत. झोपडीधारकांना त्यांच्या जागेचे कायम मालकी पट्टे प्रदान करुन नागपुरातील गरीब जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात येते.

----------

17-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) U-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बोगस प्रमाणपत्राच्या आधारे पदोन्नती मिळवून केलेली शासनाची फसवणूक

**मु.शी.**: बोगस प्रमाणपत्राच्या आधारे पदोन्नती मिळवून केलेली शासनाची फसवणूक याबाबत ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती (श्री रामनाथ मोते)** : माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

नांदेड-वाघाळा शहर महानगर पालिकेतील उपायुक्त श्री. रत्नाकर कांतराव वाघमारे यांनी शारिरीक दृष्ट्या अपंग असल्याचे बोगस प्रमाणपत्र शासनास सादर करुन लिपीक ते उपायुक्त पदापर्यंतच्या पदोन्नत्या मिळविल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, 2014 मध्ये उघडकीस येणे, सदर प्रमाणपत्रात श्री. वाघमारे हे 50 टक्के अपंग असल्याचे नमूद केले असून प्रमाणपत्रावर ऑर्थोपेडिक बोर्डाच्या चेअरमनची आणि प्रमाणपत्रावर लावलेल्या फोटोवर ऑर्थोपेडिक बोर्डाच्या मेंबरची स्वाक्षरी असणे, ऑर्थोपेडिक बोर्ड हे शासकीय रुग्णालयात नसून ते रुग्णालयाशी संबंधित असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयात असणे, नांदेड येथील गुरु गोविंद सिंग हॉस्पिटल हे डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असणे, यामुळे महितीचया अधिकाराखाली माहिती विचारली असता डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या ऑर्थोपेडिक विभागाच्या प्रमुखांनी अर्जदारास अशी माहिती दिली आहे की, सदर वैद्यकीय महाविद्यालयात ऑर्थोपेडिक बोर्ड दि. 14.9.2005 पासून कार्यान्वित आहे त्यामुळे श्री. वाघमारे यांच्या अपंग प्रमाणपत्राची नोंद त्यांच्याकडे नाही. ऑर्थोपेडिक बोर्ड सन 2005 मध्ये अस्तित्वात आल्यामुळे त्या बोर्डातर्फे सन 1987 मध्ये बोर्डाच्या नावाने प्रमाणपत्र देण्याचा प्रश्नच उदभवत नाही. सन 2005 च्या पूर्वी श्री. गुरु गोविंद सिंग मेमोरियल हॉस्पिटलच्या जिल्हा शल्यचिकित्सक यांनी प्रमाणपत्र देणे योग्य ठरले असते परंतु त्यावर दि. 16 सप्टेंबर, 1987 रोजी अस्तित्वात नसलेल्या ऑर्थोपेडिक बोडाच्या चेअरमन व मेंबरची सही आहे हे पाहता सदरहू प्रमाणपत्र बोगस असल्याचे सिध्द होणे आणि या बोगस प्रमाणपत्राच्या आधारे श्री. वाघमारे यांनी लिपीकापासून उपायुक्त पदापर्यंतच्या पदोन्नत्या मिळविल्या असल्याचेही स्पष्ट होणे, श्री. वाघमारे हे 50 टक्के अपंग असल्याचे प्रमाणपत्रात नमूद केले असले तरी ते 50 टक्के अपंग नसणे, श्री. वाघमारे यांच्या 50 टक्के अपंगत्वाबाबत दुसऱ्या

......4



PFK/ पूर्वी श्री. भोगले......... 14:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ......

ऑर्थोपेडिक बोर्डातर्फे तपासणी करण्याची आवश्यकता आणि त्यांच्याकडून फेर प्रमाणपत्र घेण्याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

.........5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: करिअरच्या नावाखाली पैसे उकळणाऱ्या
बोगस शिक्षण संस्थांचे निर्माण झालेले जाळे

**मु.शी.**: करिअरच्या नावाखाली पैसे उकळणाऱ्या
बोगस शिक्षण संस्थांचे निर्माण झालेले जाळे, याबाबत ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती (श्री रामनाथ मोते)** : माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

करियरच्या नावाखाली विद्यार्थ्यांचा वेळ, श्रम आणि पैसा वाया घालवून त्यांची शुध्द फसवणूक करणाऱ्या बोगस अभ्यासक्रम आणि शिक्षण संस्थांना अटकाव करणारा कायदा अंमलात येऊन एक वर्ष उलटूनही अद्याप या कायद्याची अंमलबजावणी झालेली दिसत नाही. विविध बोगस संस्था आणि अभ्यासक्रम यांच्या जाहिरातींची सुळसुळाट सर्वत्र झालेला दिसत आहे. या जाहिरातींना दरवर्षी हजारो विद्यार्थी/पालक बळी पडत आहेत. त्याचप्रमाणे राज्याच्या किंवा केंद्राच्या नियामक संस्थांची मान्यता नसतानाही या संस्था आपले अभ्यासक्रम चालवित असतात आणि प्रवेश घेतल्यानंतर किंवा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर हातात पडलेल्या पदवीनामक कागदाला करिअरच्या बाजारात शुन्य असल्याचे लक्षात येते तोपर्यंत पैसा, श्रम आणि अमूल्य वेळी वाया गेलेला असतो. त्यामुळे या कायद्याच्या माध्यमातून काही प्रमाणात बोगस संस्था आणि अभ्यासक्रमांनी माजविलेली भोंदुगिरी आटोक्यात येईल अशी अपेक्षा होती पण हा कायदा अस्तित्वात येऊन एक वर्ष झाले तरी त्याची अंमलबजावणी न होता केवळ कागदावरच राहिला आहे. त्याचप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमासाठी ज्यांच्याकडे तक्रार करायची ते सक्षम प्राधिकारी किंवा अपिलीय अधिकारीच नेमण्यात न आल्याचे निदर्शनास आले आहे. त्याकरिता या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, त्याकरिता मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

--------

यानंतर श्री. भारवि......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : वैद्यकीय सेवा विक्रीयोग्य झाल्याने युनिव्हर्सल हेल्थ केअर पद्धती स्वीकारणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"आपण सर्वजण हेल्थ फॉर ऑल असा नारा देऊन काम करीत असतो. पण अलीकडच्या काळात वैद्यकीय सेवा म्हणजे पूर्णत: विक्रीयोग्य गोष्ट झाली आहे. आपल्या येथे मेडिकल मार्केट, डॉक्टर्स व पेशंटस् या बाजू खूप महत्त्वाच्या आहेत. आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत नेण्यासाठी आज नव्याने काही तरी निर्माण करण्याची आवश्यकता आहे. डॉ.अरुण गद्रे यांनी "कैफियत" नावाचे लिहिलेले एक पुस्तक नुकतेच बाजारात आले आहे. या सर्व पद्धतीला कुठे तरी रोखण्यासाठी व सुसूत्रता आणण्यासाठी युनिव्हर्सल हेल्थ केअर पद्धत जगात मान्य झालेली आहे. रुग्णांचे हक्क, जबाबदाऱ्या, आरोग्य व्यवस्थेतील सुधारणा, शास्त्रीय उपचार पद्धतीबाबत प्रबोधन हया महत्त्वाच्या विषयांकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आज सरकारी रुग्णालयातून मिळणारी सेवा, रुग्णांना उपचार न मिळणे यामुळे हे सर्वच क्षेत्र असंवेदनशील झाले आहे काय, अशा प्रकारचे वास्तव यामध्ये दिसते. त्यामुळेच रुग्ण खाजगी रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर जात असल्याचा प्रकार दिसून येत आहे. तेव्हा खाजगी आरोग्य सेवेवर नियंत्रण आणण्यासाठी काही तरी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. माझी शासनाला विनंती आहे की, या नव्या पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करुन या प्रणालीची अंमलबजावणी आपल्या राज्यामध्ये करता येईल काय याचा गांभीर्याने विचार करावा."

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : सार्वजनिक ठिकाणी शौचालये बांधण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडते.

"राज्यात शासनाच्यावतीने शौचालये बांधण्याचा निर्णय घेण्यात येणे, मात्र, सदर निर्णयाची अंमलबजावणी अद्याप पूर्ण न होणे, परिणामी शहरातील सार्वजनिक बाजार, मंडई, मॉल आदि ठिकाणी खरेदीसाठी गेलेल्या कुटुंबाची मोठ्या प्रमाणात कुचंबणा होणे, त्यातच सद्यस्थितीत असलेल्या शौचालयात काम करण्यासाठी असलेला अपुरा कर्मचारी यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणारा विपरित परिणाम, याबाबत शासनाने शहरातील सार्वजनिक ठिकाणी शौचालये बांधण्याच्या घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करावी अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : जमिनी एन.ए.करण्याबाबत शासन निर्णयात स्पष्ट आदेश नमूद करणे याबाबत श्री.दीपक साळुंखे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दीपक साळुंखे (सोलापूर स्थानिक संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यात बिगर शेतीचे परवाने देण्याचे अधिकार महापालिकेला देण्याचा शासन निर्णय दिनांक 22 ऑगस्ट 2014 रोजी काढण्यात येणे मात्र यासाठी महसुली अधिकाऱ्यांकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे असे आदेशात नमूद करण्यात येणे, मात्र सदर आदेशात कोणत्या अधिका-याने एनओसी देण्याचे निश्चित करण्यात न येणे, परिणामी सोलापूर महापालिकेने 103 एनओसी प्रकरणे जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवून अद्याप जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात न आल्याने राज्यभरात मोठ्या प्रमाणात जमिनी एन.ए.करण्याबाबत शासन निर्णयात स्पष्ट आदेश नमूद करण्यात यावे अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांमधील अर्धवेळ पदावर काम करणाऱ्या ग्रंथपालांना सर्व प्रकारच्या शासकीय सेवेच्या सवलती मिळण्याबाबत श्री.नागो गाणार, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांमधील अर्धवेळ ग्रंथपाल पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कुठल्याही प्रकारच्या सेवासुविधा न मिळणे, त्यामुळे जीवनभर अर्धवेळ पदावर काम करून जीवनाच्या अंतिम टप्प्यात त्यांना कोणतेही आर्थिक लाभ मिळत नसल्याने त्यांची हलाखीची परिस्थिती निर्माण होऊन त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येणे, या प्रकरणी शासनाकडे वारंवार निवेदने, अर्ज विनंत्या करूनही शासनाने कोणतीही दखल न घेणे, परिणामी राज्यातील अर्धवेळ ग्रंथपाल पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये शासनाविषयी तीव्र संतापाची लाट निर्माण होणे, या महत्त्वाच्या प्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांमधील अर्धवेळ पदावर काम करणाऱ्या ग्रंथपालांना सर्व प्रकारच्या शासकीय सेवा सवलती लागू करण्याची व त्यानुसार त्यांना ग्रॅच्युईटी प्रदान, सेवानिवृत्ती वेतन लागू करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने दखल न घेतल्यामुळे अर्धवेळ ग्रंथपालांमध्ये प्रचंड असंतोष पसरणे, या विशेष उल्लेखाद्वारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...5

**पृ. शी./मु. शी.** : गाव ते शाळा या योजनेखाली सुरू करण्यात आलेल्या परिवहन महामंडळाच्या बससेवेचा लाभ चंद्रपूर जिल्ह्यातील शालेय विद्यार्थीना न मिळणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभाताई फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडते.

"राज्यामध्ये महिलांचा टक्का वाढावा व त्यांना दर्जदार शिक्षण मिळावे, सुरक्षितता मिळावी या हेतूने तसेच मानव विकासाचा निर्देशांक वाढविण्याच्या दृष्टीने मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविण्याकरिता 12 वी पर्यंतच्या विद्यार्थीनींना गाव ते शाळा अशा बसेस परिवहन मंडळाच्या माध्यमातून जून 2012 मध्ये सुरू करण्यात आलेल्या असून, चंद्रपूर जिल्ह्यातील मानव विकास योजने अंतर्गत शाळकरी मुलींना निळ्या रंगाच्या बसेस सुरू करण्यात आलेल्या असणे, जिल्ह्यात सुरू करण्यात आलेल्या बसेस सर्रास बोर्ड लावून पॅसेंजर भरून नेत असल्याचे दिसणे, त्यामुळे ऐन शाळा सुटण्याच्या वेळात मुलींना बस न मिळणे, त्यामुळे मुलींना बसस्टँड वर बराच वेळ उभे राहावे लागणे, त्यामुळे विद्यार्थीनींची होत असलेली गैरसोय, त्यामुळे शाळेच्या विद्यार्थीनींकरिता सुरू करण्यात आलेल्या बसचा होत असलेला गैर वापर त्यावर शानाने करावयाची कारवाई"

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : लोकायुक्तांचे पद तात्काळ भरणे याबाबत श्री.अमरसिंह पंडित, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यातील भ्रष्टाचारासह इतर गैरकायदेशीर प्रकरणांची तटस्थ चौकशी व्हावी म्हणून लोकायुक्त यांची नेमणूक होणे, लोकायुक्तांच्या कार्यालयात हजारो भ्रष्टाचाराची प्रकरणे दाखल होणे, अपुरी यंत्रणा व कर्मचारी यामुळे ही प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित असणे, माहे जून वा त्या सुमारापासून लोकायुक्तांचे पद रिक्त असणे, राज्याला लोकायुक्त नसल्यामुळे भ्रष्टाचारांच्या प्रकरणात झालेली वाढ, लोकायुक्तांचे कार्यालय पुरेशा कर्मचाऱ्यांसह अद्ययावत करून लोकायुक्तांचे पद तात्काळ भरावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

...7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : कुपोषित भागात पुरेशा प्रमाणात डॉक्टरांची नेमणूक करणे याबाबत श्री.जगन्नाथ शिंदे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"राज्यातील कुपोषित भागामध्ये औषधोपचार वेळेत मिळत नसल्याने तेथील कुपोषित बालकांचा मृत्यू होतो हे टाळण्यासाठी तेथे तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करावी व तेथे विविध योजना राबविण्यात याव्यात अशी मागणी करणारी याचिका सामाजिक कार्यकर्त्यांनी न्यायालयात दाखल केली असता त्यावर न्याय देताना माननीय उच्च न्यायालयाने तज्ज्ञ डॉक्टर नेमण्याची कार्यवाही करावी अशी सूचना दिल्यानंतरही अद्याप पुरेशा प्रमाणात कार्यवाही न होणे, त्यामुळे कुपोषित भागात पुरेशा प्रमाणात डॉक्टर नेमण्यात यावे अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

....8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : जन-धन योजने अंतर्गत खाते उघडून देण्यासाठी बँका उदासनि असणे या विषयावर श्री.धनंजय मुंडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.धनंजय मुंडे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सर्वसामान्य माणसांना बँकिंग व्यवहारात प्रवाहात आणण्यासाठी केंद्र शासनाने जन-धन योजना सुरू करणे, या योजनेद्वारे बँकेमध्ये खाते उघडणाऱ्या सामान्य ग्राहकांना बचतीवर व्याज, डेबिट कार्ड, 1 लाख रुपयांपर्यंतचा विमा विनामूल्य मिळणार असणे, केंद्र शासनाचे गॅस अनुदान, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, निराधारांना पेन्शन याचा लाभ खात्यावर उपलब्ध होणार असणे, मात्र खाते उघडून देण्याबाबत राज्यातील बँका उदासीन असणे, खाते उघडण्यास बँका मदत न करणे, कागदपत्रांसाठी त्रास देणे, उद्धट, चुकीची उत्तरे देणे, त्यामुळे सर्वसामान्यांना त्रास होत असणे, याबाबत शासनातर्फे बँकांमध्ये खाते उघडून देण्यासाठी सहकार्य करणे, स्वतत्र कक्ष सुरू करण्यासाठी निदेश देण्याची आवश्यकता अशी आग्रहाची मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : ठाणे महानगरपालिकेने बांधलेले वारकरी आणि ज्येष्ठ नागरिक भवन तातडीने खुले करणे याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.निरंजय डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वारीसाठी आणि दिंडीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांना अल्प दरात राहण्याची सोय व्हावी या हेतूने ठाणे शहरातील राम मारुती रोड वरील गजानन चौक येथे ठाणे महापालिकेच्यावतीन वारकरी आणि ज्येष्ठ नागरिक भवन सन 2012 मध्ये बांधण्यात आले आहे. परंतु, गेल्या अडीच वर्षांपासून ही वास्तू बंदच असून या भवनात वास्तव्यासाठी येणाऱ्या वारकरी व ज्येष्ठ नागरिकांना भाडे किती आकारायचे यावरून प्रशासनाचे एकमत होत नसल्याने ही वास्तू वारकऱ्यांना आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी खुली करण्यात आलेली नाही. त्यामुळे या वास्तूचा एकीकडे वारकऱ्यांना लाभ मिळत नाही तर दुसरीकडे या वास्तूसाठी झालेला खर्च नाहक वाया गेल्या सारखा आहे. तेव्हा ठाणे महानगरपालिकेने बांधलेले वारकरी आणि ज्येष्ठ नागरिक भवन तातडीने खुले करण्यात यावे अशी मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे"

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी.**: दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी आलेल्या केंद्रीय चमूशी भेट

**मु.शी.**: दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी आलेल्या केंद्रीय चमूशी भेट या संबंधी माननीय सहकार मंत्र्यांचे निवेदन.

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापवे. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मला माहीत आहे की, निवेदनावर प्रश्न विचारण्यात येत नाहीत. परंतु यामध्ये एका गोष्टीची त्रुटी दिसत आहे ती सांगतो. माननीय सहकार मंत्री महोदयांनी सांगितले की, दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय चमू आला होता. मी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, केंद्रीय चमू परत दिल्लीला जाण्यापूर्वी त्यांनी गारपीटग्रस्त भागांची देखील पाहणी करुन त्या संदर्भातील अहवाल केंद्र सरकारकडे पाठविला तर आपणास केंद्र सरकारकडून आणखी साह्य मिळण्यास मदत होईल.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांना सभागृहाच्या भावना कळविण्यात येतील.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नांदेड येथील अतिरिक्त व सेवामुक्त कला शिक्षक श्री.सय्यद रमीझोद्दीन यांनी शिक्षणमंत्री आणि शिक्षण सचिव यांना जबाबदार ठरवून केलेली आत्महत्या

**मु.शी.**: नांदेड येथील अतिरिक्त व सेवामुक्त कला शिक्षक श्री.सय्यद रमीझोद्दीन यांनी शिक्षणमंत्री आणि शिक्षण सचिव यांना जबाबदार ठरवून केलेली आत्महत्या या विषयावर श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**उप सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी एक तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 97 अन्वये पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"नांदेड येथील अतिरिक्त व सेवामुक्त कला शिक्षक (निदेशक) सय्यद रमीझोद्दीन यांनी शिक्षणमंत्री व शिक्षण सचिव यांना जबाबदार ठरवून केलेली आत्महत्या, राज्यातील हजारो शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना अतिरिक्त करणारा, हजारो प्रोबेशनरी शिक्षक (पूर्वीचे नाव शिक्षण सेवक) यांना सेवामुक्त करणारा, काही हजार अंशकालीन कला, क्रीडा, संगीत विशेष शिक्षक (निदेशक) आणि ग्रंथपाल यांना सेवामुक्त करणारा, वादग्रस्त संचमान्यतेचा शासन निर्णय स्थगित न करणे, माध्यमिक शाळांतील आयटी/ आयसीटी शिक्षकांना पूर्णवेळ वेतन नाकारणे, राज्यातील विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्णवेळ शिक्षक नाकारणे, गेली 15 वर्षे अनुदानासाठी प्रतिक्षा करणाऱ्या हजारो विनाअनुदानित शिक्षकांना पुन्हा फेर तपासणी लावून मूल्यांकनात पात्र होऊनही वेतन अनुदान नाकारणे, शिक्षण हक्क 2009 प्रमाणे गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पूर्णवेळ नियमित शिक्षक मिळण्याचा अधिकार नाकारणे, गुणवत्तापूर्ण नियमित शिक्षणासाठी शिक्षकांना शोषणमुक्त करण्याची आवश्यकता असणे, मात्र शिक्षणमंत्री आणि शिक्षण सचिव यांनी शाळा बंद व अन्य आंदोलनातून व्यक्त झालेला असंतोष दडपून, राज्यातील गोरगरिबांची शिक्षण व्यवस्था मोडून काढण्याचा चंग बांधणे, शिक्षकांना अवमानित करणे, यामुळे राज्यात बिघडलेली शैक्षणिक परिस्थिती, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री महोदयांना खालच्या सभागृहामध्ये सहभाग असणे अनिवार्य असल्यामुळे त्यांनी मला या ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत विनंती केली आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची मी नोंद घेणार आहे. माननीय शिक्षण मंत्री उद्या या चर्चेस उत्तर देणार आहेत आणि माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी तशी विनंती आपणास आणि सन्माननीय सदस्यांना केलेली आहे. तेव्हा माझी सभागृहाला विनंती आहे की, या विषयावरील चर्चेस सुरुवात करावी.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जयवंतराव जाधव )**

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय शिक्षण मंत्री उपस्थित नसले तरी माननीय वित्त मंत्री येथे उपस्थित आहेत आणि ते मी उपस्थित केलेल्या मुद्यांची गांभीर्याने दखल घेंतील अशी मला खात्री आहे. माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी या चर्चेला आजच उत्तर दिले तर या चर्चेला न्याय मिळेल असे मला वाटते.

सभापती महोदय, चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी शिक्षणाशी निगडीत प्रस्ताव असल्यामुळे काही गफलतींकडे आपले लक्ष वेधतो. आम्ही मराठीमध्ये प्रस्ताव लिहून देतो आणि तो मराठीत छापून येतो. मराठी ही आपली मातृभाषा आहे. ती आपली राजभाषा आहे. या भाषेमध्ये चुका असू नयेत. मी दिलेल्या प्रस्तावामध्ये चूक केलीच आहेच परंतु मी जी लक्षवेधी सूचना दिलेली आहे त्यामध्ये देखील अनेक चुका आहेत. आपल्या कार्यालयाकडून चुका होऊ नयेत अशी माझी आपणास विनंती आहे. मी आपणास उदाहरण म्हणून सांगतो की, "शिक्षकेतर" असा शब्द असताना तो "शिक्षकेत्तर" असा चुकीचा टाईप केलेला आहे. या अशा किरकोळ चुका आहेत पण त्या वाईट दिसतात, तेव्हा आपल्या कार्यालयाने त्याची नोंद घ्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, नांदेड येथील सय्यद रमीझोद्दीन नावाच्या कला शिक्षकाने आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी आपल्या सुसाईट नोटमध्ये अत्यंत जबाबदारीने काही विधाने केलेली आहेत. ती विधाने वाचल्यानंतर धक्का बसतो. राज्याचे शिक्षणमंत्री आणि शिक्षण विभागाचे सचिव यांनी न्यायालयाचे निर्णय आल्यानंतरही ते ज्या पद्धतीने प्रश्नांना बेदखल करतात ,गंभीर प्रश्नांना अत्यंत हास्यास्पद पद्धतीने हाताळणी करतात, चेष्टा करतात. त्याचा परिणाम म्हणून

..5..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

म्हणून सय्यद रमीझोद्दीनने मृत्युस कवटाळले आहे. सय्यद रमीझोद्दीने माननीय शिक्षणमंत्री श्री.विनोद तावडे आणि शिक्षण विभागाच्या सचिव श्रीमती अश्विनी भिडे यांची नावे घेतलेली आहेत.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

सय्यद रमीझोद्दीन या शिक्षकाच्या आत्महत्येला शालेय शिक्षण विभागाच्या सचिव श्रीमती आश्विनी भिडे आणि शालेय शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे हे दोघे जबाबदार आहेत. विभागाच्या सचिव श्रीमती आश्विनी भिडे यांचे नाव आम्हत्येच्या चिठ्ठीमध्ये दोनदा नमूद करण्यात आलेले आहे. आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीने चिठ्ठीमध्ये ज्यांची नावे लिहिलेली असतात त्यांच्यावर पोलिसांकडून थेट कारवाई होणे अपेक्षित असते. परंतु या सरकारच्या गृह विभागाने आत्महत्येच्या बाबतीत साधा एफ.आय.आर. सुध्दा नोंदविला नाही, ही गोष्ट अत्यंत लांच्छनास्पद आहे. नवीन सरकार सत्तेत आल्यानंतर आम्हाला असे वाटले की, आता 'अच्छे दिन' येतील. परंतु या सरकारचे जर हे 'अच्छे दिन' असतील तर काही खरे नाही. एवढी मोठी घटना घडल्यानंतर सरकार इतक्या वाईट पध्दतीने त्या घटनेची दखल घेत असेल तर ते कदापि योग्य नाही. आत्महत्येच्या चिठ्ठीमध्ये ज्यांची नावे येतात त्यांच्यावर कलम 304 आणि 306 अन्वये थेट गुन्हा दाखल होऊ शकतो. या आत्महत्येप्रकरणी सरकारने विभागाच्या सचिव आणि विभागाचे मंत्री यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे काय, या बाबतची माहिती मला मिळाली पाहिजे.

महोदय, या आत्महत्येला नवीन सरकार कितपत जबाबदार आहे, त्या शिक्षकाने भावनेच्या भरात त्यांची नावे लिहिली आहेत काय हा प्रश्न जरूर निर्माण होऊ शकतो. परंतु शिक्षक, शिक्षक आमदार आणि शिक्षक संघटनांनी नोटीस दिल्यानंतर सुध्दा शासनाने त्या नोटीसची दखल घेतली नाही. आम्ही वारंवार सांगत होतो की, अगोदरच्या सरकारकडून ज्या चुका झाल्या आहेत त्या चुका नवीन सरकारने पुन्हा करु नयेत. किमान जो वादग्रस्त शासन निर्णय आहे तो स्थगित करावा. हे सरकार नवीन असल्यामुळे त्या विषयी अभ्यास करुन, सर्वानुमते जे ठरेल त्याची अंमलबजावणी करावी असे सुचविले होते. परंतु माननीय शिक्षण मंत्र्यांनी तुम्हाला जे करायचे असेल ते करा, मी स्थगिती देणार नाही अशी एकदा नव्हे तिनदा भूमिका घेतली. तुम्हाला आंदोलन करायचे असेल तर करा, पण मी काही करणार नाही अशी भूमिका घेतली आणि त्यामुळेच सय्यद रमीझोद्दीन या शिक्षकाने आत्महत्या केली. अन्याय झालेला हा एकटा शिक्षक नाही. आज त्याने टोकाचे पाऊल उचचले. त्याने आत्महत्येचे पाऊल उचलण्यापूर्वी गेली दोन वर्षे तो उच्च न्यायालयाच्या पायऱ्या चढत होता. त्याचे सहकारी सुध्दा उच्च न्यायालयाच्या पायऱ्या चढत होते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

माननीय शिक्षण मंत्री आम्हाला सांगत होते की, सय्यद रमीझोद्दीन हा शिक्षक नसून तो 'निदेशक' आहे. या निमित्ताने मी निदर्शनास आणून देतो की, आरटीई नुसार शिक्षकांच्या व्याख्येमध्ये 'निदेशक' या पदाचा सुध्दा समावेश आहे. पण केवळ शब्दच्छल करुन त्या शिक्षकाच्या आत्महत्येबाबत आपण असे उद्‌गार काढत असाल तर ते योग्य नाही. राज्याच्या शिक्षण सचिव म्हणतात की, या आत्महत्येशी आमचा काही संबंध नाही. मी विचारु इच्छितो की, त्यांना असे कसे म्हणता येईल ? या आत्महत्येला तुम्ही जबाबदार आहात. या सभागृहातील सातही शिक्षक आमदार सांगत आहेत की नवीन शासन निर्णयामुळे चुकीचे घडत आहे त्यामुळे तो शासन निर्णय स्थगित करावा. पण विभागाच्या सचिव सांगतात की, ज्यावेळी चुका होतील त्यावेळी बघू. मी विचारु इच्छितो की, शिक्षण सचिवांना असे सांगण्याचा अधिकार कोणी दिला ? देशाच्या आणि राज्याच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विभागाच्या सचिव, माननीय शिक्षण मंत्री आणि सरकारवर आहे. परंतु ती जबाबदारी पार न पाडता आम्ही चुका करु आणि नंतर बघू असे म्हणणे ही उर्मटपणाची भाषा आहे. अशा प्रकारे शिक्षण विभाग चालवायचा असेल तर माझी माननीय मुख्यमंत्र्यांकडे मागणी आहे की, त्यांनी माननीय श्री.विनोद तावडे यांच्याकडून शिक्षण विभाग काढून घ्यावा. नाही तर या राज्यातील शिक्षणाचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. जर तुम्हाला हे शक्य नसेल तर तुमची पुढे होणारी बदनामी ही अटळ आहे. किमान विभागाच्या सचिव श्रीमती आश्विनी भिडे यांच्याकडून तरी हा विभाग काढून घ्यावा. त्यांना यातील काही कळत नाही.

महोदय, पूर्वी श्री.सहारिया हे शिक्षण विभागाचे प्रधान सचिव होते. त्यानंतर ते राज्याचे मुख्य सचिव झाले. मागच्या सरकारच्या कालावधीत माननीय मुख्यमंत्री, माननीय शालेय शिक्षण मंत्री, मंत्रिमंडळ, सर्व आमदार, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष यांच्या समोर एक बैठक पार पडली. त्या बैठकीत श्री.सहारिया हे आर.टी.ई. च्या तरतुदी वाचून दाखवित होते. त्यांचे भाषण जोरदार झाले. मी त्यांना भेटलो आणि सांगितले की, आर.टी.ई. नुसार इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतच्या वर्गासाठी यापुढे पदवीधर शिक्षक लागणार आहेत. परंतु आपण 12 वी उत्तीर्ण झालेले शिक्षक घेतल्यामुळे आपल्या राज्यात पदवीधर शिक्षक उपलब्ध नाहीत, अशी वाईट परिस्थिती आहे. मी त्यांना असेही सांगितले की, आर.टी.ई. कायद्यामध्ये तरतूद आहे की, किमान

..3..



SJB/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 15:40

श्री.कपिल पाटील....

तीन वर्षांमध्ये त्या शिक्षकांनी विहित शैक्षणिक अर्हता पूर्ण केली पाहिजे. यावर तत्कालीन प्रधान सचिव असलेल्या श्री.सहारिया यांनी मला सांगितले की, अशा प्रकारची तरतूद ॲक्टमध्ये नाही. मग मी त्यांना विधिमंडळाने पारित केलेल्या ॲक्टमधील स्पेसिफिक तरतूद दाखविली. त्यांनी ॲक्टमधील तरतूद वाचल्यानंतर मला असे सांगितले की, आमचे अधिकारी ॲक्ट वाचत नाहीत. महोदय, हे कोण सांगते ? राज्याचे तत्कालीन प्रधान सचिव सांगतात. शालेय शिक्षण विभागाच्या विद्यमान सचिवांची सुध्दा काही वेगळी परिस्थिती नाही. त्यांना ॲक्टमधील तरतूद दाखविली तर त्या म्हणतात की, आपण बघू या. महोदय, बघू या म्हणजे काय ? ज्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे काम सचिवांचे आहे तो कायदा जर सचिव वाचत नसतील तर ते योग्य नाही. विभागाच्या सचिवांचे जर माननीय शालेय शिक्षण मंत्री ऐकत असतील तर त्यांनी राजीनामा दिलेला बरा. या राज्याचे शालेय शिक्षण मंत्री सभागृहाचे ऐकणार आहेत, विधिमंडळाचे ऐकणार आहेत की, ज्यांनी कधी कायदाच वाचला नाही त्या सचिवांचे ऐकणार आहेत, हा माझा प्रश्न आहे. पूर्वी आपले राज्य शिक्षणाच्या बाबतीत 13 व्या क्रमांकावर होते, आता ते 8 व्या क्रमांकावर आले आहे.

महोदय, आम्ही एखाद्या निर्णयाच्या बाबतीत स्थगितीचा आग्रह धरला तर अगोदरच्या सरकारमधील माननीय शिक्षण मंत्री त्यास स्थगिती देत होते. ते आमचे ऐकायचे. जर चुकीचे काही झाले असेल तर त्यात दुरुस्ती करीत होते. परंतु विद्यमान मंत्री मात्र या बाबतीत ऐकण्यास तयार नाहीत. सय्यद रमीझोद्दीन हा शिक्षक न्याय मिळविण्यासाठी अगोदर न्यायालयात गेला होता. तो अतिशय संवेदनशील असा कला शिक्षक होता. या निमित्ताने मी विचारतो की, या राज्याला कला शिक्षकाची, चित्रकाराची गरज नाही काय ?

महोदय, या राज्याने पु.ल.देशपांडे यांचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन गौरव केला. ते असे म्हणत होते की, रोजी-रोटी लावण्यासाठी शिक्षण लागते. पण जगायचे कसे यासाठी कला शिक्षण लागते, क्रीडा शिक्षण लागते. परंतु त्या कला शिक्षणाला हे सरकार मोजत नाही, ही वाईट गोष्ट आहे. सय्यद रमीझोद्दीन हा अप्रतिम चित्रकार होता. त्याचे राधा-कृष्णाच्या प्रेमाबद्दलचे गाजलेले चित्र हे माझ्याकडे आहे. हे चित्र मी सभागृहाला दाखवून आपल्याकडे पाठवितो. या चित्रावरुन तो किती संवेदनशील होता हे दिसून येईल. कलावंत मंडळी हे आत्ममग्न असतात, ती मंडळी बाहेर व्यक्त होत नाहीत, ते चित्रातून व्यक्त होतात. परंतु जेव्हा त्यांना वाट मिळत नाही

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

किंवा आपले प्रश्न सुटण्याची शक्यता मावळते त्यावेळी ते टोकाचे पाऊल उचलतात. वास्तविक पाहता त्यांनी अशा प्रकारे टोकाचे पाऊल उचलायला नको होते. परंतु या कला शिक्षकाने ते पाऊल उचलले. या कला शिक्षकाने न्याय मागण्यासाठी माननीय उच्च न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणी सरकारने जे जे मांडले ते न्यायालयाने फेटाळून लावले. सरकारकडे तीन वर्षे होती, परंतु त्या कालावधीत सरकारने काही केले नाही. आपण म्हणता की, आम्हाला वेळ द्या. अजून आमचे धोरण ठरलेले नाही. न्यायालयाने आऊटराईट रिजेक्ट केला आहे आणि सांगितले की, तुम्हाला बोलण्याचा अधिकार नाही. ही गोष्ट तुम्ही अगोदरच बोलायला हवी होती. आता त्यांच्या नोकरीबद्दल, व्यवसायाबद्दल आणि कला शिक्षणाबद्दल बोला.

महोदय, माननीय शिक्षण मंत्री सातत्याने दावा करीत होते की, आम्ही शिक्षकांचे आकडे फुगवून सांगत आहोत. आम्ही 45 हजार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त झाल्याचे सांगितले. तसेच दुसरी बाब अशी की, पूर्वी ज्यांना शिक्षण सेवक म्हटले होते त्यांना नोकरीतून एका फटक्यात काढून टाकले. पूर्वीच्या शिक्षक किंवा शिक्षण सेवकाला सेवेतून काढायचे असेल तर त्यासाठी एमईपीएस रूल्स आहेत. त्यांना तीन महिन्यांची नोटीस द्यावी लागते. तसेच नोकरीवरुन काढण्याची 8 ते 9 कारणे आहेत. परंतु त्यातील एकही कारण न सांगता त्या शिक्षक आणि शिक्षण सेवकांना नोकरीतून काढण्याचा आदेश पाठवून दिला जातो आणि उरलेल्या शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्यास सांगितले जाते. अशा प्रकारे सरकारने 17 ते 18 हजार शिक्षण सेवकांना कामावरुन काढले आहे. तसेच 18 हजार कला आणि क्रीडा शिक्षकांना काढून टाकले आहे. परंतु सरकार सांगते की, आम्ही अतिरिक्त शिक्षक ठरविलेले नाहीत. नवीन संचमान्यतेच्या निकषानुसार 30 ते 34 हजार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरविण्यात आलेले आहे. याला कायद्याचा कोणताही अधिकार नाही ? कारण शासन निर्णयाला न्यायालय मानत नाही. शासन निर्णयाच्या आधारे निर्णय घेऊन शिक्षकांना नोकरीतून काढू शकत नाही. उलट माननीय शिक्षण मंत्री आम्हाला विचारतात की, हा आकडा तुम्ही कोठून आणला ?

महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांच्या म्हणण्यानुसार 14 हजार शिक्षक आणि 17,490 शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरले आहत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या दोन्हींची

..5..



SJB/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 15:40

श्री.कपिल पाटील....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बेरीज किती होते ? मग आमचा आकडा खोटा आहे काय ? प्रत्यक्षात हा आकडा जास्त आहे. या राज्यात शिक्षकांची 21,312 आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची 16,734 पदे रिक्त आहेत. 18 हजार कला व क्रीडा शिक्षकांना कामावरुन काढून टाकले आहे. तेढ्याच शिक्षण सेवकांना सुध्दा अगोदरच काढून टाकले आहे. या सर्वांची गोळा बेरीज केली तर हा आकडा 60-70 हजार नव्हे तर लाखाच्या घरात जातो. आर.टी.ई. नुसार शिक्षकांची पदे वाढणार आहेत. हा वाढणारा खर्च कमी करण्यासाठी आहे त्या शिक्षकांना काढून टाकण्याचा उद्योग या नव्या सरकारने सुरु केला आहे.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

सभापती महोदय, शिक्षकांची गरज शाळांना नाही काय ? शासनाने आकडे कसे मोजले आहेत, ते पहा. नवीन संच मान्यतेचे निकष केले आहेत. आरटीई सांगते की, लोअर प्रायमरिला 30 व अप्पर प्रायमरिला 35. किमान 199 असतील तर 7 शिक्षक मिळतात. पण शासनाचे संच मान्यतेचे निकष आहेत. जर 199 ने 1 विद्यार्थी वाढला तर 7 चे 5 होतात. करण 40 प्रमाणे लगेच मोजायला सुरूवात करतात, लगेच 2 शिक्षक बाहेर काढतात, अशी सगळी सदोष मांडणी केली आहे. आरटीईने कला, क्रीडा शिक्षक, वर्क एक्सप्रेसचे शिक्षक यांची वर्गवारी वेगळी केली आहे आणि विज्ञान, गणित, भाषा व सोशल सायन्स या विषयांचे शिक्षक वेगळे मानले आहेत. ते शिक्षक किती द्यायचे याचेही प्रमाण ठरवून दिले आहे. प्रत्येक विषयाला एक शिक्षक मिळाला पाहिजे, असे सांगितले आहे. माननीय मंत्री महोदय म्हणतात की, ॲट लिस्ट वन टिचर. लँग्वेजेसचे म्हटल्यानंतर ते म्हणतात की, मराठी, हिंदी, इंग्रजीला एकच शिक्षक. बैठकीत ते असे म्हणाले. मराठीला, इंग्रजीला, हिंदीला वेगळा नको का ? हिंदी आणि मराठी ठीक आहे. पण इंग्रजीची अडचण आपल्या राज्यात आहे. इंग्रजीला इंग्रजीचाच शिक्षक पाहिजे. इंग्रजीचा शिक्षक सरप्लस करायचा आणि विज्ञानाची जागा रिक्त आहे तेथे पाठवून द्यायचा. मग तो गणित कसे शिकविणार, सायन्स कसे शिकविणार ? सायन्सचा शिक्षक कमी करायचा आणि त्याला उर्दू शाळेत पाठवून द्यायचा आणि उर्दू शाळेतील शिक्षक कमी करायचा आणि त्याला हिंदी शाळेत पाठवून द्यायचा, या पध्दतीने राज्यातील शिक्षण सचिवांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी खेळखंडोबा मांडला आहे, त्याला तोड नाही. आधीच आपल्या राज्याचे शिक्षण इतक्या वाईट स्तराला आहे, त्यावर आता यांनी कडी केली आहे की, विषयाला शिक्षक द्यायचा नाही.

सभापती महोदय, गणिताला गणिताचा शिक्षक दिला नाही, विज्ञानाला विज्ञानाचा शिक्षक दिला नाही, भाषेला भाषा शिक्षक दिला नाही तर त्या विषयामध्ये मुले कशी पुढे जातील ? तुमचे धोरण आठवीपर्यंत ढकलत न्यायचे आणि आठवीनंतर ढकलून द्यायचे आहे. हे असे का करीत आहेत ? शासनाने ठरवून टाकले आहे की, सर्व शिक्षक हळुहळू निवृत्त करायचे. लाखाच्या वर शिक्षक निवृत्त झाले. माध्यमिक शिक्षक 2 लाख आहेत. 2 लाखांतील 1 लाख शिक्षक कमी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

करण्याचा यांचा डाव आहे. स्वयंअर्थसहाय्यित शाळा या संदर्भातील विधेयक आपणच संमत करून ठेवले आहे. ते एकदा करून दिले की, उरलेले तिकडे जातील. मग बाकीच्या गरिबांनी शिकण्याची गरज नाही. स्किल्ड इंडियाची घोषणा केली जाते, स्किल एज्युकेशन म्हणजे व्यवसाय शिक्षण शिकवायचे, असे सांगितले जाते. दहावीपर्यंतच्या शिक्षणामध्ये स्किल्ड इंडियाच्या नावाखाली तुम्ही व्यवसाय शिक्षणाचा शिरकाव केला तर खबरदार. दहावी, बारावी पर्यंत किमान शिक्षण आहे, जे नागरिक, माणूस होण्यासाठी आवश्यक आहे. आता त्यामध्ये स्किल एज्यूकेशन ओतायचे आणि आठवीनंतर जी गाडी ढकलत नेत आहोत तिला पार बाहेर काढायचे, त्यांना मोटार गॅरेजमध्ये घालवायचे, सफाई कामगार बनवायचे, फिटर-वेल्डर बनवायचे असे जर तुम्ही करणार असाल तर राज्यातील गोरगरिबांना पुढे घेऊन जाणारे कोणतेही शिक्षण तुम्ही देत नाही. फक्त कुशल मजूर बनविण्याचा कारखाना उघडण्याकरिता तुम्ही शिक्षणाकडे पाहत आहात. सरकारचा हा दृष्टीकोन अत्यंत वाईट आहे.

सभापती महोदय, राज्यातील विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांनी परवा मोर्चा काढला. हजारो विनाअनुदानित शाळांतील शिक्षक गेली 15 वर्षे वाट पाहत आहेत. त्यांना वाटले की, आता सरकार बदलले आहे, आपले सरकार आले आहे, ताबडतोब अनुदान सुरू करतील. माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार यांसारखे गरिबांबद्दल कळवळा असणारे वित्तमंत्री आहेत. त्यामुळे उद्यापासून शंभर टक्के अनुदान मिळेल. माननीय मंत्री महोदय, कालच्या तुमच्या लेखी उत्तरामध्ये लिहिले आहे की, अनुदान देता येणार नाही. अंशत: अनुदान पध्दतीने वेतन देताना उर्वरित वेतन अनुदानाचा हिस्सा संबंधित शिक्षण संस्थेने द्यायचा असतो. म्हणजे तो शासनाने द्यायचा नाही. पुढे असे लिहिले आहे की, सदर अनुदान हे भूतलक्षी प्रभावाने देता येत नाही. अनुदान निधीच्या उपलब्धतेनुसार दिले जाईल. आपण जुनेच उत्तर दिले आहे. तुमची सामुहिक जबाबदारी आहे. जुने उत्तर तुम्ही कसे देऊ शकता ? तुम्ही कालच्या लेखी उत्तरामध्ये हे म्हटले आहे. आरटीई सांगते की, विद्यार्थ्यांची आठवीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारची आहे. शिक्षण पूर्ण द्यायचे आहे म्हणजे शिक्षण मोफत द्यायचे आहे. पण पगार संस्थेने द्यायचा, हा कोणता न्याय ? तुम्ही परत म्हणता की,

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ ST/ KTG/ पूर्वी श्री. बोर्डे 15:50

श्री. कपिल पाटील ....

पगार संस्थांनी द्यायचा आहे. सरकारने असे उत्तर द्यायचे का, तुमची जबाबदारी नाही का ? किमान आठवीपर्यंतचे शिक्षण मिळाले पाहिजे. नववी, दहावीची पुढील गोष्ट आहे. पण किमान आठवीपर्यंत शिक्षणाच्या संदर्भात शिक्षकांच्या पगाराची जबाबदारी तुमची असेल. त्या शिक्षकांनी उघडेनागडे, अर्धनग्न होऊन मोर्चा काढला आहे. ते संतापाने आले होते. तुमच्याकडून किमान न्याय मिळेल, असे त्यांना वाटत होते. त्यांच्या मागे नव्याने आलेल्या माननीय शिक्षण मंत्र्यांनी फेर तपासणीचे भूत लावून दिले आहे. हे कशासाठी करीत आहात ? तुमच्या कठोर निकषाला पात्र झाल्यानंतर, मूल्यांकनाला प्राप्त झाल्यानंतर त्यांना दुसऱ्या दिवसांपासून शभंर टक्के अनुदानावर आणायला पाहिजे होते आणि त्यांचे वेतन सुरू करायला पाहिजे होते. ते न करता, तुम्ही नवे निकष लावायचे, फेर तपासणी लावायच्या, हे कशासाठी करीत आहात ?

सभापती महोदय, वॉल कंपाऊंड नाही, ते कोणी बांधून द्यायचे, पैसे कोठून आणायचे, अमुक पाहिजे असेल तर कोठून आणायचे ? तुम्ही पैसे द्यावेत. खेड्यापाड्यांतील, झोपडपट्ट्यांतील शाळा आहेत, त्यांनी पैसे कोठून आणायचे ? गरिबांच्या शाळा फी देऊ शकत नाहीत. सेल्फ फायनान्स स्कूलमध्ये, मोठ्यांच्या वर्गामध्ये 50 हजार, 1 लाख रूपये फी देऊ शकतात. ते तेथे ठीक आहे. पण गरिबांच्या शाळा पैसे देऊ शकत नाहीत. अशी स्थिती असताना शासन त्यांना स्पष्टपणे अनुदान नाकारता. राज्यातील पूर्णवेळ ग्रंथपालांना अर्धवेळ केले आहे, अर्धवेळ ग्रंथपालांना शाळेच्या बाहेर काढून टाकले आहे. आपण आकडे द्यावेत. आपल्याला ग्रंथपाल नको का ? हजार-हजार मुलांच्या शाळा आहेत, तेथे ग्रंथपाल हा एकप्रकारे शिक्षक असतो. मुलांनी अधिकचे वाचन करावे यासाठी त्यांना मदत करावी, यासाठी ग्रंथपाल लागतो. तुम्ही तो देत नाही. शिक्षकेतर कर्मचारी लागतो. परंतु, तुम्ही त्यांना बाहेर काढले आहे. आता घंटा कोण वाजवणार ? तुम्ही स्वच्छ भारताची] स्वच्छ विद्यालयाची घोषणा केली. मग टॉयलेट सफाईसाठी कर्मचारी नको का, शाळा झाडण्यासाठी कर्मचारी नको का, शिपाई नको का, मुली-मुले यांना सांभाळायला कर्मचारी नको का ? सर्वसाधारण शाळांचे असे झाले आहे.

सभापती महोदय, काही शाळांमध्ये विशेष गरजा असणारे विद्यार्थी आहेत. राज्यात अशा विद्यार्थ्यांची संख्या 4 लाख आहे, जे अंध, अपंग, मूकबधीर, मतीमंद, गतीमंद आहेत. आपण

..4

श्री. कपिल पाटील ....

यांसाठी शिक्षक दिले पाहिजेत. आपण शिक्षक देता पण त्यांना अर्धवट पगार देता आणि सर्व कामे करून घेता. तेथे पूर्ण वेळ शिक्षक देण्याची जबाबदारी आटीईने आपल्यावर टाकली आहे. वेळ नाही म्हणून मी कोर्टाच्या संदर्भातील वाचून दाखवत नाही. ही जबाबदारी तुमची आहे. त्या शिक्षकांना तुम्ही वाऱ्यावर सोडता, हे योग्य नाही. राज्यात 4 लाख विशेष गरजा असणारी मुले आहेत.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आपण विशेष विद्यार्थ्यांचा उल्लेख केला. अपंगांच्या शाळांमधील शिक्षकांचा उल्लेख झालेला आहे. पण गतिमंद म्हणजे ऑटिझम यांच्या शाळांसाठी शासनाकडून काहीही दिले जात नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, ऑटिझम विद्यार्थ्यांच्या शाळांना शिक्षकही देत नाहीत. परिक्षमध्ये सवलती देखील दिल्या जात नाहीत. किमान काही गोष्टी त्या विद्यार्थ्यांनी माणूस म्हणून उभे राहण्यासाठी आवश्यक असतात. आईवडिलांना काळजी असते की, माझ्यानंतर या मुलांचे कोण पाहील, त्या भितीने ते कुटुंब भयग्रस्त असते. त्यातून काहीतरी वाईट घटना घडत असतात. त्या मुलाला किंवा मुलीला स्वत:चे शरीरकर्म करता येण्याएवढे शिक्षण आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षक हवे असतात. ही अत्यंत कठीण बाब आहे. तुम्ही त्यांना शिक्षक देण्यास तयार नाही. हा त्यांचा अधिकार आहे आरटीईने, कायद्याने त्यांना दिलेला अधिकार आहे. तुम्हाला तो नाकारता येणार नाही. ही जबाबदारी तुमची आहे. तुमचे तुम्ही करा असे तुम्हाला सांगता येणार नाही. ही जबाबदारी राज्य शासनाने कायद्याने स्वीकारलेली आहे. ती जबाबदारी कायद्याने तुमच्यावर टाकलेली आहे. तुम्हाला त्यापासून पळ काढता येणार नाही. शासन सर्व शिक्षकांना काढून टाकत आहे. जग पुढे चालले अहे.

सभापती महोदय, आयटीआयसीटीचे विषय लागू केले. परंतु, शिक्षक कुठे आहेत ? तुमचे उत्तर सांगते की, ते संस्थेने करायचे आहे. संस्था हे कोठून करणार ? ज्या संस्थांची ताकद, ऐपत आहे त्या ते करतील. कारण तेथे ऐपतदार वर्गाची मुले जातात. पण जेथे ऐपतदार वर्गातील मुले नाहीत, निर्धन वर्गातील मुले जातात, त्या शाळांनी काय करायचे, कोठून शिक्षक नेमायचे ? आपण त्यांना पगार देणार नाही. तो शिक्षक पूर्णवेळ आहे. पूर्णवेळ, नियमित पगार घेणारे शिक्षक तेथे देणे गरजेचे आहे. माननीय शिक्षणमंत्री सांगतात की, तुम्ही फक्त शिक्षकांविषयी बोलता. सभापती

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

महोदय, आरटीई सांगते की, शिक्षण हा विद्यार्थ्यांचा कायदेशीर अधिकार आहे. शिक्षण आकाशातून पडत नाही. शिक्षण हा कायदेशीर अधिकार आहे याचा अर्थ त्यांना शिक्षक मिळण्याचा मूलभूत अधिकार विद्यार्थ्यांना आहे. शिक्षक देण्याचे काम, कर्तव्य सरकारचे आहे. तुम्ही शिक्षक नाकारता याचा अर्थ शिक्षण नाकारता. हे सरकार शिक्षण नाकारीत आहे. मी माननीय शिक्षणमंत्र्यांकडे मागणी करतो की, तुम्हाला शक्य नसेल तर राजीनामा द्या आणि निघून जा. पण तुम्हाला राज्यातील 2 करोड विद्यार्थ्यांच्या जीवाशी, भविष्याशी खेळण्याचा अधिकार नाही. राज्यातील शिक्षकांना अप्रतिष्ठित करण्याचा, अवमानित करण्याचा तुम्हाला अधिकार नाही.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील........

सभापती महोदय, या सरकारला माझी विनंती आहे की, कृपा करुन जे जे वादग्रस्त निर्णय आहेत, त्यांना आजच्या आज स्थगिती द्यावी आणि ते आपल्याला करता येण्यासारखे नसेल तर खुर्च्या खाली कराव्यात. त्याचप्रमाणे शिक्षण विभागाच्या सचिवांची अन्य खात्यात ताबडतोब बदली करावी आणि लोकांनी मागणी केल्यानुसार दोघांवर कलम 304 व 306 नुसार गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करतो आणि थांबतो.

------------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दत्तात्रय सावंत (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये सुरु असलेल्या अल्पकालीन चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, नांदेड येथील सय्यद सरांची झालेली आत्महत्या ही सन 1983 पासून सरकारने राबविलेल्या विनाअनुदानित धोरणाचा दुर्दैवी परिपाक आहे. सन 1983 पासून राज्यात विनाअनुदानित सूत्र सुरु झाले आणि नंतर ते एवढे डायव्हर्ट झाले की, शासनाने आता कधीच अनुदानाच देणार नाही, असे कायम स्वरूपी सूत्र स्विकारले आहे. अगोदर चूक करायची आणि ती दुरुस्त करण्यासाठी मध्ये 10 वर्षाचा कालावधी घालवायचा. त्या पुढे जाऊन शासनाने असे प्रकल्प राबविले की, त्याला 3 वर्षे, 5 वर्षे, 7 वर्षांचा कालावधी दिला. शासनाला हवे त्यावेळी शिक्षीत व्यक्तिमत्त्वांना राबवून घ्यायचे आणि 5 वर्षानंतर घरी जा, असे त्यांना सांगायचे.

सभापती महोदय, या पूर्वी वस्ती शाळांचा प्रश्न सुटला. सरकारला असे वाटले की, वस्ती मधील मुले शिकली पाहिजेत, वाड्यांमधील मुले शिकली पाहिजेत, या साठी शासनाने वस्ती शाळा सुरु केल्या. ज्या वेळी गरज भागते आहे, असे सरकारला वाटले त्यावेळी तेथील शिक्षकांना वाऱ्यावर सोडण्याचा प्रयत्न झाला. या निर्णयाविरोधात राज्यात प्रचंड आंदोलने झाली आणि नंतर मग 10 वर्षाच्या कालावधीनंतर तो प्रश्न कुठे तरी मार्गी लागला.

सभापती महोदय, केंद्र शासन आणि राज्य शासनाने मिळून राज्यातील 8 हजार शाळांना 25 लाख रुपये खर्च करुन संगणक प्रयोगशाळा दिल्या आहेत. हा प्रकल्प 3 टप्प्यांमध्ये पूर्ण झाला. पहिल्या टप्प्यात हजारो शाळांमध्ये नेमलेल्या आय.टी.शिक्षकांना आता सरकारने घरी जाण्यास सांगितले आहे. त्याप्रमाणेच दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील शिक्षकांनाही तसेच आदेश दिले आहेत. शासनाने ही जबाबदारी कंपन्यांवर टाकली आहे आणि कंपनी त्यांना असे सांगत आहे की, शासनाचा आणि तुमचा काही संबंध नाही, तुम्हाला आम्ही नेमले होते, आता तुम्ही घरी जायचे आहे. शासन नेमकी कोणती भूमिका घेत आहे ?

सभापती महोदय, राज्यातील विद्यार्थी घडवायचा असेल, राष्ट्र घडवायचे असेल तर घडवणाऱ्या शिक्षकाला कामाबरोबर दाम देणे महत्त्वाचे आहे. परंतु, ते होताना दिसत नाही.

...3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दत्तात्रय सावंत.............

सभापती महोदय, सय्यद रमीझोद्दीन सरांची आत्महत्या प्रातिनिधीक स्वरुपात पुढे आली असली तरी या राज्यातील एकही जिल्हा शिल्लक राहिलेला नाही की, ज्या जिल्ह्यात शिक्षकाने आत्महत्या केलेली नाही. या मागे अतिरिक्त ठरणे आणि सेवामुक्त होणे हे एकमेव कारण आहे. एखादा शिक्षक अतिरिक्त ठरत असेल तर त्याचे समायोजन करण्याचा आराखडा तयार असला पाहिजे आणि त्याला जर सेवेतून मुक्त करणार असाल तर चौकशीची कार्यवाही पूर्ण केली पाहिजे. परंतु, आज शिक्षकांना थेट घरी पाठविण्याची प्रणाली शासन राबवीत आहे. त्यामुळे प्रचंड मोठ्या प्रश्नांना शिक्षकांना सामोरे जावे लागत आहे.

सभापती महोदय, हे सरकार नवीन आहे. त्यामुळे या सरकारमधील शिक्षण मंत्री महोदयांनी या प्रश्नात संवेदनशील होऊन लक्ष घालावे. 10 वर्षापूर्वीचे, 12 वर्षापूर्वीचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, ते सोडवावेत, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये सुरु असलेल्या अल्पकालीन चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारच्या शिक्षण विभागाच्या धोरणाचा पहिला बळी नांदेड जिल्ह्यामध्ये गेला आहे. सय्यद रमीझोद्दीन हा 24 वर्षाचा चित्रकलेचा तरुण शिक्षक, ज्याला राज्य शासनाच्या शिक्षण धोरणातील जाचक अटींमुळे स्वत:चे जीवन संपवावे लागले आहे. या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आणि श्री.विक्रम काळे यांनी त्यांच्या घरी जाऊन या कुटुंबाची भेट घेतली. या कुटुंबाची फार वाईट अवस्था आहे. ज्या शिक्षकाने आपले जीवन संपविले त्या शिक्षकाच्या घरची परिस्थिती अशी आहे की, त्याच्या वडिलांच्या दोन्ही किडण्या खराब झाल्या आहेत. त्यांच्यावरील उपचारासाठी महिन्याला 40 हजार रुपये खर्च येत आहे. अशा परिस्थितीत असलेला शिक्षक ज्यावेळी शासनाच्या धोरणाचा बळी ठरतो, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे सुसाईट नोटमध्ये राज्याच्या शिक्षण मंत्र्यांचे आणि शिक्षण सचिवांचे नाव लिहून आपले जीवन संपवितो. अशा वेळी शिक्षण मंत्री आणि शिक्षण सचिवांवर कलम 304 आणि कलम 306 अन्वये गुन्हे नोंद करावेत, अशी मागणी असंख्य लोकांनी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन केली. परंतु, त्याबाबत काहीही कार्यवाही झाली नाही. किमान आज ज्यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेत नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून सभागृहात चर्चा उपस्थित होत आहे, अशा वेळी तरी शासनाने आपले धोरण बदलावे आणि हे धोरण बदलविता येणार नसेल तर शिक्षण सचिवांना बदलावे, अशी आग्रहाची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, आज त्या मृत शिक्षकाच्या आई-वडिलांची परिस्थिती अतिशय कठीण आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी ही सर्व परिस्थिती बघितल्यानंतर आपले एक महिन्याचे वेतन त्या कुटुंबाला मदत म्हणून देऊ केले आहे. माझी शासनाला विनंती आहे की, शासनाच्या धोरणामुळे शिक्षकाचा बळी गेला आहे. शासनाच्या धोरणामुळे जर त्याचा बळी गेला असेल तर शासनाने सुध्दा या शिक्षकाच्या कुटुंबाला मदत जाहीर केली पाहिजे, अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

...5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ ST/ KTG/ प्रथम श्री.मंगेश....... 16:00

श्री.धनंजय मुंडे............

सभापती महोदय, एकीकडे राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शासनाच्या धोरणामुळे शिक्षकावर मरण पत्करण्याची वेळ येत आहे. अशी वेळ भविष्यात कोणावरही येऊ नये, एवढीच अपेक्षा व्यक्त करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून थांबतो.

------------

...6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. खरे तर हा विषय एवढा गंभीर आहे की, यावर दीर्घ काळ चर्चा होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, राज्याच्या शिक्षण क्षेत्रात, विशेषतः ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात महाप्रचंड असा खेळखंडोबा चालला आहे व त्यास शासनाचे धोरण कारणीभूत आहे. आपण शिक्षण हक्क कायदा स्विकारला आहे. सध्या जे काही चालले आहे, त्यामध्ये एवढा गोंधळ आहे आणि प्रशासन ज्या प्रकारे याचा अन्वयार्थ लावत आहे, ज्या पध्दतीने अडथळे निर्माण करीत आहे, त्यामुळे ग्रामीण भागातील शिक्षणाची खूप वाईट अवस्था झाली आहे.

सभापती महोदय, तीन वर्षापूर्वी शासनाने पटपडताळणी करण्याचा निर्णय घेतला. पटपडताळणी केल्यानंतर मात्र त्या संदर्भातील कोणताही निर्णय शासनाने घेतला नाही. राज्यामध्ये गेल्या तीन वर्षांपासून शिक्षकांच्या भरतीला बंदी घातलेली आहे. अनेक शाळांमध्ये शिक्षक नाहीत. गणिताचे शिक्षक नाहीत, कोठे भाषेचे शिक्षक नाहीत. एकीकडे आपण दर्जेदार शिक्षण देण्याची ग्वाही देत आहोत, शिक्षण हक्क कायद्यानुसार राज्यातील मुलांना शिक्षण देण्याची ग्वाही देत आहोत आणि दुसरीकडे गेल्या 3 वर्षांपासून शिक्षक भरती बंद आहे. बंदी उठविल्यानंतर आता कोठे फक्त गणिताचे शिक्षक भरा, कोठे इंग्रजीचे शिक्षक भरा, असे सांगितले जात आहे आणि त्यासाठी मंत्रालयापर्यंत प्रस्ताव पाठवावे लागत आहेत. आता तर शिक्षण हक्क कायद्याचे कारणही पुढे केले जात आहे. आम्ही वारंवार हे सांगितले आहे की, सध्या 2014-2015 वर्ष सुरु आहे. त्यामुळे आपण सन 2014-2015 च्या विद्यार्थी संख्ये प्रमाणे शिक्षक निश्चिती करा. परंतु, त्याला शासन तयार नाही. सन 2013-2014 मधील संख्येनुसार शिक्षक भरावेत, असे सांगितले जाते. या मागे नेमके काय कारण आहे, हे समजत नाही.

सभापती महोदय, शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करावयाची असेल तर ती पूर्णपणे करावी, अशीही आमची मागणी आहे. परंतु, तेही शासन करण्यास तयार नाही. ज्या ठिकाणी

...7....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ ST/ KTG/ प्रथम श्री.मंगेश....... 16:00

डॉ.सुधीर तांबे............

शिक्षकांच्या जागा कमी होत आहेत, त्या त्वरित कमी केल्या जात आहेत आणि त्यांना दुसऱ्या संस्थांमध्ये पाठविले जात आहे. परंतु, ज्या ठिकाणी जागा वाढत आहेत, त्या ठिकाणी मात्र शिक्षक देण्यास शासन तयार नाही. अशा रितीने शिक्षण हक्क कायद्याची अर्धवट अंमलबजावणी शासन करीत आहे.

यानंतर श्री.मा.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे...

शिक्षकेतर कर्मचारी देखील मोठ्या प्रमाणावर कमी झालेले आहेत. प्रयोग शाळेतील परिचर कमी केले जात आहेत. अशा प्रकारे अनेक पदे कमी केली जात आहेत. शाळा कशा चालवायच्या असा प्रश्न निर्माण झालेला आहे. या शिक्षण क्षेत्रामध्ये आज एक मोठी अस्वस्थता निर्माण झालेली आहे. "कायम" हा शब्द 2009मध्ये काढण्यात आला. आज आपण 2014 सालामध्ये आहोत. "कायम" शब्द काढण्यासंदर्भात अद्याप आपण कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी करु शकला नाहीत. सन 21012-13मध्ये शासनाने वेतन देऊ असे सांगितले. परंतु अद्याप वेतन दिलेले नाही. अतिशय कठोर निकष लावलेले आहेत. 1200 ते 1300 शाळा पात्र झालेल्या आहेत. परंतु शासन पुनश्च त्या शाळांची फेर तपासणी करणार आहे. यामुळे पुन्हा भ्रष्टाचाराचे कुरण उपलब्ध होणार आहे. माननीय मंत्री महोदय प्रशासनाकडून कारभार चालवितात, त्याबाबतीत आमचा आक्षेप आहे. प्रशासन मंत्री महोदयांना कोणताही योग्य सल्ला देत नाही. मंत्रिमंडळ प्रशासनाचे ऐकत राहीले तर ते चांगले निर्णय घेऊ शकणार नाही. हा शिक्षकांचा प्रश्न आहे असे समजून या प्रशनाकडे पाहू नका अशी माझी कळकळीची विनंती आहे. शिक्षकांप्रमाणे हा शिक्षणाचा देखील प्रश्न आहे. दर्जेदार शिक्षण देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. शिक्षण हक्क कायद्यामध्ये कमीत कमी किती शिक्षक द्यावेत हे सांगितलेले आहे. एका विषयाला एक शिक्षक हे तत्व मान्य केले पाहिजे. एक साधी गोष्ट आहे. प्राथमिक शाळेमध्ये 30 विद्यार्थ्यांना एक शिक्षक आहे. शाळेमध्ये 90 विद्यार्थी असले तर पहिली ते पाचवी पर्यंत 3 शिक्षक देणार का ? आमच्या लहानपणी एक शिक्षक पहिली ते चौथीच्या वर्गातील मुलांना एकत्र बसवून शिकवित असे. या विषयामध्ये माननीय शिक्षण मंत्र्यांनी ताबडतोबीने लक्ष घालून, संस्था चालकांशी, शिक्षण तज्ज्ञांशी चर्चा करुन नवीन ॲकेडेमिक वर्षापासून या धोरणाची अंमलबजावणी करावी एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जो विषय या सभागृहामध्ये उपस्थित केला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे. शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या एका शिक्षकाची झालेली आत्महत्या, त्यामुळे शिक्षकांमध्ये आणि शिक्षण क्षेत्रामध्ये संतापाची लाट निर्माण झालेली असून वातावरण ढवळून निघालेले आहे. हा विषय या सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आला हे फार चांगले झाले. पहिल्यांदा का होईना, एका शिक्षकाच्या आत्महत्येचा विषय या सभागृहामध्ये चर्चिला जात आहे. यापूर्वी या राज्यामध्ये डझनभर शिक्षकांनी, मुख्याध्यापकांनी बांधकामाच्या संदर्भात, शालेय पोषण आहाराच्या संदर्भात आतहत्या केल्या. परंतु तो विषय या सभागृहामध्ये कधी चर्चेसाठी आला नाही. आम्ही चर्चा मागूनही चर्चा मिळाली नाही. किमान आता तरी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी शिक्षकांच्या प्रश्नाला वाचा फोडली आहे. त्या शिक्षकांच्या संदर्भात विचार होण्याची आवश्यकता आहे. संच मान्यतेतून शिक्षकांमध्ये गोंधळ निर्माण झालेला आहे. अतिरिक्त ठरणारे शिक्षक याच्याशी मी सहमत आहे. परंतु आमच्या समोर विविध आकडे येत आहेत. या राज्यात किती शिक्षक अतिरिक्त झाले, किती जागा रिक्त झाल्या, किती शिक्षकांचे समायोजन झाले, किती शिक्षकांचे समायोजन झाले नाही, एखादा आकृतिबंध स्वीकारला तर शिक्षकांचे समायोजन करण्याच्या बाबतीत काय कारवाई करण्यात आली, किती प्राथमिक शिक्षकांची पदे रद्द करण्यात आली, ती पुन्हा देण्याच्या संदर्भत शासनाने काय धोरण स्वीकारले, या सर्व गोष्टी सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. आदेश काढणारे सरकार असले तरी यापूर्वीच्या सरकारने काढलेले आदेश जाचक आहेत. शिक्षकांना नोकरी पासून वंचित ठेवणारे आणि विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणारे असे हे जाचक आदेश आहेत. शासनाच्या धोरणात्मक निर्णयामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून आणि शिक्षकांना नोकरीपासून वंचित ठेवणारे आदेश असतील तर अशा निर्णयांचा शासनाने फेर विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या अत्यंत महत्वाच्या विषयाच्या अनुषंगाने मी दोन मुद्दे मांडून माझे भाषण संपविणार आहे. ज्या शिक्षकाने आत्महत्या केलेली आहे त्याच्या सारख्या अनेक शिक्षकांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

संदर्भात शासनाने जे धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी या राज्यातील ज्या अधिकाऱ्यावर होती त्याने ती जबाबदारी पार पाडली की नाही ? मला असे वाटते की, कदाचित संबंधित अधिकाऱ्याने शासनाच्या आदेशाची अंमलबजाणी केली असती तर या शिक्षकाचे प्राण वाचू शकले असते. 21 ऑगस्ट 2014ला राज्य शासनाने आदेश काढले. या शिक्षकाला सेवेत सामावून घेण्याबाबतचे ते आदेश होते. संबंधित जिल्ह्याचे सीईओ आणि शिक्षणाधिकारी यांनी काय केले ? या शिक्षकांना सेवेत सामावून घेण्याच्या संदर्भातील दिनांक 21 ऑगस्ट 2014 रोजी काढलेल्या आदेशाची अंमलबजावणी का केली गेली नाही ? शिक्षण मंत्री आणि शिक्षण सचिव या शिक्षकाच्या मृत्यूला जबाबदार असतील तर तशाच प्रकारचा गुन्हा सीईओ आणि शिक्षण अधिकाऱ्यावर दाखल व्हायला पाहिजे. दिनांक 21 ऑगस्ट 2014 रोजीच्या शासनादेशाची अंमलबजावणी झाली असती तर कदाचित त्या शिक्षकाचे प्राण वाचू शकले असते. या संबंधी माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर अपेक्षित आहे.

सभापती महोदय, मला या विषयाचे राजकारण करायचे नाही. मी संघटनेचा कार्यकर्ता आहे. संघटनेचा कार्यकर्ता म्हणून मी या विधानपरिषदेमध्ये आलो आहे. काही विषय या निमित्ताने चर्चेला येत आहेत. या शिक्षकाचा जो दुर्दैवी मृत्यू झाला त्याबद्दल शिक्षण क्षेत्रामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. हा एक शिक्षक नाही तर अशा प्रकारचे 10 हजार शिक्षक आहेत. हे शिक्षक कोर्टात गेले. शासनाबरोबर त्यांनी संघर्ष केला. या पैकी सुमारे 10 ते 12 हजार शिक्षकांकडून प्रत्येकी पाच-पाच हजार रुपये अधिकृतपणे गोळा करण्यात आले. प्रत्येक शिक्षकाकडून पाच-पाच हजार रुपये याप्रमाणे 4 कोटी पेक्षाही जास्तीची रक्कम गोळा करण्यात आली. ही रक्कम कोणाकडे गेली, कोणी घेतली, याचा शोध घेतला पाहिजे. 4 कोटी रुपये त्या माणसाला देऊनही नोकरी मिळत नसेल तर जीवनाला काय अर्थ आहे अशा प्रकारची भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे. या गोष्टीचा तपास होणे आवश्यक आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

----

....4...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. शिक्षकांच्या प्रश्नावर शिक्षकांनीच बोलले पाहिजे अशातला भाग नाही, महिलांच्या प्रश्नावर महिलांनीच बोलले पाहिजे अशातला भाग नाही, पुरुषांच्या प्रश्नावर पुरुषानीच बोलले पाहिजे अशातला भाग नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी राज्यातील शिक्षकांच्या जीवघेण्या प्रश्नाला वाचा फोडली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. गेले दोन दिवस या सभागृहामध्ये सातत्याने शेतकऱ्याच्या आत्महत्या, दुष्काळ यावर चर्चा करण्यात आली. नैसर्गिक अवकृपेमुळे दुष्काळ पडतो. परिणामी शेतकरी आत्महत्या करतात. या शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी आपण प्रयत्न करतो. दुसरीकडे शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शिक्षक आत्महत्या करतात, त्याबद्दल सरकारकडे कोणत्याही प्रकारची संवेदना नसावी यापेक्षा मोठे दुर्दैव ते कोणते ? "अच्छे दिन आयेंगे"चे स्वप्न आपण सर्वांनी पाहिले. राज्याचे नेते म्हणून हे स्वप्न आम्ही देखील पाहिले. सय्यद रमीझोद्दीन सारदख्या एका कला शिक्षकाला आत्महत्या करावी लागली. "अच्छे दिन"चे स्वप्न पहाता पहाता त्याचे जीवन मातीमोल होऊ गेले. हे सर्व पाहिल्यानंतर आमच्या राज्यातील शिक्षक असे म्हणतात की,

आशिया मेरा लुट गया मेरी नजर के सामने
हो कर बेघर मैं खड़ा, अपनेही घर के सामने

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC.1

SGB/ KTG/ 16:20

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

आज आपल्या राज्यात शिक्षकांच्या संदर्भात ही परिस्थिती निर्माण झाली आहे. जगातील कोणत्याही श्रीमंत राष्ट्राला जमले नाही ते एका छोटया क्यूबा या राष्ट्राने करुन दाखविले आहे. अत्यंत गरीब व छोटया असलेल्या या राष्ट्राने शिक्षण आणि आरोग्य सेवा सर्वांसाठी मोफत ठेवलेली आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या 20 टक्के खर्च शिक्षण आणि आरोग्यावर केला जातो. आमच्या राष्ट्रामध्ये महाराष्ट्र आणि गुजरात मधील सौराष्ट्र अशी दोन राष्ट्रे आहेत. आपल्या देशातील शिक्षण क्षेत्र ही आमची सर्वात मोठी प्रयोगशाळा आहे. सर्व प्रकारचे प्रयोग तेथे केले जातात. सर्व शिक्षा अभियान, शिक्षण हक्क कायदा असे नाना प्रकारचे प्रयोग केले जातात. या प्रयोगामध्ये बळी पडतो तो शिक्षक आणि विद्यार्थी.

सभापती महोदय, काल एक नवीन शोध लावण्यात आला. परीक्षा घ्यायची की नाही? आईच्या पोटातून बाहेर आल्यानंतर आठवीच्या वर्गात प्रवेश मिळणार आहे. अक्षरओळख अजिबात नाही. अंक ओळख नाही. विद्यार्थ्यांना फक्त सफाई मजदूर करायचे का, त्यांनी हमालाचे काम करायचे काय? शिक्षकांवर चांगले नागरीक घडविण्याची जबाबदारी असताना त्यांच्यावर आत्महत्या करण्याची पाळी येते यापेक्षा दुसरी शरमेची गोष्ट नाही.

सभापती महोदय, जगप्रसिध्द चित्रकार पाब्लो पिकासो याचे एक वाक्य अतिशय बोलकं आहे. काव्य हे बोलकं चित्र असतं, चित्रं हे अबोल काव्य असतं. सय्यद रमीझोद्दीन या कला शिक्षकाला शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे आत्महत्या करावी लागली. हे चित्र बदलले पाहिजे. निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे हे आम्ही समजू शकतो. परंतु प्रशासनाच्या चुकीच्या धोरणामुळे, मग्रुरीमुळे शिक्षकांना आत्महत्या करावी लागत असेल तर संबंधितांविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरवून त्यांना सेवेतून मुक्त केले जाते. त्यामुळे त्यांच्यात वैफल्याची भावना निर्माण होऊन आत्महत्या करण्यास ते प्रवृत्त होत आहेत. त्यामुळे शिक्षकांच्या जीवनात अच्छे दिन येण्यासाठी सरकारने प्रयत्न करावा एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

-------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत देशपांडे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, समाजाच्या सगळया संवेदना संपल्या आहेत. पूर्वी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत होत्या. वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर त्याची बातमी छापली जात असे. आता शेतकऱ्यांच्या आत्महत्येची बातमी वृत्तपत्राच्या आतील पानावर छोट्या कॉलममध्ये छापली जाते. आम्हाला याबद्दल लाज वाटली नाही. शिक्षकांच्या आत्महत्या सुरु झाल्या आहेत. याला जबाबदार कोण, का असे धडते, कोणाच्या चुकीच्या धोरणामुळे घडते याचा सारासार विचार करण्यास कोणी तयार नाही. बाटली नवी आहे परंतु आतील मटेरियल तेच आहे.

सभापती महोदय, मी कालच सांगितले होते. शिक्षण हक्क कायदा आहे त्याच स्थितीत राबविल्यामुळे या भानगडी निर्माण झाल्या आहेत. शिक्षण हक्क कायद्यामध्ये म्हटले होते की, अंशकालीन शिक्षक नेमावेत. मागील वर्षी सरकारने अंशकालीन शिक्षकांची नेमणूक केली. परंतु यावर्षी डिसेंबर महिन्यापर्यंत अंशकालीन शिक्षकांची नेमणूक केलेली नाही. कोणत्या आधारे शिक्षण हक्क कायदा जसाच्या तसा राबविण्यात येत आहे. शिक्षण हक्क कायद्याच्या कलम 27 मध्ये म्हटले आहे की, शिक्षकांना शाळाबाह्य काम देऊ नये. तरी देखील मागील सरकारने शिक्षकांना झाडे मोजायला पाठविले होते. हेही सरकार पाठवित आहे. कोणत्याही ॲक्टची कोणत्या पध्दतीने अंमलबजावणी करतो हे महत्वाचे आहे. प्रत्येक विभागाला एक ॲक्ट आहे. महाराष्ट्रात अशी अवस्था आहे की, शिक्षणासाठी एमईपीएस ॲक्ट आहे, स्वयं अर्थसहाय्यित ॲक्ट आहे, राईट टू एज्युकेशन ॲक्ट आहे आणि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट असे चार ॲक्ट आहेत. सरकारला ज्या ज्या गोष्टी फायद्याच्या वाटतात त्या वापरुन सरकार शिक्षकांना वेठीस धरण्याचे काम करीत आहे. माझी शासनाला नम्र विनंती आहे की, आर.टी.ई.मध्ये संशोधन करणे अतिशय गरजेचे आहे. हा ॲक्ट खुद्द माननीय पंतप्रधानांच्या गुजरात सरकारने नाकारला आहे. राजस्थान सरकारने या ॲक्टमध्ये सुधारणा केली. तेथे भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. आम्ही मात्र हा ॲक्ट आल्यानंतर वस्ती शाळा, भोंगा शाळा, साखर शाळा बंद केल्या आणि ॲक्टप्रमाणे वाटचाल करु लागलो आहोत. राजस्थानमध्ये शिक्षणबाह्य 2 लाख विद्यार्थी होते, तेथील सरकारने गांभीर्याने काम करुन महसूल यंत्रणेला काम करावयास लावले आणि ही शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या 22

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत देशपांडे........

लाख इतकी झाली. आम्ही काही केले नाही. फक्त आहे त्याच अवस्थेत अंमलबजावणी करीत आहोत. शिक्षण हक्क कायद्याच्या प्रत्येक कलमामध्ये संशोधन करण्याची गरज आहे. आपल्या राज्याला कशा पध्दतीने हा ॲक्ट उपयोगाचा आहे त्या पध्दतीने सुधारणा करण्याची गरज आहे. शासक कधी रडत नसतो. जनतेसमोर कायम हसत असतो. प्रत्येक वेळेला पैसा नाही हे रडगाणे गाणे शासकाला शोभत नाही. सत्ता हस्तगत करीत असताना आपल्या राज्यावर कर्ज आहे याची माहिती नव्हती का? माहिती असताना तुम्ही सत्ता मिळविण्यासाठी धडपड केली. किमान शिक्षणासाठी पैसा नाही अशी अवस्था होऊ नये. शासनाने कोणत्याही संसाधनेतून पैसा उभारावा. विनाअनुदानित शाळांना अनुदान देणे गरजेचे आहे. 20 टक्के नाही तर 10 टक्के द्या. परंतु त्या शिक्षकाच्या हाती महिन्याला काही पैसे पडू द्या एवढी कळकळीची विनंती करतो आणि थांबतो.

-----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेसंबंधी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, 1 एप्रिल, 2010 पासून राज्यात शिक्षण हक्क कायदा अंमलात आला. त्यापूर्वी या ॲक्टमधील सेक्शन 34 प्रमाणे स्टेट गव्हर्निंग कौन्सिलचे गठन करण्यात आलेले नाही. फक्त ॲक्टची अंमलबजावणी केली जात आहे. अंमलबजावणी करीत आहोत हे दाखविण्यासाठी घाई करण्यात आली. शेवटी शेतकऱ्यांप्रमाणे शिक्षकांचे बळी जाणे सुरु झाले. शिक्षकांचे जीव वाचवायचे असतील तर शिक्षणासाठी पैसा नाही हे कारण सांगणे बंद करावे लागेल. स्टेट गव्हर्निंग कौन्सिल तत्काळ गठीत करणे ही काळाची गरज आहे. शिक्षण हक्क कायद्यात जे काही बदल आवश्यक असतील ते बदल तातडीने करावे लागतील त्या शिवाय या कायद्याची सुरु असलेली अंमलबजावणी रोखणे अत्यावश्यक आहे.

सभापती महोदय, सन 2013-14 चे संच निर्धारण चुकीच्या आधारे केले गेले. शिक्षण हक्क कायद्यातील कलम 19 व 25 आणि शेड्युल्डमधील तरतुदीचा चुकीचा अर्थ काढून पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांची संख्या एकत्रित करुन सांगण्यात आली. विद्यार्थ्यांच्या संख्येवर शिक्षकांचे प्रमाण ठरविले जाते. जे अशैक्षणिक आहे. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांची संख्या वाढली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या वाढली. म्हणून 2013-14 चे संच निर्धारण चुकीचे केले गेले त्याला तत्काळ स्थगिती द्यावी अशी आमची मागणी आहे. संच निर्धारण कसे करावे यासाठी सर्व संबंधितांची बैठक बोलावून निर्णय घ्यावा. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी. ज्या 1347 शाळा कायम विनाअनुदान तत्वावर होत्या त्या अनुदानास पात्र ठरल्या आहेत. त्यांना तत्काळ अनुदान देण्याची धोषणा करावी. शिक्षकांना कोणत्याही प्रकारचे अशैक्षणिक काम देण्यात येऊ नये. या संदर्भात उच्च न्यायालयामध्ये मी स्वत: रिट पिटिशन दाखल केले आहे. रिट पिटिशनमध्ये 29.10.2014 रोजी उच्च न्यायालयाने स्टे दिलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर 2 डी.1....

श्री. नागो गाणार ..........

त्या स्थगितीला न जुमानता शासनाने केवळ अतिरिक्त शिक्षकांना समायोजित करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. म्हणून 15 तारखेला कंटेम्प्ट फाईल केले त्याची दखल शासनाने घ्यावी अशी या अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

..........

..........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामराव वडकुते (नामनियुक्त) : सभापती महोदय, शिक्षकाने केलेल्या आत्महत्येच्या संदर्भात या सभागृहात सविस्तर चर्चा होत असताना सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी अत्यंत गंभीर मुद्दे मांडले. यापूर्वी सभागृहात सातत्याने राज्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांच्या संदर्भात चर्चा होत असते व अशा आत्महत्या होऊ नयेत म्हणून शासन स्तरावर वेगवेगळ्या उपाययोजना देखील केल्या जातात. या चर्चेच्या अनुषंगाने देखील पोलीस स्टेशनला या शिक्षकाने अर्ज दिलेला होता. त्या अर्जातील वाक्य पाहिले तर त्याने वेळोवेळी संबंधितांकडे पत्रव्यवहार केला होता तरी देखील कोणतीच दखल घेतली गेली नाही. शासनाच्या अधिकाऱ्यांनी जर या अर्जाची दखल घेतली गेली असती तर कदाचित या शिक्षकाची आत्महत्या झाली नसती ही बाब शासनाच्या लक्षात येणे आवश्यक आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पाठपुरावा करीत असताना शासनाच्या वतीने याबाबत दक्षता घेतली न गेल्यानेच ही आत्महत्या झाली. इतके असताना सुध्दा त्या शिक्षकाने चिठ्ठीत म्हटले आहे की, किमान अंशकालीन व जुने शिक्षक यांनी तरी आत्महत्या करु नये, याबाबतीत शासनाने जरुर विचार करावा.

त्याचबरोबर मागासवर्गीय मुलांनी तसेच व्हीजेएनटीच्या मुलांनी शिक्षण घेतले पाहिजे, उच्च शिक्षण घेतले पाहिजे असे शासनाचे धोरण असताना सन 2008 मध्ये राज्याच्या धोरणानुसान 180 आश्रमशाळांना मंजुरी देण्यात आली. तेथील कनिठ महाविद्यालयाच्या प्रपाठकांना एक वर्षाचा पगार दिला पण अचानक काय घडले की सामाजिक न्याय विभागाने शिक्षण विभागाची मान्यता न घेतल्याने त्यांना एक वर्षानंतर ते 2014 पर्यंतचे पगार दिले जात नाहीत. मग त्यांनी सुध्दा आत्महत्या करण्याचाच विचार करावा काय, याबाबतही शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

..........

..........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: प्रादशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक

L.A. BILL NO. XXX OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.)

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2014 चे विधानसभा विधेयक क्र. 30 - महाराष्ट्र प्रादशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती (श्री. जयवंतराव जाधव)** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : महोदय, महाराष्ट्र राज्य हे देशात सर्वात जास्त नागरिकरण असलेले राज्य असून 45 ते 47 जनता शहरातून वास्तव्य करीत आहे. अशा परिस्थितीत नियोजन प्राधिकरणाने विकास योजना तयार करणे, त्या सादर करुन त्यांना मंजुरी देणे असे विविध टप्पे पूर्ण करावे लागतात. त्यातही छोट्या आणि मोठ्या शहरांसाठी समान कालमर्यादेची तरतूद अगोदर होती पण मोठ्या शहरांचे क्षेत्र आणि झपाट्याने होणारे नागरिकरण व त्यामुळे निर्माण होणारे गुंतागुंतीचे प्रश्न विचारात या मोठ्या शहरांच्या नियोजन प्राधिकरणास विर्निदिष्ट कालमर्यादेत विकास योजना तयार करताना व मंजुरीसाठी सादर करताना तसेच निवडणुकांचा आदर्श आचारसंहितेचा कालावधी विचारात घेता ठराविक वेळेची बंधने अनुसरावयास अडचणी येत होत्या. त्याचबरोबर कोर्टाचे अंतरिम आदेश म्हणून कलम 26 (1) आणि कलम 30 तसेच कलम 31 मधील पोट कलम (1) मधील सुधारणा विहित कालावधीत मंजूर न झाल्यास नियोजन प्राधिकरणाने सादर केल्याप्रमाणे मंजूर झाल्याचे मानण्यात येईल अशी ही तरतूद असून या सुधारणेला सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

.........4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. रणजित पाटील : महोदय, सन 2014 चे वि.स.वि.क्र. 30 संमत करण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2014 चे वि.स.वि.क्र. 30 संमत झाले आहे.

--------

........5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : कामकाज पत्रिकेवर पहिल्या क्रमांकावर दाखविलेली अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात येत आहे. आता दुसरी अर्धा-तास चर्चा विचारात घेण्यात येईल.

**पृ.शी.** : पुणे जिल्ह्यातील 360 गावांमधील आदिवासींच्या जमिनी शासनाचे निर्बंध असूनही बिगर आदिवासींकडून खरेदी करण्यात येणे

**मु.शी.**: पुणे जिल्ह्यातील 360 गावांमधील आदिवासींच्या जमिनी शासनाचे निर्बंध असूनही बिगर आदिवासींकडून खरेदी करण्यात येणे या विषयावर श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली अर्धा-तास चर्चा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

यानंतर श्री. भारवि ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>वि.स.वि.क्रमांक 35 बाबत.</u>**

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी विनंती केली होती की, शासकीय विधेयके मंजूर करून द्यावीत. त्यांची विनंती आम्ही मान्य केली होती. पण ते खालच्या सभागृहातून वेळेवर येथे विधेयके आणत नाहीत.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, विधान सभेमध्ये विधेयक मांडल्यानंतर ते मंजूर झाल्यानंतर विधान परिषदेच्या सभागृहामध्ये येते. हे बिल विधान सभेमध्ये मंजूर झालेले नाही. तेव्हा आपण तांत्रिक बाब लक्षात घ्यावी. आपण अनुभवी सन्माननीय सदस्य आहात. कुठलेही विधेयक खालच्या सभागृहात मंजूर झाल्याशिवाय वरच्या सभागृहात येत नाही. ते बिल खालच्या सभागृहाच्या पटलावर आहे. ते मंजूर झाल्यानंतर या सभागृहात येईल. आपण म्हणता त्या प्रमाणे हे विधेयक जिन्याने वर आणता येत नाही. ते खाली मंजूर झाल्याशिवाय वर कसे काय येईल ?

तालिका सभापती (श्री.जयवंतराव जाधव) : सभागृहाची बैठक आता स्थगित होत होऊन उद्या गुरूवार, दिनांक 18 डिसेंबर 2014 रोजी, सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4 वाजून 40 मिनिटांनी, गुरूवार, दिनांक 18 डिसेंबर 2014 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही